# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, बुधवार २९ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०







## राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येणार नाहीत : शरद पवार

**बारामती** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन्ही गटांच्या पुन्हा एकत्र येण्याच्या शक्यतेबद्दल मंगळवारी शरद पवार यांना विचारण्यात आले. यावर त्यांनी दोन्ही गट एकत्र येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे सांगितले. एक दिवसापूर्वी, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)चेसुप्रिया सुळे आणि बजरंग सोनवणे सोमवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना रिसेप्शनचे आमंत्रण देण्यासाठी पोहोचले होते.राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री म्हणाले, आता काहीही सांगता येत नाही. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) प्रमुख शरद पवार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीवर मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, शरद पवार आणि पंतप्रधान मोदी यांच्या भेटीत काय चर्चा झाली, हे कोणालाच माहीत नाही.



सध्या फक्तअफवा आणि तर्कवितर्क आहेत. यावर सध्या काहीही बोलता येणार नाही.गेल्या पाच दिवसांत भाजपच्या नेत्यांसोबत ही सुप्रिया सुळे यांची दुसरी महत्त्वाची भेट होती. यापूर्वी २२ जुलै रोजी त्यांनी शरद पवारांसोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. शरद पवारांनी मोदींना एक पत्रही सादर केले होते. ही बैठक सुमारे २० मिनिटे चालली होती. या बैठकीबाबत शरद पवारांनी सोशल मीडियावर एका पोस्टमध्ये म्हटले- नीट परीक्षेतील पेपरफुटी, त्याविरोधात विद्यार्थ्यांचे आंदोलन, आंदोलनादरम्यान पोलिसांचे गैरवर्तन आणि विद्यार्थ्यांवर दाखल झालेले गुन्हेगारी खटले यासह कृषी क्षेत्राशी संबंधित अनेक मुद्यांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी सविस्तर चर्चा झाली.

## 'एसआयआर' केल्यास सर्व योजनांचा लाभ बंद होणार-महसूल मंत्री बावनकुळे

**मुंबई /प्रतिनिधी-** महाराष्ट्रासह देशात सध्या एसआयआरजोरदार चर्चा आहे. महाराष्ट्रात ३० जूनपासून एसआयआर सुरुवात झाली आहे. एसआयआर करणे म्हणजे मतदार यादी दुरुस्ती करणे असा आहे. बहुतांश लोक त्यांचे राहण्याचे ठिकाण बदलतात. कधी शिक्षणासाठी तर कधी नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने परराज्यात किंवा राज्यात इतरत्र जातात. त्यामुळे ती नावे तशीच राहतात आणि दुस-या ठिकाणीही पुन्हा नोंदणी होण्याचे प्रकार घडले आहेत. तसेच काहींची नावे, पत्ता चुकीचे राहिल्याने ते अपडेट झालेले नाहीत. एसआयआरमध्ये हे सर्व अपडेट केले जाते.



राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विशेष सखोल फेरतपासणी म्हणजेच एसआयआरसंदर्भात एक महत्त्वाचे विधान केले आहे. एसआयआर करणे गरजेचे आहे अन्यथा घर आहे पण फायदा नाही अशी अवस्था होणार आहे. मतदार नसल्यामुळे कुठलेच हक्क मिळणार नाहीत, असे वक्तव्य त्यांनी केल्यामुळे मतदार चलबिचल झाले आहेत. चंद्रशेखर बावनकुळे यांनी एका कार्यक्रमात या संदर्भात अत्यंत मोठे विधान केले आहे. त्यात महसूल मंत्री बावनकुळे यांनी आता जुन्या मतदारयाद्या रद्द होणार असून पुढील २० वर्षे नवीन यादी तयार होणार नाहीत, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत विशेष सखोल फेरतपासणी करण्याची संधी असून त्यानंतर काहीही होणार नाही, असे अधिकारवाणीने सांगितले आहे. आता एसआयआर न केल्यास २० वर्षे नवी मतदारयाद्या तयार होणार नाहीत. त्यामुळे ज्यांचे नावे मतदारयादीत नाही त्यांचे नाव पुन्हा कधीही मतदारयादीत येणार नाही, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले आहेत. एवढेच नाही तर रकफ न केल्यास मतदारयादीत नाव येणार नाही. त्यामुळे रेशन योजना, महिला बालकल्याण योजना, समाज कल्याण योजना आणि इतरही योजनांचा लाभ त्यांच्यासाठी बंद होणार आहे, अशा इशारा बावनकुळे यांनी दिला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे आधार आणि मतदारकार्ड योजनांना जोडले जाणार आहेत, याकडे त्यांनी लक्ष वेधले. दरम्यान, चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले आहेत की, मतदार नसल्याने कुठलाच हक्क असणार नाही.

# प्रियंका गांधी यांच्या शिक्षणमंत्र्यांसंदर्भातील विधानाने सभागृहात गदारोळ

### खुद्द जोशी ऊभे राहिले; सत्ताधारी–विरोधक भिडले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** लोकसभेत सध्या 'पब्लिक एक्झामिनेशन्स (अन्फेअर मीन्स) अमेंडमेंट बिल, २०२६' (अँटी पेपर लीक बिल) वर जोरदार चर्चा सुरू आहे. ही चर्चा सुरू असतानाच संसदेत जबरदस्त गदारोळ बघायला मिळत आहे. दरम्यान, काँग्रेस खासदार प्रियंका गांधी वाड्रा यांनी चर्चेत सहभागी होत केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना झालेल्या पोलीस मारहाणीचा मुद्दा उपस्थित केला. याशिवाय त्यांनी नवे शिक्षणमंत्री प्रल्हाद जोशी यांच्या संदर्भातही भाष्य केले. यामुळे प्रियंका गांधी आणि प्रल्हाद जोशी यांच्यात खडाजंगी बघायला मिळाली. याचवेळी सत्ताधारी आणि विरोधकही समोरासमोर आले.

प्रियंका म्हणाल्या, 'मी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्र्यांना विचारू इच्छिते की, शांततापूर्ण आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्याची काय गरज होती? त्यांच्यावर पॅलेट गन्स चालवण्याचे आदेश कोणी दिले? ते विद्यार्थी अतिरेकी होते का? सरकार तरुणांना एवढे का घाबरते? शिक्षण व्यवस्थेत आरएसएसच्या विचारसरणीचे प्रचारक भरले जात आहेत. आजपर्यंत एकाही पेपर लीक माफियाला कडक शिक्षा झालेली नाही.'

आपल्या भाषणादरम्यान प्रियंका गांधी यांनी नवे शिक्षणमंत्री प्रल्हाद जोशी यांच्यावर वैयक्तिक निशाणा साधला. त्या म्हणाल्या, 'जेथे डोळ्यांमध्ये लाज असायला हवी होती, तेथे नगाडे वाजवून स्वागत केले जात आहे. ज्या व्यक्तीने एका गर्भवती महिलेच्या बलात्कार प्रकरणातील आरोपींच्या सुटकेचे समर्थन केले होते, अशा व्यक्तीला पंतप्रधान मोदींनी शिक्षणमंत्रिपदावर बसवले आहे. यातून देशातील कोट्यवधी महिलांना काय संदेश दिला जातो?' असा सवाल प्रियंका यांनी केला. प्रियंका गांधींच्या



या विधानावर संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी तीव्र आक्षेप घेतला. 'प्रियंका गांधी यांनी नव्या शिक्षणमंत्र्यांवर केलेले आरोप पूर्णपणे चुकीचे आणि तथ्यहीन आहेत, त्यांनी यासंदर्भात माफी मागावी,' अशी मागणी त्यांनी केली.

**प्रल्हाद जोशींचंही थेट आव्हान -** प्रियंका गांधी यांच्या आरोपांनंतर खुद्द नवे शिक्षणमंत्री प्रल्हाद जोशीही आक्रमक झाले. त्यांनी प्रियंका गांधी यांना आपले विधान सभागृहात सिद्ध करण्याचे आव्हान दिले. यावर, प्रियंका यांनी वर्तमानपत्रातील एका वृत्ताचा दाखला देण्याचा प्रयत्न केला. मात्र लोकसभा अध्यक्षांनी हस्तक्षेप करत, वैयक्तिक आरोप-प्रत्यारोप थांबवून दोन्ही पक्षाला मूळ अँटी पेपर लीक विधेयकावर बोलण्याचे निर्देश दिले.

## आंदोलनात खुनाचे 101 आरोपी

**नवी दिल्ली** : कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) च्या निदर्शनात हत्येचे १०१ आरोपी सहभागी झाले होते. निदर्शनात आलेल्या २८७३ लोकांची गुन्हेगारी पार्श्वभूमी म्हणजेच गुन्हेगारी नोंद आढळली, ज्यात ९८९ लोकांवर गंभीर गुन्हे दाखल होते असा दावा दिल्ली पोलिसांनी केला आहे. त्यांची ओळख फेशियल रिकग्निशन सिस्टम (एफआरसी) आणि इतर तांत्रिक माध्यमांद्वारे करण्यात आली. पोलिसांनी दावा केला आहे की निदर्शनात सहभागी झालेल्या लोकांमध्ये हत्या, लैंगिक अत्याचार, पॉक्सो, दरोडा यासह इतर गंभीर प्रकरणांतील आरोपी आहेत. सीजेपीने २० जुलै रोजी संसद चलो मोर्चा काढला होता. यात पोलिसांनी विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज केला. २५ जुलैच्या संध्याकाळी धर्मेंद्र प्रधान यांनी शिक्षणमंत्रिपदाचा राजीनामा दिला. यानंतर आंदोलन संपले. दिल्ली पोलिसांनुसार, २० जुलैच्या संघर्षात ११८ हून अधिक पोलिस कर्मचारी जखमी झाले होते. यामध्ये विशेष आयुक्त, सह आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, डीसीपी, अतिरिक्त डीसीपी आणि एसीपी दर्जाच्या अधिका-यांव्यतिरिक्त अनेक महिला पोलिस कर्मचा-यांचाही समावेश होता.

## आंदोलनातील तरुणींवर खा.कंगनाची गलिच्छ टीका

**नवी दिल्ली :** भाजप खासदार आणि अभिनेत्री कंगना राणावतने मंगळवारी काकरोच जनता पार्टीच्या आंदोलनात सहभागी झालेल्या हिंदू तरुणींवर अत्यंत टोकाची आणि वादग्रस्त टीका केली आहे. जनरेशन गटर अशी उपाधी देत, त्यांच्या जीवनशैली, वर्तन आणि आंदोलनाच्या पद्धतीवर कठोर शब्दांत निशाणा साधला. तिच्या या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. कंगना रानावतने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीद्वारे एक भलीमोठी पोस्ट शेअर करत आंदोलनात सहभागी झालेल्या हिंदू तरुणींवर टीका केली. काही जणी स्वतःला आधुनिक आणि स्वतंत्र दाखवण्याचा प्रयत्न करतात; मात्र त्या स्वातंत्र्याची जबाबदारी स्वीकारत नाहीत, असा दावा केला. जर तुम्ही जबाबदारीची जाणीव न ठेवता मुक्त जीवन जगण्याचा प्रयत्न केला, तर तुम्ही केवळ एक बिघडलेली व्यक्ती आहात. त्या मुली अमली पदार्थ घेणे, मद्यपान करणे किंवा अनेक जोडीदारांशी लैंगिक संबंध ठेवणे या स्वातंत्र्यांचे अभिमानाने प्रदर्शन करतात; हे सर्व करताना त्या निर्लज्जपणे आपल्या पालकांच्या कमाईवर जगतात. प्रत्यक्षात स्वतंत्र नसतानाही मुक्तजीवन जगण्याच्या अधिकारासाठी सतत लढत असतात. मी तुम्हाला एक साधी गोष्ट आठवण करून देते: मुक्तजीवन हे कमवावे लागते. जबाबदारी न स्वीकारता स्वातंत्र्याचा आव आणणारे लोक गटर छाप आहेत असेही तिने आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.**ही तर जेनरेशन गटर-**कंगनाने तरुण पिढीवर जोरदार हल्लाबोल केला. ही तथाकथित पाश्चात्त्य विचारसरणी असलेल्या भारतीय महिलांची नवी पिढी आहे. मी यांना जेनरेशन गटर म्हणते असा घणाघात तिने केला. या महिला अभ्यासात चांगल्या नाहीत. त्या इतक्या कुरूप आणि भ्रष्ट आहेत की एक चांगली गृहिणीसुद्धा बनू शकत नाहीत. असे असूनही, त्या अमली पदार्थ आणि मद्यपान करण्याच्या किंवा अनेक जोडीदारांशी लैंगिक संबंध ठेवण्याच्या आपल्या स्वातंर्त्याचे अभिमानाने प्रदर्शन करतात, असे ती म्हणाली.



**कंगना आणखी काय म्हणाली?-**नीट पेपरफुटीचा निषेध करण्यासाठी आणि तत्कालीन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी जमलेल्या तरुणींच्या वर्तनावर निशाणा साधताना, कंगना म्हणाली की, या महिला आंदोलकांना स्वतंत्र करिअर असलेल्या महिलांचे जीवन अनुकरण करायचे आहे, पण त्यासाठी आवश्यक असलेले स्वातंर्त्य स्वतः कमावलेले नाही.

## पहिल्या टप्प्यात 6 लाखांवर शेतक-यांना कर्जमाफी!

**मुंबई /प्रतिनिधी-**राज्यात सध्या शेतकरी कर्जमाफीची जोरदार चर्चा सुरू असून, पात्र शेतक-यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जात आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत २ याद्या जाहीर करण्यात आल्या असून, लवकरच तिसरी यादी प्रसिद्ध होणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेच्या पहिल्या टप्प्यात मराठवाड्यातील तब्बल ६ लाख १८ हजार २९९ शेतक-यांना कर्जमुक्तीचा मोठा लाभ मिळाला आहे. पहिल्या टप्प्यात सर्वाधिक लाभ जालना जिल्ह्यातील १ लाख ७५ हजार शेतक-यांना मिळाला असून, परभणी आणि लातूर जिल्ह्यांचा अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक लागतो. मात्र, या लाभाची रक्कम थेट बँक खात्यात जमा होण्यासाठी ई-केवायसी आणि आधार प्रमाणीकरण अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व पात्र शेतक-यांनी वेळेत केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. कर्जमाफीसाठी पात्र असलेल्या शेतक-यांची अधिकृत यादी त्यांनी ज्या बँकेतून कर्ज घेतले आहे, त्या संबंधित बँकेच्या शाखेत प्रकाशित करण्यात आली आहे. शेतकरी तेथे जाउन आपले नाव तपासू शकतात. दरम्यान, ज्या शेतक-यांचे कर्ज २ लाख रुपयांच्या आत आहे, त्यांनी कोणत्याही परिस्थितीत पैसे भरण्याची गरज नाही, तसेच बँक अधिकारी शेतक-यांना कोणताही त्रास देउ शकणार नाहीत, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले. जर एखाद्या शेतक-याला कर्जमाफीचा लाभ नाकारला गेला असेल तर कागदपत्रांमधील त्रुटी हे त्यामागचे कारण असू शकते. २ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असलेल्या शेतक-यांना उर्वरित रक्कम भरण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात आला आहे, असेही सांगण्यात आले. सध्या या योजनेच्या दोन याद्या जाहीर झाल्या असून, लवकरच पुढील याद्यादेखील टप्प्याटप्प्याने जाहीर केल्या जातील. राहिलेल्या पात्र शेतक-यांना पुढील टप्प्यात नक्कीच कर्जमुक्तीचा लाभ मिळेल, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.



## 21 विद्यार्थ्यांचे बळी घेणा-या प्रधानांचे सुपरस्टारसारखे स्वागत

**नवी दिल्ली :** माजी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नुकताच दिलेल्या राजीनाम्यानंतर, भाजपच्या खासदारांनी संसद परिसरामध्ये त्यांचे स्वागत केले. त्यावर बोलताना काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी त्यावरून सत्ताधा-यांवर जोरदार टीका केली असून २१ निष्पाप विद्यार्थ्यांचा बळी घेणारे धर्मेंद्र प्रधान यांचे संसद परिसरात एखाद्या सुपरस्टारसारखे स्वागत झाले. भाजपचे हे कृत्य अत्यंत लाजिरवाणे आहे असे त्यांनी म्हटले आहे. देशभरात विद्यार्थ्यांनी केलेल्या तीव्र आंदोलनानंतर धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला होता. त्यानंतर संसद परिसरात भाजपच्या काही नेत्यांनी त्यांना पारंपरिक टोपी आणि उपरणे घालून प्रधान जिंदाबादच्या घोषणा देत त्यांचे स्वागत केले. दुसरीकडे, विरोधी पक्षाच्या खासदारांनी यावर जोरदार आक्षेप घेत चोर, चोर, पेपर चोर अशा घोषणा देत सरकारचा निषेध नोंदवला.हे लाजीरवाणे नाही का? धर्मेंद्र प्रधान यांनी कोणत्या परिस्थितीत राजीनामा दिला हे संपूर्ण देशाने पाहिले आहे. तरीही काल संसद परिसरात त्यांचे अशा प्रकारे स्वागत करण्यात आले, जणू ते कोणी सुपरस्टारच आहेत. मोदी सरकारवर आज कोणीही विश्वास ठेवू शकत नाही, कारण अजूनही विद्यार्थ्यांचा छळ केला जात आहे.












## जाहीर सूचना

**सर्व लोकांना कळविण्यात येते की, माझे अशिल रिलायन्स प्रोग्रेसिव्ह ट्रेडर्स प्रा.लि.कंपनी यांनी सर्वश्री शेषराव बापुराव गोयटे, राजेंद्र महादेवराव कुरळकर व ए.आर.रिएल्टी तर्फे रामदास कोल्हाजी हेकडे यांचे विरुध्द खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचा मालकी हक्काने ताबा मिळविण्याकरीता वि.पाचवे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात वि.दि.दावा क्र.३११/२०२६ हा दावा दाखल केलेला आहे. सदर प्रकरणी प्रतिवादींचे विरुध्द त्यांनी वाद मिळकतीचे हस्तांतरण करु नये व स्वरुप बदलू नये यासाठी अंतरिम मनाई आदेशाचा अर्ज देखील केलेला आहे.**

मालमत्तेचे वर्णन

मौजे **निंभोरा खुर्द, ता.व जि.अमरावती येथील, महानगरपालिकेचे हद्दीतील भूमापन क्र.५६/१-ब पैकी ०१ हेक्टर २१ आर (१२१४१ चौ.मिटर) ही वाणिज्य वापरासाठी रुपांतरित झालेली खुली जागा, याची चतुःसिमा--**

**पुर्वेस - अमरावती-बडनेरा रोड,**
**पश्चिमेस - भूमापन क्र.५६/१-ड**
**उत्तरेस - भूमापन क्र.५६/१-अ**
**दक्षिणेस - भूमापन क्र.५६/१-ब मधील उर्वरित भाग व ५६/१-क.**

**प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे वरील मालमत्तेसंबंधी कोणीही वर नमूद व्यक्तिसोबत हस्तांतरणाचा कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. केल्यास तो माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.**


ॲड.किशोर देशपांडे,
**१२, विनोद स्टेट बँक कॉलनी,**
**कॅम्प, अमरावती-४४४६०२**
**मो.९८८१५७४९५४**

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# मोटार पंप चोरी करणारी टोळी जेरबंद!

**मोर्शी/प्रतिनिधीः-** पोलीस स्टेशन मोर्शी येथील स्कॉड विभागाच्या पथकाने मोटार पंप चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला असून चार आरोपींना दि.२७ जुलै रोजी अटक करण्यात आली. मोर्शी पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या अनुषंगाने मोर्शी शहराला लागूनच असलेल्या शेत शिवारात शेतकऱ्यांच्या शेतातील मोटार पंप चोरी करणारी टोळी सक्रिय झाली असल्याच्या माहितीवरून मोर्शी पोलीस स्टेशनच्या स्कॉड विभागाच्या पथकाने मौजा तुळजापूर एमआयडीसी रोडवर सापळा रचून चार आरोपींना रंगेहात पकडून ताब्यात घेतले.चौकशी दरम्यान आरोपींनी सदर गुन्ह्यासह इतर चोरीच्या घटनांची सुद्धा कबुली दिली.आरोपी अक्षय राजेश खाताकर (वय २६, रा.चिखलसावंगी,ता. मोर्शी,जि.अमरावती), उमेश फॅगनसिंग उईके (वय २५,रा.गाळणी,ता. मुलताई,जि.बैतूल(म.प्र.), हल्ली मुक्काम चिखल सावंगी,ता.मोर्शी) सूरदास भोजराज इडपाचे (वय ४२,रा.दापोरी,ता. मोर्शी,जि.अमरावती, हल्ली मुक्काम चिखल सावंगी) करण रामराव कुमरे (वय २५,रा.चिखल सावंगी,ता.मोर्शी,जि. अमरावती) यांचेकडून चोरीला गेलेल्या मोटार पंप व गुन्ह्यात वापरलेली मोटार सायकल एकूण किंमत रुपये १,५,००० व ३,०००/- रुपये नगदी, चोरीस गेलेले लोखंड व इलेक्ट्रिक केबल किंमत



११,००० रुपये असा एकूण १,१९,००० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या कार्यवाहीमध्ये एकूण ४ चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

अक्षय राजेश खाताकर याच्याविरुद्ध IPC तसेच महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अंतर्गत पूर्वीचे ३ गुन्हे दाखल आहेत. सूरदास भोजराज इडपाचे याच्याविरुद्ध गंभीर स्वरूपाचे २ गुन्हे दाखल आहेत.उमेश फॅगनसिंग उईके याच्याविरुद्ध १ गुन्हा दाखल आहे. करण रामराव कुमरे याच्याविरुद्ध चोरीचे गुन्हे पूर्वीपासून दाखल आहेत. या अट्टल चोरट्यांना मोर्शी पोलिसांनी ताब्यात घेतल्यामुळे विविध चोरीच्या घटना उघडकीस येण्याची शक्यता बळावली आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वात पोउपनि तुषार चव्हाण, अंमलदार छत्रपती करपते,स्वप्नील बायस्कर, अथर्व कोहळे यांनी केली असून पुढील तपास सुरू आहे.

# AICTE च्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार समितीवर डॉ. स्मिता देशमुख यांची नियुक्ती

## राष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक नेतृत्वाची दखल; विदर्भाच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाचा क्षण

**अमरावती/प्रतिनिधीः-** मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्मिता रावसाहेब देशमुख यांची अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद (AICTE), नवी दिल्ली यांच्या वतीने राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार (National Award to Teachers – NAT 2026) अंतर्गत प्राप्त झालेल्या नामांकनांच्या मूल्यमापनासाठी स्थापन करण्यात आलेल्या प्रिलिमिनरी सर्च-कम-स्क्रिनिंग कमिटीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे डॉ. देशमुख यांच्या शैक्षणिक नेतृत्वाला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून, अमरावतीसह संपूर्ण विदर्भासाठी ही अभिमानाची बाब ठरली आहे.

AICTE च्या PMSSS सेलचे संचालक गुज्जू मनुस्री यांनी जारी केलेल्या अधिकृत पत्राद्वारे ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. देशभरातील विद्यापीठे, अभियांत्रिकी महाविद्यालये आणि पॉलिटेक्निक संस्थांमधून राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी प्राप्त झालेल्या अर्जांचे परीक्षण करून पात्र उमेदवारांची प्राथमिक निवड करण्याची अत्यंत महत्त्वपूर्ण



जबाबदारी या समितीवर सोपविण्यात आली आहे.

शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, गुणवत्तापूर्ण अध्यापन, प्रभावी शैक्षणिक प्रशासन, संशोधनाला दिलेली चालना, विद्यार्थी-केंद्रित उपक्रम आणि दीर्घ अनुभवाच्या बळावर डॉ. स्मिता देशमुख यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत AICTE ने त्यांची या प्रतिष्ठित समितीवर निवड केली आहे. समिती राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी प्राप्त झालेल्या अर्जांचे सखोल मूल्यमापन करून अंतिम निवडीसाठी शिफारसी करणार आहे.

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार (NAT 2026) हा उच्च शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट अध्यापन, संशोधन, नवोपक्रम, विद्यार्थी विकास आणि शैक्षणिक योगदानाचा गौरव करणारा देशातील सर्वोच्च सन्मानांपैकी एक मानला जातो. यावर्षीचे पुरस्कार ५ सप्टेंबर २०२६, शिक्षक दिनानिमित्त प्रदान करण्यात येणार आहेत.

डॉ. स्मिता देशमुख यांची राष्ट्रीय स्तरावरील या समितीवर झालेली नियुक्ती ही केवळ त्यांचा वैयक्तिक सन्मान नसून मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती, संपूर्ण विदर्भ आणि महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्राच्या गुणवत्तेची राष्ट्रीय स्तरावर झालेली नोंद असल्याची भावना शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे. त्यांच्या या यशाबद्दल शिक्षणतज्ज्ञ, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी तसेच विविध सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सैफिया शाळेसमोर भरधाव ट्रकची सायकलला धडक

## शाळकरी विद्यार्थिनी थोडक्यात बचावल्या



**अमरावती/प्रतिनिधीः-** वलगाव रोडवरील सैफिया स्कूलच्या समोर आज मंगळवार २८ जुलैच्या सकाळी ८ वाजता एका शालेय विद्यार्थिनीला मोठ्या लोडिंग ट्रकने जोरदार धडक दिली.सुदैवाने विद्यार्थिनी थोडक्यात बचावली. अपघाता नंतर परिसरात एकच गोंधळ उडाली. माहितीनुसार विद्यार्थिनी सायकलवरून शाळेकडे जात होती. मागून येणाऱ्या १२ चाकी ट्रकने तिला धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की विद्यार्थिनीची सायकल चिरडली गेली आणि तिचा आरडाओरडा ऐकून परिसरातील लोक धावून आले. दुसरीकडे फेरीवाल्याला किरकोळ दुखापत झाली.

अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ एमआयडीसी पोलीस ठाण्याला माहिती दिली.घटनेची माहिती मिळताच एमआयएमचे नगरसेवक सनाउद्दीन खान, राशिद अली आणि इतर नगरसेवक तसेच अभिभावक थेट गाडगे नगर पोलीस ठाण्यात पोहोचले. त्यांनी शाळेच्या वेळेत परिसरातून जाणाऱ्या अवजड ट्रक आणि मोठ्या वाहनांवर तात्काळ बंदी घालण्याची मागणी केली. त्यांचे म्हणणे आहे की, या भागातून रोज हजारो विद्यार्थी ये-जा करतात. परिसरात ट्रक उभे करणे आणि त्यांची ये-जा पूर्णपणे बंद करावी. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. शाळेच्या वेळेत जड वाहनांच्या वाहतुकीवर निर्बंध घालण्याच्या मागणीवर विचार केला जाईल, असे आश्वासन दिले.

# मोटरसायकल चोरीप्रकरणातील फरार आरोपीला अटक

## -मध्यप्रदेशातून दोन मोटरसायकली जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** मोटरसायकल चोरीप्रकरणातील फरार आरोपीला अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीणला यश आले आहे. आरोपीने चौकशीदरम्यान अमरावती शहर व नागपूर येथून आणखी दोन मोटरसायकली चोरल्याची कबुली दिली असून, मध्यप्रदेशातील बैतूल जिल्ह्यातून त्या जप्त करण्यात आल्या आहेत.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव राम ऊर्फ शुभम सुभाष जाधव (वय २२, रा. बेनोडा, ता. वरूड) असे आहे.वरूड पोलीस ठाण्यात २६ जून २०२६ रोजी निलेश वैजनाथ मेश्राम यांच्या तक्रारीवरून मोटरसायकल चोरीचा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू होता. दरम्यान, ३ जुलै रोजी चोरीस गेलेली मोटरसायकल जप्त करण्यात आली होती. मात्र मुख्य आरोपी शुभम जाधव हा तेव्हापासून फरार होता.२८ जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मोर्शी-वरूड उपविभागात गस्त घालत असताना गोपनीय माहितीच्या आधारे बेनोडा येथून आरोपीला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने वरूड येथील मोटरसायकल चोरीची कबुली दिली. तसेच अमरावती शहर व नागपूर येथून आणखी दोन मोटरसायकली चोरल्याचेही त्याने सांगितले. आरोपीच्या माहितीनुसार मध्यप्रदेशातील बैतूल जिल्ह्यातील कुंभीखेडा येथे ठेवण्यात आलेल्या हिरो स्प्लेंडर प्लस कंपनीच्या दोन मोटरसायकली, अंदाजे ५५ हजार किमतीचा मुद्देमाल, पोलिसांनी पंचांसमक्ष जप्त केला. आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कारवाईसाठी वरूड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक आकाश शिवणकर तसेच गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# सिपना नदीत बुडालेल्या तरुणाचा मृतदेह आढळला

**अमरावती/प्रतिनिधीः-** धारणी तालुक्यातील उतावली गावा जवळील सिपना नदीत बुडालेल्या तरुणाचा मृतदेह दुसऱ्या दिवशी बाहेर काढण्यात शोध आणि बचाव पथकाला यश आले आहे. पुढील कायदेशीर कारवाई साठी मृतदेह पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. माहितीनुसार उतावली गावातील चंद्रकांत हरिदास पटेल (वय ३५) सोमवारी रोजी सकाळी ६.३० वाजता सिपना नदीत पोहायला गेला होते. पावसाळ्यामुळे नदीतील पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने तो पाण्याच्या जोरदार प्रवाहात वाहून गेला आणि बुडाला.ग्रामस्थांनी तात्काळ धारणी पोलिसांना माहिती दिली.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन आपत्ती व्यवस्थापन आणि जिल्हा नियंत्रण कक्षाला कळवले. सोमवारी पहिल्या दिवशी संध्याकाळपर्यंत शोध मोहीम चालली, मात्र नदीची खोली ३५ ते ४० फूट आणि खडकाळ रचना



असल्याने यश आले नाही. अंधारामुळे मोहीम तात्पुरती थांबवण्यात आली. गोताखोरांनी गळ आणि हुकच्या मदतीने शोध सुरू केला आणि सुमारे २० मिनिटांतच चंद्रकांत पटेल यांचा मृतदेह नदीतून बाहेर काढण्यात आला. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या निर्देशानुसार आणि निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांच्या मार्गदर्शना खाली रेस्क्यू पथकातील सचिन धरमकर, आकाश निमकर, मुकेश सदाशिव, सचिन पवार, गणेश कारंदेकर, मनीष उताणे, प्रफुल भुसारी, अजय आसोले, धीरज येवले, साजन तारोकर आणि दीपेश पाटोळकर यांनी मृतदेह बाहेर काढण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले.

## १ व १० वरिल उर्वरित

### भरधाव टिप्परची मोपेडला धडक

धर्माळे (२७, रा. बोरगाव धर्माळे ) आणि त्यांची मावशी हर्षा आदेशराव गावंडे (३८, रा. भटवाडी, गोपाळनगर, अमरावती) यांचा मृत्यू झाला. दोघी खरेदी करून एमएच-२७/ईबी-९७८७ क्रमांकाच्या मोपेडने घरी परतत असताना राजापेठकडून बडनेऱ्याकडे जाणाऱ्या उड्डाणपुलावर गिट्टीने भरलेल्या भरधाव टिप्परने त्यांच्या दुचाकीला मागून जोरदार धडक दिली. धडकेनंतर दोघी रस्त्यावर फेकल्या गेल्या आणि टिप्परच्या चाकाखाली आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, अपघात घडविणाऱ्या टिप्परवर क्रमांक प्लेट नव्हती. त्यामुळे नियमांची पायमल्ली करून अवजड वाहने शहरात कशी धावत आहेत, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन वाहतूक सुरळीत केली. पंचनामा करून मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले. रुग्णालयात नातेवाईकांनी मोठी गर्दी केली असून परिसर शोकमय झाला होता. महापौर श्रीचंद तेजवानी, यांच्यासह विविध मान्यवरांनी रुग्णालयात जाऊन मृतांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. दरम्यान, राजापेठ पोलिसांनी अपघाताचा गुन्हा नोंदवून टिप्परचालकाचा शोध सुरू केला आहे.

**घटनास्थळावर रक्ताचा सडा-** अपघात घडल्यानंतर ट्रक चालकाने घटना स्थळावरून पळ काढला. संबंधित ट्रकला नंबर प्लेट नसल्यामुळे चालकाचा व गाडीचा क्रमांक अद्याप निष्पन्न होऊ शकलेला नाही. अपघात एवढा भीषण होता की, घटनास्थळावर रक्ताचा सडा पडला होता. अनियंत्रित वाहतूक व्यवस्थेमुळे ही घटना घडली.

### आयुक्तालय हद्दीत जुगार अड्ड्यांवर

जुगार अड्ड्यांवर मोठा आघात केला. वलगावसह फ्रेजरपुरा, गाडगेनगर, नागपुरी गेट आणि बडनेरा पोलीस ठाण्यांच्या हद्दीत करण्यात आलेल्या कारवायांमध्ये एकूण २८ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून २,४१,७४० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

२७ जुलै रोजी गुन्हे शाखेची पथके गस्त घालत असताना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ग्राम साहूर येथे एक्का-बादशा जुगाराच्या अड्ड्यावर छापा टाकण्यात आला. या कारवाईत २२ जणांना ताब्यात घेऊन २,३३,२०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ व ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. याच दिवशी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत शुक्रवार बाजार व यशोदानगर परिसरात वरली जुगार खेळणाऱ्या चार जणांविरुद्ध दोन स्वतंत्र कारवाया करण्यात आल्या. त्यांच्याकडून रोख रक्कम व जुगार साहित्य असा ५,२४० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सिद्धार्थनगर परिसरात वरली जुगार खेळणाऱ्या एका आरोपीकडून १,५००, तर नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत अकबरनगर नाल्याजवळील कारवाईत एका आरोपीकडून १,८०० रोख रक्कम व जुगार साहित्य जप्त करण्यात आले. या सर्व आरोपींविरुद्ध कलम १२(अ), महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले. २८ जुलै रोजीही कारवायांचा धडाका सुरूच राहिला. फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील व्यंकय्यापुरा येथे वरली जुगार खेळताना दोन आरोपींना अटक करण्यात आली, तर अवैध धंद्याचा मालक शिरीष उर्फ शेरा मडावी हा फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईत १,१४० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कंपासपुरा चौकात वरली जुगार खेळताना एका आरोपीला ताब्यात घेऊन १,७१० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही प्रकरणांत कलम १२(अ), महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस आयुक्तालयाच्या या सलग कारवायांमुळे शहरातील अवैध जुगार व्यवसाय चालविणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, अशा कारवाया यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### सायखेडा मध्यम प्रकल्प १०० टक्के

मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू झाला असून नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन पाटबंधारे उपविभाग क्रमांक ५, पांढरकवडा यांनी केले आहे.

उपविभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग क्र. ५, पांढरकवडा यांनी केळापूरचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलीस प्रशासन व संबंधित यंत्रणांना याबाबत अधिकृत पत्र पाठवून आवश्यक खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू झाल्याने सायखेडा, लिंबी, मौदा, पिंपरी, आंबळी, पांढरकवडा, केळापूर, तातेपूर, झुगरगाव, डोकी, सावरदा, वलगाव, पाटणबोरी, बेलोरा तसेच नदीकाठच्या इतर गावांमध्ये पाण्याची पातळी वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

प्रशासनाने नागरिकांना नदी, नाले आणि सांडव्याजवळ जाणे टाळण्याचे, पूरस्थिती निर्माण झाल्यास सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याचे आणि स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. तसेच महसूल, पोलीस व पाटबंधारे विभागाला परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने पुढील काही दिवस पावसाच्या तीव्रतेनुसार विसर्गात बदल होऊ शकतो. त्यामुळे नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांवरच विश्वास ठेवावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### ७ लाखांच्या चोरीचा गुन्हा ४८

एकूण ७,०६,९४४ किमतीचा ऐवज चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा तपास सुरू असताना डी.बी. पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार फिर्यादीच्या हॉटेलमध्ये काम करणारा नदीम खान भुरे खान पठाण (वय २५, रा. इतवारा बाजार) हा संशयास्पदरीत्या फिरताना आढळला. पोलिसांना पाहताच तो पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्याला ताब्यात घेण्यात आले. झडतीदरम्यान त्याच्याकडून चोरीतील सोन्याचे मंगळसूत्र जप्त करण्यात आले. कसून चौकशी केली असता आरोपीने गुन्ह्याची कबुली देत मालकाच्या घराची पूर्वीच रेखी करून चोरी केल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी चोरीतील सोन्याची चेनही जप्त केली. अशाप्रकारे चोरीतील जवळपास संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके आणि सहाय्यक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके यांच्या नेतृत्वात डी.बी. पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. आरोपीला न्यायालयात हजर करून पुढील तपास नागपुरी गेट पोलीस करीत आहेत.

### ३७७ हरविलेले व चोरीचे मोबाईल

८०० इतकी आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, प्रांजली सोनवणे, तसेच सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनात पार पडली. पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिकेत कासार यांच्या नेतृत्वाखाली सायबर पोलीस स्टेशन व विविध पोलीस ठाण्यांच्या सायबर पथकांनी ही मोहीम यशस्वी केली.

**नागरिकांना पोलिसांचे आवाहन-** मोबाईल हरविल्यास किंवा चोरीस गेल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी आणि सी ई आय आर पोर्टलवर त्याची नोंद करावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. तसेच ऑनलाइन आर्थिक फसवणूक, सायबर गुन्हे किंवा सोशल मीडियाशी संबंधित गुन्ह्यांबाबत त्वरित राष्ट्रीय सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधावा किंवा संबंधित सायबर गुन्हे पोर्टलवर तक्रार नोंदवावी, असेही पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे.

### ब्लॅकमेलिंगच्या छळाला कंटाळून

कथित त्रासामुळे आपण प्रचंड मानसिक तणावात असल्याचे त्यांनी सांगितल्याचा उल्लेख फिर्यादीत आहे. २७ जुलै रोजी दुपारी गावातील नागरिकांनी रामराव खोब्रागडे यांनी बाळू उत्तमराव खंडारे यांच्या शेतातील निंबाच्या झाडाला गळफास घेतल्याची माहिती दिली.

घटनास्थळी धाव घेतली असता त्यांचा मृतदेह झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळला. पंचनाम्यावेळी पोलिसांनी मृताच्या खिशाची तपासणी केली असता सुसाइड नोट आढळून आली. या चिठ्ठीत संबंधित महिला खोट्या प्रकरणात अडकविण्याची धमकी देत पैशांची मागणी करत असल्याचा उल्लेख असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. या कथित मानसिक छळाला कंटाळून आत्महत्या करत असल्याचेही त्यात नमूद असल्याचा दावा फिर्यादीने केला आहे.

सुसाइड नोट आणि फिर्यादीच्या तक्रारीच्या आधारे राहीमापूर पोलिसांनी संबंधित महिलेविरुद्ध भारतीय न्याय संहितेअंतर्गत आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### अचलपूर विधानसभा मतदारसंघातील

नायगाव परिसरातील तब्बल ५५० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी आवश्यक कालवे व पूरक कामे तातडीने हाती घेण्याचे आदेश देण्यात आले. या कामामुळे परिसरातील शेतकऱ्यांना बारमाही सिंचनाची सुविधा उपलब्ध होणार आहे.तसेच सापन प्रकल्पातून करजगाव प्रकल्पाला पाणी सोडण्याचा, तसेच बोर्डी नाला प्रकल्पातून भागडी प्रकल्पाला पाणी उपलब्ध करून देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. या दोन्ही कामांची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश संबंधित विभागांना देण्यात आले.

पिंपरी बॅरेज व राजना बॅरेज या महत्त्वाच्या प्रकल्पांची सर्व तांत्रिक, प्रशासकीय व कायदेशीर प्रक्रिया एका महिन्याच्या आत पूर्ण करून प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे स्पष्ट आदेश मंत्री गिरीश महाजन यांनी अधिकाऱ्यांना दिले.

बैठकीत वासिनी सिंचन प्रकल्पाचाही आढावा घेण्यात आला. न्यायालयीन प्रक्रियेमुळे प्रकल्पाला झालेला विलंब, त्यामुळे वाढणारा खर्च आणि भविष्यात शासनावर पडणारा अतिरिक्त आर्थिक भार याकडे आ. बच्चू कडू यांनी लक्ष वेधले. प्रकल्पातील सर्व अडथळे दूर करून कामाला गती देण्याचे आदेशही बैठकीत देण्यात आले.

बैठकीदरम्यान आ. बच्चू कडू यांनी स्पष्टपणे सांगितले की, योग्य नियोजन व प्रशासनातील समन्वयातून ही बहुतांश कामे अतिरिक्त निधीशिवाय पूर्ण होऊ शकतात. त्यानंतर मंत्री गिरीश महाजन यांनी प्रत्येक प्रकल्पाचा कालबद्ध कार्यक्रम तयार करून नियमित आढावा घेण्याचे आदेश सचिव व वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले.

**मेंढपाळांच्या प्रश्नांवर शासनाचा निर्णायक निर्णय-**

दरम्यान, राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात मेंढपाळांच्या विविध प्रश्नांवर स्वतंत्र उच्चस्तरीय बैठक पार पडली. मेंढपाळ नेते अर्जुन महानर यांनी केलेल्या आमरण उपोषणानंतर ही बैठक घेण्यात आली. बैठकीस महसूल, वन, पशुसंवर्धन, पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच अमरावती विभागातील मेंढपाळांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत आ. बच्चू कडू यांनी वनहक्क समितीच्या धर्तीवर स्वतंत्र 'मेंढपाळ वनहक्क समिती' स्थापन करून चराईचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्याची मागणी केली. या मागणीची दखल घेत स्वतंत्र समिती स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले.

तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात महसूल विभागाच्या उपलब्ध जमिनी मेंढपाळांच्या चराईसाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश संबंधित विभागांना देण्यात आले.

मेंढपाळांच्या मेंढ्या व शेळ्यांसाठी विमा योजना पुढील १५ दिवसांत सुरू करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे आदेश पशुसंवर्धन विभागाला देण्यात आले. यासोबतच पशुधनाचे लसीकरण, आरोग्य तपासणी, चराई क्षेत्राचे नियोजन, तसेच मेंढपाळांवरील प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचेही आदेश देण्यात आले.

राज्याबाहेरून महाराष्ट्रात येणाऱ्या पशुधनाची राज्याच्या सीमेवर आरोग्य तपासणी करूनच प्रवेश देणे, तसेच महाराष्ट्रातील पशुधन संसर्गजन्य आजारांपासून सुरक्षित राहील यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेशही बैठकीत देण्यात आले.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, २९ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com



# समग्र आरोग्य, भारतीय जीवनमूल्ये आणि कृषी संस्कृतीचा अकोल्यात अनोखा संगम

## ‘पद्मालय वेलनेस आयुर्वेद व निसर्गोपचार’ आणि ‘अ‍ॅग्रोन कृषी पर्यटन केंद्र’चे १ ऑगस्टला लोकार्पण

## केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते उद्घाटन

■ प्रतिनिधी | अकोला ■

*‘आरोग्य हेच खरे धन आणि निसर्ग हाच खरा वैद्य!’ या भारतीय तत्त्वज्ञानाचा आधुनिक आविष्कार अकोल्यात साकारत आहे. विज्ञान आणि संस्कृती, परंपरा आणि आधुनिकता, आरोग्य आणि पर्यावरण, शेती आणि जीवनमूल्ये यांचा सुरेख संगम घडविणाऱ्या ‘पद्मालय वेलनेस आयुर्वेद व निसर्गोपचार’ तसेच ‘अ‍ॅग्रोन कृषी पर्यटन केंद्र’ या दोन महत्त्वपूर्ण उपक्रमांचे लोकार्पण १ ऑगस्ट २०२६ रोजी भारत सरकारचे आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे.*



डॉ. मनोज अग्रवाल
फाऊंडर डायरेक्टर



डॉ. वर्षा अग्रवाल
मुख्य कार्यकारी अधिकारी





आजच्या वेगवान युगात माणसाकडे सुखसोयी वाढल्या; मात्र मनःशांती, संतुलित आरोग्य आणि निसर्गाशी असलेले नाते दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. मधुमेह, रक्तदाब, लठ्ठपणा, मानसिक ताण, निद्रानाश यांसारखे जीवनशैलीजन्य आजार वाढत असताना उपचारापेक्षा प्रतिबंधात्मक आरोग्याची गरज अधिक अधोरेखित होत आहे. अशा काळात अकोल्यात उभे राहिलेले हे दोन्ही उपक्रम केवळ संस्था नसून, निरोगी आणि संस्कारित समाजाच्या उभारणीचा व्यापक संकल्प आहेत. अग्रवाल परिवाराच्या सामाजिक बांधिलकीतून उभ्या राहिलेल्या या प्रकल्पामागे नफा नव्हे, तर समाजहिताचा विचार केंद्रस्थानी आहे.

**निसर्गाकडे परतण्याचा नवा मार्ग!**

पद्मालय वेलनेस आयुर्वेद व निसर्गोपचाराचे फाऊंडर डायरेक्टर डॉ. मनोज अग्रवाल यांनी भारतीय आयुर्वेद, योगशास्त्र, निसर्गोपचार आणि आधुनिक आरोग्यशास्त्राचा अभ्यासपूर्वक मेळ घालत या प्रकल्पाची संकल्पना साकारली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. वर्षा अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली गुणवत्तापूर्ण, शास्त्रशुद्ध आणि मानवी मूल्यांवर आधारित आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचे काम केले जाणार आहे.

पद्मालय वेलनेस सेंटरमध्ये योग चिकित्सा, पंचकर्म, आयुर्वेद, निसर्गोपचार, जल चिकित्सा, आहार चिकित्सा, कोलोन हायड्रोथेरपी, मॅग्नेटोथेरपी, अग्निकर्म, विध्दकर्म यांसह ४० हून अधिक उपचार आणि वेलनेस सेवा उपलब्ध आहेत. येथे उपचार म्हणजे केवळ रोग बरा करणे नव्हे, तर शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल साधत जीवनशैलीत सकारात्मक परिवर्तन घडविणे, हा मूलभूत विचार आहे.

प्रत्येक व्यक्तीची प्रकृती, मानसिक अवस्था, आहार, दैनंदिन सवयी आणि आरोग्याच्या गरजा लक्षात घेऊन वैयक्तिक आरोग्य आराखडा तयार केला जाणार आहे. सात्त्विक आहार, निवासी वेलनेस कार्यक्रम, योग-ध्यान, पंचकर्म, डिटॉक्स थेरपी, प्रशस्त निवासी व्यवस्था, पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र उपचार विभाग आणि शांत, हिरवाईने नटलेले वातावरण यामुळे हे केंद्र आरोग्याच्या सर्वांगीण अनुभवाचे नवे केंद्र ठरणार आहे. याच परिसरात उभारण्यात आलेले ‘अ‍ॅग्रोन कृषी पर्यटन केंद्र’ ग्रामीण भारताचे जिवंत दर्शन घडविणारे केंद्र म्हणून विकसित करण्यात आले आहे. शेती, सेंद्रिय कृषी, जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण, भारतीय कालगणना, ग्रामीण संस्कृती आणि पारंपरिक जीवनपद्धती यांचा प्रत्यक्ष अनुभव येथे मिळणार आहे. विशेषतः विद्यार्थी, युवक आणि शहरी कुटुंबांना भारतीय कृषी संस्कृतीची नव्याने ओळख करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हे केंद्र करणार आहे.

उद्घाटन सोहळ्यास ह.भ.प. संजय महाराज पाचपोर, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाघ यांचे आशीर्वाद लाभणार असून विविध लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ‘जिथे आरोग्याला संस्कारांची साथ आणि निसर्गाला विज्ञानाची जोड मिळते, तिथेच निरोगी समाजाची पायाभरणी होते,’ याची प्रचिती अकोल्यातील या उपक्रमांमधून येणार असून, समग्र आरोग्य आणि भारतीय जीवनपद्धतीचा नवा आदर्श म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जात आहे. आरोग्य, पर्यावरण आणि संस्कृती यांची सांगड घालणारा हा उपक्रम विदर्भातील आरोग्य पर्यटनासाठीही नवी दिशा ठरू शकतो, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

---

## अ‍ॅड. विजयराव जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त विविध स्पर्धेचे आयोजन

■ प्रतिनिधी | मालेगाव ■



माजी आमदार विजयराव जाधव यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून बालविकास मंदिर प्राथमिक शाळा मालेगाव विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी इतर स्पर्धा व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमधील सुजनशीलता, वकृत्व, कलात्मक कौशल्यांचा विकास व्हावा या उद्देशाने इयत्ता पहिली ते सातवी च्या विद्यार्थ्यांसाठी वर्गणीहाय विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत इयत्ता पहिली व दुसरी साठी रंगभरण स्पर्धा इयत्ता तिसरी व चौथीसाठी ग्रीटिंग कार्ड तयार करणे. इयत्ता पाचवी ते सातवी साठी निबंध स्पर्धा, ग्रीटिंग कार्ड स्पर्धा, मॅरेथॉन स्पर्धा व स्काऊट गाईड अंतर्गत स्वच्छता मोहीम कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्यांना पुस्तकाचे महत्व कळावे यासाठी ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन सुद्धा शाळेत केले आहे.

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे या उक्तीप्रमाणे परिसरातील नागरिक शाळेतील शिक्षक इत्यादी व्यक्तींसाठी रक्तदान शिबिराचे आयोजन सुद्धा वाढदिवसानिमित्त करण्यात आले आहे. या स्पर्धेचे आयोजन व संपूर्ण नियोजन शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे यांच्या मार्गदर्शनात सर्व शिक्षक वृंद यांच्या सहकार्याने करण्यात आले आहे.

---

## लोंबकळणाऱ्या विद्युत तारेचा शॉक; बैल जागीच ठार

■ देऊळगाव परिसरातील घटना
■ शेतकऱ्याचे सुमारे ६० हजारांचे नुकसान

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील देऊळगाव परिसरात लोंबकळणाऱ्या विद्युत तारेचा शॉक लागून एका बैलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शनिवारी घडली. या दुर्घटनेत शेतकरी पांडुरंग चिपटे यांचे सुमारे ६० हजारांचे आर्थिक नुकसान झाले असून, महावितरण विभागाच्या निष्काळजीपणाबाबत ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

माहितीनुसार, गावातील एका विद्युत खांबावरील तारा काही दिवसांपासून खाली लोंबकळत होती. याबाबत नागरिकांनी संबंधित यंत्रणेकडे वारंवार लक्ष वेधल्याचे सांगितले जात असले, तरी वेळेत दुरुस्ती करण्यात आली नव्हती.

शनिवारी पांडुरंग चिपटे हे आपल्या शेतात बैलाच्या साहाय्याने शेतीची कामे करीत असताना बैलाचा लोंबकळणाऱ्या विद्युत तारेस स्पर्श झाला. त्यामुळे जोरदार विद्युत धक्का बसून बैलाचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच संबंधित विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आणि पंचनामा केला.



या दुर्घटनेमुळे शेतकऱ्यावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. संबंधित शेतकऱ्याला तातडीने योग्य नुकसानभरपाई द्यावी, तसेच परिसरातील धोकादायक व लोंबकळणाऱ्या विद्युत तारा त्वरित दुरुस्त करून अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, यासाठी महावितरणने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

---

## महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांची आ. सई डहाके यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट



■ प्रतिनिधी | कारंजा ■

महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी वाशिम येथे आयोजित महिला व बालविकास भवनाच्या लोकार्पण सोहळ्यासाठी अमरावतीहून जात असताना कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सईताई प्रकाशदादा डहाके यांच्या कारंजा येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.

या प्रसंगी मंत्री आदिती तटकरे यांनी दिवंगत प्रकाशदादा डहाके यांच्या कार्याचा व आठवणींचा भावपूर्ण उल्लेख करत त्यांना आदरांजली वाहिली. त्यानंतर आमदार सईताई डहाके यांच्याशी मतदारसंघातील महिला व बालविकास विभागाशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली.

यावेळी मंत्री तटकरे यांनी, ’मतदारसंघातील महिला व बालविकास विभागाशी संबंधित कोणतेही काम असेल तर ते प्राधान्याने मार्गी लावण्यासाठी माझे पूर्ण सहकार्य राहील,’ अशी ग्वाही देत विकासकामांना गती देण्याचे आश्वासन दिले.

---

## उत्कर्ष बालिकाश्रम येथे बालकांना दूध पावडरचे वितरण

**अकोला :** सामजिक सेवेत कार्यरत असणाऱ्या इनरव्हील क्लब ऑफ अकोलाच्या वतीने बालकांना दूध पावडरचे वितरण करण्यात आले. क्लबच्या सेवा उपक्रम अंतर्गत क्लबच्या महिला पदाधिकारी वर्गाने स्थानीय मलकापूर परिसरातील उत्कर्ष शिशुगृह येथे उपस्थित होऊन बालकांच्या उत्तम आरोग्य व सुदृढ वाढीच्या दृष्टीने क्लबच्या अध्यक्षा निरू शाह यांच्या हस्ते दूध पावडरचे वितरण करण्यात आले.क्लबच्या वतीने यावेळी शिशुगृहातील सेवेकरांचाही सन्मान करण्यात आला. महानगरासाठी उत्कर्ष शिशुगृह हे एक प्रेरणा केंद्र असून क्लबच्या वतीने सातत्याने यथायोग्य सहकार्य उत्कर्ष शिशुगृहाला करण्यात येणार असल्याची ग्वाही क्लब अध्यक्ष निरु शाह यांनी यावेळी दिली.या उपक्रमासाठी अध्यक्षा निरू शाह व त्यांच्या कुटुंबीयांचे विशेष सहकार्य लाभले. यात हरेश शाह, मनन शाह,गर्विता शाह,प्राची शाह व वियांना शाह यांचे क्लबच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

---

## भरधाव बोलेरो पिकअपने दुचाकीला उडवले; दोघे गंभीर

■ प्रतिनिधी | कारंजा ■



चंदनवाडी येथे भरधाव वेगाने धावणाऱ्या बोलेरो पिकअपने दुचाकीला समोरून जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील दोघेजण गंभीर जखमी झाले. धडकेचा आवाज इतका भीषण होता की परिसरात एकच खळबळ उडाली. नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले.

अपघाताची माहिती मिळताच संजय भाऊ राठोड यांनी तत्काळ श्री गुरु मंदिर रुग्णवाहिकेचे रमेश देशमुख यांना दूरध्वनीद्वारे कळविले. माहिती मिळताच रमेश देशमुख यांनी क्षणाचाही विलंब न करता विविध रुग्णवाहिका सेवांचा समन्वय साधत घटनास्थळी धाव घेतली आणि बचावकार्याला वेग दिला. या मदतकार्यात दादाजी रुग्णवाहिकेचे संदेश मेश्राम, श्री जय गुरुदेव रुग्णवाहिकेचे चालक अविनाश भोयर तसेच आई एकविरा रुग्णवाहिकेचे विनोद खोंड यांनी तत्परतेने सहभाग घेत जखमींना सुरक्षितपणे रुग्णालयात हलविले.

या अपघातात विलास खंडारे (वय ५८) व नरेंद्र खंडारे (वय ३०), रा. पिंपळगाव बुद्रुक हे गंभीर जखमी झाले. स्थानिक वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी अमरावती येथील रुग्णालयात रेफर केले.या संपूर्ण बचाव मोहिमेत कक्ष सेवक विजय शिरसाठ, रुग्णसेवक छोटू उके, समृद्धीचे अजय घोडेस्वार, समाजसेवक श्याम घोडेस्वार, श्री गजानन रुग्णवाहिकेचे दीपक सोनोने, शंकर रामटेके, शिवनेरीचे खडसे, मेस्कोचे तरुण शिरसाट आणि धीरज गुल्हाने (मेजर) यांनीही मोलाचे सहकार्य केले. स्थानिक नागरिकांनीही तत्परतेने मदतीचा हात पुढे करत मानवतेचे दर्शन घडविले.

वेळेवर उपलब्ध झालेल्या रुग्णवाहिका सेवा, सर्व संस्थांचा उत्कृष्ट समन्वय आणि नागरिकांच्या सहकार्यामुळे जखमींना तातडीने उपचार मिळाले. या भीषण अपघातानंतर चंदनवाडी परिसरातील भरधाव वाहनांवर कठोर कारवाई करावी, वेगमर्यादेचे काटेकोर पालन व्हावे आणि अपघातांना आळा घालण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

---

## मालेगाव नगरपंचायतीच्या सर्वसाधारण सभेत विकासकामांवर शिक्कामोर्तब

### दलित वस्ती नगरोत्थान योजनांनागती; दिव्यांगांसाठी निधी वाटपाचा निर्णय

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा सोमवार दि. २७ जुलै रोजी नगराध्यक्ष ओमप्रकाश मधुकर खुरसडे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेमध्ये शहराच्या विकासाशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली असून अनेक महत्त्वाच्या ठरावांना मंजुरी देण्यात आली.



सभेत शहरातील रस्त्यांच्या विकासकामांना प्राधान्य देत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजना तसेच नगरोत्थान नागरी वस्ती योजना अंतर्गत विविध विकासकामांचे प्रस्ताव सादर करून त्यास मान्यता देण्यात आली. यामुळे शहरातील मूलभूत सुविधांच्या उभारणीस चालना मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

याशिवाय नगरपंचायती मार्फत दिव्यांग बांधवांसाठी निधी वाटप करण्याचाही महत्त्वपूर्ण निर्णय सभेत घेण्यात आला. या निर्णयामुळे दिव्यांग नागरिकांच्या कल्याणासाठी आवश्यक योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदत होणार आहे.

या सभेला नगरपंचायतीचे सर्व सभापती, नगरसेवक, मुख्याधिकारी पंकज सोनूने तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. शहराच्या विकासासाठी सकारात्मक चर्चा करत विविध विषयांवर एकमताने निर्णय घेण्यात आले. संपूर्ण सभा अत्यंत खेळीमेळीच्या आणि सकारात्मक वातावरणात पार पडली.

---

## दिल्ली येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त पारंपरिक गोंधळ लोककलेचे सादरीकरण



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जांभरूण परांडे (ता. वाशिम) येथील श्री कालिंका माता बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांना भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीने १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनानिमित्त दिल्ली येथे आयोजित ङमान्यवर सांस्कृतिक कार्यक्रमातङ्ङ महाराष्ट्राची पारंपारिक गोंधळ ही लोककला सादर करण्यासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. या निमंत्रणामुळे वाशिम जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या लोककलाविश्वात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, संस्थेच्या कार्याला राष्ट्रीय स्तरावर गौरव प्राप्त झाला आहे.

सहभागी कलाकार

विष्णू धोंगडे, अशोक धोंगडे, कांताराम शिंदे, प्रताप शिंदे, शेषराव धोंगडे, रामदास लोंढे, विजय शिंदे, पांडुरंग सोनवणे, रामदास धोंगडे आणि गजानन जवंजाळ आदींचा सहभाग राहणार आहे.

---

## गुणवंतांचा सन्मान हीच समाजप्रेरणेची परंपरा

### चारभुजानाथ नित्ययोग मंडळाचा वर्धापन दिन उत्साहात



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

चारभुजानाथ नित्ययोग मंडळाच्या १२ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंतांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र बजाज व लता बजाज यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन सत्कारमूर्तींचा गौरव करण्यात आला.

यावेळी राजू भोयर यांचे सुपुत्र यांनी पहिल्याच प्रयत्नात चार्टर्ड अकाउंटंट (सीए) ही प्रतिष्ठेची परीक्षा उत्तीर्ण करून प्रतिकूल परिस्थितीवर मात करत घवघवीत यश संपादन केल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

तसेच मंगरूळपीरचे ज्येष्ठ साहित्यिक तुळजापुरे व अर्चना तुळजापुरे यांची मुख्याध्यापकपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. अतुल सोळंके यांची अधिकारीपदी नियुक्ती, अक्षरा अतुल राठी तसेच श्लोक विनोद बाहेती यांनी शैक्षणिक क्षेत्रात मिळविलेल्या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्यनारायण व्यास यांच्या आदर्श परिवाराचा विशेष सन्मानही यावेळी करण्यात आला.

सपना गणेश बजाज यांची नगरपरिषद नगरसेवकपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. तसेच गोभक्त गजेंद्र बजाज यांची वाशिम जिल्हा माहेश्वरी सभेच्या सचिवपदी, माधुरी संजय राठी यांची वाशिम जिल्हा महिला सचिवपदी, रमणलाल हेडा यांची विदर्भ प्रादेशिक माहेश्वरी सभेच्या प्रदेशाध्यक्षपदी, तर शिवलाल भाऊ भुतडा आणि कैलास भाऊ मुंदडा यांची विदर्भ प्रादेशिक माहेश्वरी सभेच्या सभासदपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

---

## ना. ना. मुंदडा विद्यालयात वृक्षदिंडीचे आयोजन



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

दिंडीत लहान लहान चिमुकले विद्यार्थी यांनी वारकरी वेष परिधान केला होता तसेच मुलींनी लुगडे परिधान केले होते टाळ मृदुंग च्या गजरात झाडे लावा हा संदेश देत ही दिंडी ना ना मुंदडा विद्यालयातून गाडगेबाबा नगर परिसरात फिरून ओंकारगिर महाराज मंदिर येथे आली दिंडीला विधिवत वृक्षाची पूजा करून सुरुवात करण्यात आली. दरम्यान झाडे वाचवण्यासाठी वेगवेगळे संदेश तयार करून मुलांनी हातात घेत नागरिकांना दिले तसेच झाडे वाचवण्यासाठी घोषणा देण्यात आल्या अतिशय शिस्तबद्ध रित्या ही पालखी दिंडी गाडगेबाबा नगर परिसरात गेली काही विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणी तसेच महाराष्ट्रातील विविध संताच्या भूमिका साकारल्या होत्या. त्याचवेळी विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत विठ्ठल रुक्मिणी यांच्या गाण्यावर नृत्य सादर केले.

---


### नावात बदल

मी अब्दुल रहेमान अब्दुल समद हे माझे नविन नाव असुन माझे जुने नाव अ रहमान अ समद असे होते. मात्र यापुढील माझे सर्व व्यवहार माझ्या नविन नावानेच करण्यात यावा. ह्याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**नविन नाव :-**
अब्दुल रहेमान अब्दुल समद
**जुने नाव :-**
अ रहमान अ समद
**पता :** बेलदार पूरा वाशिम ता. जि. वाशिम महाराष्ट्र पिन नंबर -४४४५०५
मो.९८५०७१२६९७

जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २४२ ■ बुधवार, २९ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# इन्स्टाग्रामच्या एका क्लिकने १२.३३ लाखांचा गंडा : वर्ध्यात गुन्हा दाखल

## IPO आणि शेअर बाजारातील भरघोस परताव्याचे आमिष

**वर्धा जनमाध्यम :** ऑनलाइन गुंतवणुकीतून भरघोस नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत सायबर भामट्यांनी सिंदी (रेल्वे) येथील एका युवकाची तब्बल १२ लाख ३३ हजार ३२७ रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. इन्स्टाग्रामवरील एका लिंकपासून सुरू झालेल्या या फसवणुकीच्या प्रकरणी वर्धा सायबर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिंदी (रेल्वे) येथील अनिकेत अशोक पराते (वय २९) हे संगणक ऑपरेटर आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांच्या इन्स्टाग्राम खात्यावर आलेली लिंक उघडताच त्यांचे व्हॉट्सॲप सुरू झाले. त्यानंतर एका अनोळखी क्रमांकावरून त्यांना सातत्याने संदेश पाठवण्यात आले. एका कथित गुंतवणूक कंपनीच्या नावाखाली त्यांना व्हॉट्सॲप गटात सहभागी करण्यात आले.

यानंतर ळजेूर्दे ॲ्र्वें नावाचे ॲप डाउनलोड करण्यास सांगून आयपीओ आणि शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास मोठा आर्थिक फायदा होईल, असे आमिष दाखवण्यात आले. त्यावर विश्वास ठेवून अनिकेत यांनी स्वतःच्या स्टेट बँक ऑफ इंडिया खात्यातून तसेच वडिलांच्या बँक ऑफ इंडिया खात्यातून एकूण १२,३३,३२७ रुपये विविध व्यवहारांद्वारे जमा केले.

काही दिवसांनी पैसे परत काढण्याचा प्रयत्न केला असता, आणखी ३ लाख रुपये कर भरण्याची मागणी करण्यात आली. तेव्हा आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी वर्धा सायबर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात सायबर भामट्यांविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला असून, नागरिकांनी सोशल मीडियावरील अनोळखी लिंक आणि ऑनलाइन गुंतवणुकीच्या आमिषांपासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मृत्यूचा फलक की सार्वजनिक बांधकाम विभागाचा निष्काळजीपणा

## येणाडा फाट्यावर चुकीच्या दिशादर्शकामुळे अपघातांची मालिका

### डॉक्टरांच्या कारचा चेंदा मेंदा, सीटबेल्टमुळे थोडक्यात बचाव

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी मोर्शी मार्गावरील येणाडा फाटा हा चुकीच्या दिशादर्शक फलकामुळे अपघातांचा धोकादायक बिंदू बनल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने कथितरीत्या चुकीच्या ठिकाणी दिशादर्शक फलक उभारल्याने बाहेरगावाहून येणाऱ्या वाहनचालकांची दिशाभूल होत असून त्यातून वारंवार अपघात घडत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. नुकत्याच झालेल्या भीषण अपघातात वरुड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पंकज केंचे यांच्या बॅलेनो कारचा अक्षरशः चेंदा मेंदा झाला. मात्र त्यांनी सीटबेल्ट लावल्यामुळे मोठी जीवितहानी टळली.






माहितीनुसार अंबिकापूर येथील रहिवासी असलेले डॉ. पंकज केंचे हे काही कामानिमित्त गावी आले होते. त्यानंतर ते आपल्या कारने वरुडकडे जात असताना येणाडा फाट्यावर नागपूरहून आलेल्या स्विफ्ट डिझायर कारची त्यांच्या वाहनाला समोरासमोर जोरदार धडक बसली. संबंधित वाहनचालक प्रथमच या मार्गावर आला होता. मोर्शीकडे जाण्याऐवजी दिशादर्शक फलकामुळे त्याने चुकीच्या दिशेने वळण घेतल्याने हा अपघात झाल्याचा आरोप करण्यात येत आहे.

धडकेची तीव्रता इतकी मोठी होती की दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले. विशेषतः डॉ. केंचे यांच्या कारची अवस्था पाहता अपघात किती भीषण होता याचा अंदाज येत होता. अपघातानंतर काही काळ घटनास्थळी तणावाचे वातावरण निर्माण झाले. डॉ. केंचे यांनी मित्र सोनू भार्गव आणि डॉ. जयप्रकाश बाळस्कर यांना घटनास्थळी बोलावले.

त्यांनी संपूर्ण घटनेचे छायाचित्रण व चित्रीकरण करून आष्टी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून अपघाताची नोंद घेत पुढील तपास सुरू केला आहे.

या घटनेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. येणाडा फाट्यासारख्या महत्त्वाच्या वर्दळीच्या ठिकाणी दिशादर्शक फलक उभारताना प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करण्यात आली होती का. फलकावरील दिशानिर्देश अचूक असल्याची खात्री कोणी केली. बाहेरगावाहून येणाऱ्या वाहनचालकांची दिशाभूल होणार नाही यासाठी आवश्यक तांत्रिक निकष पाळण्यात आले होते का. असे अनेक प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. चुकीच्या फलकामुळे भविष्यात एखाद्याचा बळी गेल्यास त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार हा प्रश्नही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

> या घटनेची माहिती मला अद्याप मिळालेली नव्हती. मी स्वतः घटनास्थळी जाऊन पाहणी करणार आहे. दिशादर्शक फलक चुकीच्या ठिकाणी असल्याचे आढळल्यास तो तातडीने योग्य ठिकाणी हलविण्यात येईल.
>
> **भूषण नासरे,** अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आष्टी

# स्वच्छता करा, दिवाबत्ती सुरू करा; अन्यथा तीव्र आंदोलन-भाजपचा नगरपंचायतीला इशारा

**सेलू जनमाध्यम :** सततच्या पावसामुळे सेलू शहरातील सर्व प्रभागांमध्ये गवत, झुडपे आणि अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले असून, डास व विषारी प्राण्यांचा वाढता वावर नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या शिष्टमंडळाने नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांना निवेदन देत तातडीने तणनाशक फवारणी, स्वच्छता मोहीम व बंद असलेले पथदिवे सुरू करण्याची मागणी केली.



निवेदनात शहरातील सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यांच्या कडेला, नाल्यांच्या परिसरात व रिकाम्या भूखंडांवरील वाढलेले गवत हटविणे, मलेरिया, डेंग्यू आणि चिकनगुनियाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जंतुनाशक व धूर फवारणी करणे, तसेच अनेक दिवसांपासून बंद असलेले पथदिवे तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली. मेडिकल चौकातील सार्वजनिक मूत्रगृहाची नियमित स्वच्छता करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

नगरपंचायतीने या गंभीर प्रश्नांकडे तातडीने लक्ष न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही भाजपने दिला. यावेळी नगराध्यक्ष ओमदेव सावरकर, संजय जयस्वाल, नरेश पाठक, गोलू कामीनकर, सागर करनाके, विनोद बेदरकर, अनिल घोडखांदे, धीरज पौनारकर, शिवा डुकरे, अमोल बुधबावरे, बालू साटोणे यांच्यासह भाजप पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मेघगर्जनेसह पावसात वीज कोसळली; शेतकरी गंभीर जखमी

**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यात मंगळवारी दुपारच्या सुमारास मेघगर्जनेसह झालेल्या पावसादरम्यान गिरड परिसरातील आर्वी शिवारात वीज कोसळून शेतकरी नंदलाल गुंडे (वय ४४, रा. गिरड) हे गंभीर जखमी झाले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.



घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमी नंदलाल गुंडे यांना उपचारासाठी समुद्रपूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. सध्या त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू असून प्रकृतीवर डॉक्टरांकडून लक्ष ठेवण्यात येत आहे.

मंगळवारी दुपारी परिसरात अचानक मेघगर्जनेसह पाऊस सुरू झाला असताना शेतात काम करणाऱ्या नंदलाल गुंडे यांच्या जवळ वीज कोसळली. या घटनेत ते गंभीर जखमी झाले. सुदैवाने नागरिकांच्या तत्परतेमुळे त्यांना वेळेत उपचार मिळाल्याने पुढील धोका टळल्याचे सांगितले जात आहे.

या घटनेची नोंद समुद्रपूर पोलिसांनी घेतली असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, पावसाळ्यात मेघगर्जना होत असताना शेतकरी व नागरिकांनी मोकळ्या शेतात किंवा झाडाखाली थांबणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# विकासाच्या गप्पा, समस्यांचा डोंगर; नाचणगाव ग्रामपंचायतीवर गंभीर प्रश्न

**नाचणगाव जनमाध्यम :** नाचणगाव ग्रामपंचायतीच्या अकार्यक्षम कारभारामुळे मीरा कॉलनीतील नागरिकांचे हाल सुरूच असून, पाणीपुरवठा, रस्ते, नाल्यांची स्वच्छता आणि मूलभूत सुविधांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. ग्रामपंचायतीच्या कारभारावर वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित झाल्याने काही काळ प्रशासनाने कारभार आपल्या हाती घेतला होता. मात्र, त्यानंतरही नागरिकांच्या समस्या कायम राहिल्याने संताप व्यक्त केला जात आहे.



उन्हाळ्यात मीरा कॉलनीतील नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागला. पाणी मिळावे यासाठी ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीवर मोर्चाही काढला. मात्र, ठोस उपाययोजना न करता केवळ आश्वासनांची खैरात करण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. परिसरात पाण्याची उपलब्धता असतानाही नियोजनाच्या अभावामुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, पावसाळा सुरू होऊनही रस्त्यांवरील खड्डे तसेच आहेत. नाल्यांची साफसफाई करण्यात आलेली नाही, तर नाल्यांच्या कडेला वाढलेले गवत आणि झुडपे नागरिकांसाठी धोकादायक ठरत आहेत. साचलेल्या पाण्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीतीही व्यक्त होत आहे.

वारंवार तक्रारी करूनही ग्रामपंचायतीकडून कोणतीही प्रभावी कार्यवाही होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. तातडीने पाणीपुरवठा, स्वच्छता आणि रस्ते दुरुस्तीची कामे हाती घेऊन मूलभूत सुविधा सुरळीत कराव्यात, अन्यथा तीव्र लोकआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# काम पूर्ण, पण वेतन शून्य, समग्र शिक्षेतील ६८ कर्मचारी दोन महिन्यांपासून पगाराविना

**वर्धा जनमाध्यम:** विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी संबंधित महत्त्वाची जबाबदारी खांद्यावर असताना समग्र शिक्षा अभियानातील ६८ कर्मचाऱ्यांना मागील दोन महिन्यांपासून वेतनच मिळाले नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. नियमित काम करूनही वेतनासाठी प्रतीक्षा करण्याची वेळ आल्याने कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले असून जिल्हा परिषद प्रशासनाच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

**आर्थिक कोंडी तीव्र**

जिल्हा परिषद कार्यरत हे कर्मचारी डायस पोर्टल अद्ययावत वर्षासाठी पाठ्यपुस्तके वितरण, विविध शैक्षणिक तसेच शाळाबाह्य मुलांचा शिक्षण विभागांतर्गत विद्यार्थी नोंदणी, यू-करणे, नवीन शैक्षणिक आणि गणवेश निधीचे अहवाल तयार करणे शोध घेऊन माहिती संकलित करणे अशी अत्यंत महत्त्वाची कामे पार पाडतात. शिक्षण व्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या या कर्मचाऱ्यांनाच वेळेवर वेतन मिळत नसल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्न उपस्थित होत आहेत. दोन महिन्यांपासून पगार न मिळाल्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांचे घरगुती अर्थकारण कोलमडले आहे. बँक कर्जाचे हप्ते, मुलांच्या शिक्षणाचा खर्च, घरखर्च आणि कुटुंबातील ज्येष्ठांच्या उपचारासाठी पैसे उभे करण्याची मोठी कसरत त्यांना करावी लागत आहे. अनेक वेळा वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष वेधूनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे.

# वृक्षारोपण की सरकारी निधीचा खेळ, विश्रामगृहातील नियोजनशून्य लागवडीने उडवली खळबळ

## अधिकाऱ्यांनी जबाबदारी कंत्राटदारावर ढकलल्याचा आरोप, चौकशीची नागरिकांची मागणी

**आष्टी शहीद जनमाध्यम :** पर्यावरण संवर्धनाच्या नावाखाली शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जात असताना आष्टी येथील शासकीय विश्रामगृह परिसरातील वृक्षलागवडीने मात्र अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. वृक्षलागवड योजनेअंतर्गत नुकतीच करण्यात आलेली लागवड पूर्णपणे नियोजनशून्य असल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, ही वृक्षलागवड पर्यावरण संवर्धनासाठी नसून केवळ सरकारी निधी खर्च करण्यासाठीच करण्यात आली का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

विश्रामगृहाच्या परिसरात चिंच, वड आणि पिंपळ यांसारखी भविष्यात प्रचंड आकार धारण करणारी वृक्षप्रजाती एकमेकांच्या अगदी जवळ लावण्यात आल्याचे दिसून येत आहे. अशा वृक्षांसाठी आवश्यक अंतर आणि भविष्यातील विस्ताराचा कोणताही विचार करण्यात आलेला नसल्याचे स्पष्ट दिसत असून, पुढील काही वर्षांत ही झाडे एकमेकांच्या वाढीस अडथळा ठरणार असल्याची भीती व्यक्त होत आहे.



याहून गंभीर बाब म्हणजे, भविष्यात शासकीय विश्रामगृह परिसरात नवीन इमारत किंवा इतर विकासकामे हाती घेतली गेल्यास हीच झाडे अडथळा ठरण्याची शक्यता आहे. त्यावेळी विकासकामांसाठी झाडे तोडावी लागली, तर आजच्या वृक्षलागवडीचा संपूर्ण उद्देशच व्यर्थ ठरणार असल्याची प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

या प्रकाराबाबत विचारणा करण्यात आल्यानंतर शाखा अभियंता नासरे यांनी हे काम कंत्राटदारामार्फत करण्यात आल्याचे सांगत जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. मात्र, कामाचे नियोजन, गुणवत्ता तपासणी आणि देखरेख ही संबंधित शासकीय यंत्रणेची जबाबदारी नाही का, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

शासनाच्या पर्यावरणपूरक उपक्रमाला अशा नियोजनशून्य कारभारामुळे गालबोट लागण्याची वेळ आली आहे. केवळ कागदोपत्री वृक्षलागवड करून निधी खर्च करण्याऐवजी योग्य वृक्षप्रजाती, आवश्यक अंतर आणि भविष्यातील विकासाचा विचार करून नियोजन करणे अपेक्षित आहे.

या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून नियोजनशून्य वृक्षलागवडीस जबाबदार कंत्राटदार तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे. शासनाच्या पैशांची उधळपट्टी करणाऱ्यांवर जबाबदारी निश्चित होणार का, याकडे आता आष्टीकरांचे लक्ष लागले आहे.

# ऑपरेशन ऑल आऊटचा वर्ध्यात गुन्हेगारांना जबरदस्त दणका

## अवैध धंद्यांवर पोलिसांचा धडाका, २२.७५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यात गुन्हेगारी आणि अवैध धंद्यांवर लगाम घालण्यासाठी पोलिसांनी राबविलेल्या ऑपरेशन ऑल आऊट'ने गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. जिल्हाभर एकाचवेळी धडक कारवाई करत पोलिसांनी अवैध दारू विक्रेते, जुगार अड्डे आणि शस्त्र बाळगणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला. या विशेष मोहिमेत तब्बल २२ लाख ७५ हजार ६८७ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, ५५ सराईत गुन्हेगारांवर विविध कायद्यांन्वये कारवाई करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली २७ जुलै रोजी सायंकाळी पाच ते रात्री दहा वाजेपर्यंत जिल्ह्यातील सर्व १९ पोलीस ठाणे आणि स्थानिक गुन्हे शाखेने संयुक्तपणे ही मोहीम राबविली. अवैध दारू विक्री करणाऱ्या ५२ जणांना रंगेहाथ पकडून त्यांच्याकडून २२ लाख २२ हजार २८२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगारविरोधी कारवाईत दोन गुन्हे दाखल करून ५३ हजार २०५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

एनडीपीएसमधील रेकॉर्डवरील आरोपींची घरझडती घेण्यात आली, तर एका आरोपीकडून बेकायदा शस्त्र जप्त करून भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. याशिवाय सात पाहिजे आणि आठ फरार आरोपींचा शोध घेण्यात आला. हद्दपार गुन्हेगारांवरही पोलिसांनी विशेष लक्ष ठेवले.

या मोहिमेत ३६ अधिकारी आणि २८२ पोलीस अंमलदार सहभागी झाले होते. जिल्ह्यात गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी अशा धडक मोहिमा पुढेही सुरू राहतील, असा इशारा पोलिसांनी दिला असून, नागरिकांनी अवैध कृत्यांची माहिती तातडीने पोलिसांना देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**जाहिर नोटिस**

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार अनिल सोपानराव बन्सोड यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणेः मौजा सावंगी मेघे, मौजा नं. १३८, त.सा.कं. १९ ता. जि. वर्धा ग्राम पंचायत सावंगी मेघे च्या हद्दितील शेत सर्वे कं. १०३ जुना व २३४ नविन मधील प्लॉट कं. ६/३ ज्याची एकूण आराजी ६९.७० चौ. मी. म्हणजेच ७५०.०० चौ. फुट इतकी असुन त्याची

चतुःर्सिमा :-
पुर्वेसः प्लॉट कं. ६ चा भाग,
पश्चिमेसः प्लॉट कं. ६ चा भाग शकुंतला चांबुलवार यांचा,
उत्तरेसः प्लॉट क्रं. २ चा भाग
दक्षिणेसः लेआउट रोड

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. २०,००,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**

**जाहिर नोटिस**

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार कमलाकर अन्नाजी इंगोले यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: मौजा टाकळी (चणाजी), ता. देवळी जि. वर्धा ग्राम पंचायत टाकळी (चणाजी) च्या हद्दितील शिट नं. १ मधील भुखंड/प्लॉट कं. ८१ ज्याची एकूण आराजी १३९.६७ चौ. मी. म्हणजेच १५०२.८४ चौ. फुट इतकी असुन त्याची

चतुःर्सिमा :-
पुर्वेसः रोड,
पश्चिमेसः सिमेंट रोड,
उत्तरेसः भुजंग वानखडे यांचे घर
दक्षिणेसः किशोर इंगोले यांचे घर

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. ४,५०,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**

**जाहिर नोटिस**

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार वसंत संतोषराव इंगोले व मीना वसंतराव इंगोले यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणेः मौजा आजनगांव ता. सेलू जि. वर्धा ग्राम पंचायत खापरी ढोणे च्या हद्दितील शिट नं. १ मधील भुखंड/प्लॉट कं. ५० ज्याची एकूण आराजी १६९.४१ चौ. मी. म्हणजेच १८२२.८५ चौ. फुट इतकी असुन त्याची

चतुःर्सिमा :-
पुर्वेसः खडतकर यांचे घर,
पश्चिमेसः ग्रामपंचायत रोड,
उत्तरेसः भिसे यांचे घर
दक्षिणेसः पोटे यांचे घर

नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण वर ठेवून त्यावर रक्कम रु. ५,००,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**

# हिमाचलच्या चंबात पुरामुळे वाहत आला दगडांचा लोंढा

## घरांमध्ये ढिगारा, गाड्याही दबल्या; केदारनाथ यात्रा थांबवली, MP-छत्तीसगडमध्ये 6 बळी










**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसामुळे हाहाकार उडाला आहे. हिमाचल प्रदेशातील चंबा येथे, सोमवारी रात्री उशिरा झालेल्या जोरदार पावसानंतर सरोल परिसरासह अनेक भागांत अचानक पूर (फ लॅश फ लड) आला. दगड आणि गाळासह पाण्याचा प्रचंड लोंढा घरे आणि दुकानांमध्ये शिरला; अनेक घरांच्या पहिल्या मजल्यापर्यंत गाळाचे ढिगारे साचले आणि दहाहून अधिक वाहनांचे नुकसान झाले. मंगळवारी सकाळी उत्तराखंडमधील चमोली, टिहरी, उत्तरकाशी आणि रु द्रप्रयाग जिल्ह्यांमध्ये दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या. रुद्रप्रयागमध्ये कुंड आणि काकरा दरम्यान दरडी कोसळल्याने केदारनाथ राष्ट्रीय महामार्ग बंद झाला. सोनप्रयाग-गौरीकुंड महामार्गही बंद असल्याने केदारनाथ यात्रा स्थगित करण्यात आली आहे. दरम्यान, मध्य प्रदेशातील शहडोल जिल्ह्यात रविवारी संध्याकाळी वीज पडून ११ वर्षांच्या मुलासह तिघांचा मृत्यू झाला. छत्तीसगडमध्ये बुडून मृत्यू झाल्याच्या वेगवेगळ्या घटनांमध्ये तीन तरुणांनी आपला जीव गमावला. हवामान विभागाने जारी केलेल्या नवीन उपग्रह छायाचित्रांमध्ये पश्चिम बंगालपासून उत्तराखंडपर्यंतच्या १,५०० किमी परिसरात ढगांची दाटी दिसून येत आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या 'डीप डिप्रेशन'मुळे (तीव्र कमी दाबाचे क्षेत्र) ही स्थिती उद्भवली आहे.'डीप डिप्रेशन' ही समुद्रावर कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे तयार होणारी एक प्रभावी हवामान प्रणाली आहे. यात सामान्य 'डिप्रेशन'च्या तुलनेत वा-याचा वेग अधिक असतो आणि त्यामुळे मुसळधार पाउस पडतो.हवामान विभागाच्या मते, मान्सून ट्रफच्या (मान्सूनचा कमी दाबाचा पट्टा) प्रभावामुळे दिल्ली, पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, ओडिशा, पश्चिम बंगाल, झारखंड आणि बिहारमध्ये मुसळधार पाउस पडण्याची शक्यता आहे. चंदीगड येथील पंजाब विद्यापीठात मंगळवारी सकाळी पीएचडी करणा-या एका विद्यार्थिनीचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. ती मुलींच्या वसतिगृहातून अभ्यासासाठी आपल्या विभागाकडे जात असतानाच, एका कच्च्या रस्त्यावर अचानक खाली कोसळली. हे पाहून इतर विद्यार्थ्यांनी तिला उठवण्यास धाव घेतली. तिला रु ग्णालयात नेईपर्यंत तिचा मृत्यू झाला होता. मृत विद्यार्थिनी हरियाणाची रहिवासी होती आणि शिक्षण घेत असताना ती मुलींच्या वसतिगृहात राहत होती. प्राथमिक तपासात विजेचा धक्का लागल्याने मृत्यू झाल्याचे दिसून आले आहे; मात्र, या प्रकरणाचा सध्या तपास सुरू आहे.

**दिल्लीत मुसळधार पाउस; रस्त्यांवर पाणी साचले-** मंगळवार सकाळपासून दिल्लीत मुसळधार पाउस पडत असून, त्यामुळे रस्त्यांवर पाणी साचले आहे. याचा परिणाम म्हणून वाहतूक कोंडीही झाली आहे.

**उत्तराखंडातील मसुरी येथे दरड कोसळल्याने महामार्ग बंद-** उत्तराखंडातील मसुरी येथे दरड कोसळल्यामुळे डेहराडून-मसुरी महामार्ग बंद करण्यात आला. परिणामी येथे मोठ्या संख्येने पर्यटक अनेक तासांपासून अडकून पडले आहेत. हा रस्ता पुन्हा सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

सोमवारी पंजाब आणि चंदीगडमधील अनेक भागांत जोरदार पाउस झाला, ज्यामुळे नागरिकांना उष्णता आणि दमट हवामानापासून दिलासा मिळाला. हवामान विभागाने मंगळवारसाठी पंजाब आणि चंदीगडमध्ये 'रेड अलर्ट' जारी केला आहे; या प्रदेशासाठी अशा प्रकारचा इशारा जारी होण्याची ही पहिलीच वेळ आहे.सततच्या पावसामुळे भाक्रा आणि पोंग धरणांमधील पाणी पातळीतही वाढ होत आहे. प्रशासनाने नागरिकांना नद्या आणि नाल्यांच्या जवळ न जाण्याचे तसेच हवामान विभागाने दिलेल्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.हिमाचल प्रदेशातील चंबा येथे सोमवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे वाहून आलेल्या ढिगारा व गाळ अनेक घरांमध्ये शिरला. सरोल परिसरात अनेक घरांचे तळमजले मलब्याखाली गाडले गेले. अनेक वाहनेही त्यात दबली गेली. दरम्यान, शिमल्यातही काल रात्रीपासून सतत मुसळधार पाउस पडत आहे. हवामान विभागाने राज्यासाठी पुढील सहा दिवस मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. आज सिरमौर आणि बिलासपूरसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे, तर शिमला, मंडी आणि सोलनसाठी 'येलो अलर्ट' देण्यात आला आहे. मंडी, सिमला, सिरमौर आणि सोलनमध्ये अचानक पूर (flash flood) येण्याचा धोका लक्षात घेता, हवामान विभागाने (IMD) लोकांना नद्या, ओढे आणि भूस्खलनाचा धोका असलेल्या भागांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे.हवामान विभागाने हरियाणामध्ये पुढील दोन दिवस मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. यमुनानगरमध्ये मंगळवारी सकाळपासूनच पाउस पडत आहे. त्याचबरोबर, पंचकुला, अंबाला, कर्नाल आणि यमुनानगरच्या काही भागांत हलक्या ते मध्यम स्वरू पाच्या पावसाचा इशाराही देण्यात आला आहे. मान्सूनचा अर्धा हंगाम उलटून गेला असला तरी, राज्यात आतापर्यंत सरासरीपेक्षा २७% कमी पाउस झाला आहे. पावसाची सर्वात मोठी तूट जिंद आणि सिरसा जिल्ह्यांत नोंदवली गेली आहे, जिथे पाउस सरासरीपेक्षा ६२% कमी झाला आहे. रोहतक, अंबाला, कैथल, सोनीपत आणि हिसार यांसारख्या इतर अनेक जिल्ह्यांमध्येही पावसाची मोठी तूट कायम आहे. बिहारमध्ये मान्सूनची वाटचाल संथ गतीने सुरू आहे. मंगळवारी हवामान विभागाने २३ जिल्ह्यांसाठी वादळ, विजांच्या कडकडाटासह पाउस आणि वीज पडण्याची शक्यता लक्षात घेता 'येलो अलर्ट' जारी केला. दरम्यान, उर्वरित १५ जिल्ह्यांत हवामान सामान्य राहण्याची शक्यता असली, तरी दिवसभर दमट उष्णतेचा प्रभाव कायम राहील.

पाटण्यात अधूनमधून ढगाळ वातावरण असूनही कडक उन आणि उच्च आर्द्रता (दमटपणा) कायम राहील. हवामान विभागाच्या माहितीनुसार, राज्यात आतापर्यंत सरासरीपेक्षा ४० टक्के कमी पाउस झाला आहे. गेल्या २४ तासांत नालंदा, जहानाबाद, बेगुसराय, औरंगाबाद, बगहा, अररिया आणि सुपौलसह अनेक जिल्ह्यांत पावसाची नोंद झाली आहे. काल रात्रीपासूनच उत्तराखंडमध्ये ठिकठिकाणी अधूनमधून पाउस पडत आहे. हवामान विभागाने उत्तरकाशी, डेहराडून, टिहरी, रुद्रप्रयाग, चमोली, उधम सिंग नगर, बागेश्वर, पिथोरागढ आणि नैनीताल या जिल्ह्यांमध्ये मंगळवारी मुसळधार पावसासाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाउस, वादळ आणि विजांच्या कडकडाटासह पाउस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या या इशा-यानंतर डेहराडून, बागेश्वर, रु द्रप्रयाग, पिथोरागढ, पौरी आणि चमोली येथील शाळा (इयत्ता १ ली ते १२ वी) आणि अंगणवाडी केंद्रे बंद ठेवण्यात आली आहेत. विभागाने बुधवारीही राज्यात अशीच हवामान स्थिती राहण्याचा अंदाज वर्तवला आहे.

सध्या मध्य प्रदेशवर मान्सूनचा पट्टा आणि इतर एक हवामान प्रणाली अशा दोन प्रणाली सक्रिय आहेत. यांच्या प्रभावामुळे मंगळवारी सतना, कटनी, उमरिया, मंडला, दिंडोरी, सिवनी, रायसेन आणि बैतुल या जिल्ह्यांसाठी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये पुढील २४ तासांत ४ इंच किंवा त्याहून अधिक पाउस पडण्याची शक्यता आहे. भोपाळमध्ये सकाळपासून हलका पाउस पडत आहे, तर राज्यातील इतर अनेक जिल्ह्यांमध्येही हलक्या ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, राज्यात आतापर्यंत सरासरीपेक्षा १७% कमी पाउस झाला आहे. बंगालच्या उपसागरावर तयार झालेल्या एका प्रभावी हवामान प्रणालीमुळे राजस्थानमध्ये मान्सून पुन्हा सक्रिय झाला आहे. हवामान विभागाने आज राज्यातील २५ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. सोमवारी जयपूर, बिकानेर, जोधपूर आणि सवाई माधोपूरसह अनेक जिल्ह्यांमध्ये २ इंचांपर्यंत पावसाची नोंद झाली. हवामान तज्ज्ञांच्या मते, बंगालच्या उपसागरावर तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र वायव्य दिशेने सरकत आहे. याचा परिणाम म्हणून, २ ऑगस्टपर्यंत राजस्थानमध्ये मान्सून सक्रिय राहील आणि अनेक भागांत सतत पाउस पडण्याची शक्यता आहे.

# नागपुरात तुफान पाउस; लोकांची तारांबळ, मैदान पाण्याखाली!

**नागपूर/ प्रतिनिधी-** सध्या नागपुरात तुफान पाउस सुरू आहे. या पावसामुळे नागपूरकरांची चांगलीच तारांबळ उडाली आहे. शहरात सकाळपासून पावसाच्या हलक्या सरी सुरू झाल्या होत्या. काही वेळाने मात्र पावसाचा जोर वाढला. परिणामी अनेक भागांत सध्या पावसाचे पाणी साचले आहे. काही ठिकाणी तर गुडघ्यापर्यंत पाण्याचा प्रवाह पाहायला मिळतोय. या पावसामुळे शाळेत



जाणा-या विद्यार्थ्यांनाही अडचणींचा सामना करावा लागतोय. हवामान विभागाने नागपूरसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे. नागपूरमध्ये सुरू असलेल्या पावसामुळे प्रतापनगरमधील सोमलवार शाळेतील मैदानात पाणी साचले आहे. शाळा सुरू असून मैदानात पाणी साचल्याने विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. परिसरात रस्त्याचे काम सुरू असल्याने या भागात चांगलेच पाणी साचले आहे. या भागात पाउस साचल्याने लोकांना ये-जा करायला त्रास होतोय. लोक त्या भागात लावण्यात आलेल्या दो-यांच्या मदतीने चालण्याचा प्रयत्न करत आहेत. सकाळपासून नागपूरमध्ये हलक्या स्वरू पाचा पाउस सुरू असून त्यामुळे सखल भागात पाणी साचायला सुरु वात झाली आहे. आज पावसाचा यलो अलर्ट असल्याने दुपारी चांगल्या पावसाचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. हीच शक्यता लक्षात घेउन प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

**नागुरात ट्रॅफिक जाम-** नागपुरात सध्या मुसळधार पाउस सुरू असल्याने त्याचा परिणाम ट्रॅफिकवरही झाला आहे. मिळालेल्या ताज्या माहितीनुसार रेडिसन ब्लूच्या उड्डाणपूल रस्त्यावर मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. तर काही ठिकाणी घराच्या अंगणापर्यंत पाणी पोहोचले आहे. म्हणून फारच गरज असेल तरच घराबाहेर पडावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**शेतकरी सुखावले-** दुसरीकडे या पावसामुळे शेतकरी मात्र काहीसा सुखावला आहे. पेरणी झाल्यानंतर शेतक-यांना चांगल्या पावसाची प्रतीक्षा होती. पिकाच्या वाढीसाठी हा पाउस गरजेचा होता. नागपुरात तसेच जिल्ह्याच्या इतर ठिकाणी पावसाने पुन्हा हजेरी लावल्याने शेतकरी सुखावले आहेत. हा पाउस पिकांच्या पुढील वाढीसाठी आवश्यक होता.

# दुस-या जातीच्या तरूणासोबत प्रेमसंबंध; आईने पोटच्या मुलीला संपवले

**ठाणे /प्रतिनिधी-** उल्हासनगरमध्ये आईने पोटच्या मुलीची हत्या केल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. मुलीचे दुस-या जातीच्या तरु णासोबत प्रेमसंबंध होते. या प्रेमसंबंधाला तरु णीच्या आईचा विरोध होता. मुलगी त्या तरु णासोबत पळून जाण्याच्या तयारीत असताना आईने मुलीची हत्या केली. या प्रकरणी उल्हासगनर पोलिसांनी आरोपी महिलेला अटक केली. या घटनेमुळे उल्हासनगर हादरले आहे. पोलिस सध्या पुढील तपास करत आहेत.




मिळालेल्या माहितीनुसार, उल्हासनगरच्या कॅम्प १ मधील भैय्यासाहेब आंबेडकर परिसरात ही घटना घडली. याठिकाणी राहणा-या १९ वर्षीय अमृता गरु डचे त्याच परिसरात राहणा-या दुस-या जातीतील तरु णासोबत प्रेमसंबंध होते. या प्रेमसंबंधला अमृताच्या आईचा विरोध होता. तिने अमृताला अनेकदा समजावण्याचा प्रयत्न केला पण अमृता ऐकायला तयार नव्हती.याच कारणावरू न रविवारी मध्यरात्री दीडच्या सुमारास अमृता आणि तिच्या आईचे वाद झाले. वादानंतर अमृता घर सोडून जाण्याच्या तयारीत होती. त्यावेळी रागाच्या भरात तिची आई आशा गरू डने ओढणीने तिचा गळा आवळून खून केला. या घटनेनंतर अमृताच्या वडिलांनी स्वत: उल्हासनगर पोलिस ठाण्यात जाउन या घटनेची माहिती दिली.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी अमृताचा मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी रु ग्णालयात पाठवला. त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणी आरोपी आशा गरूडविरोधात गुन्हा दाखल करत तिला अटक केली. आईनेच पोटच्या मुलीची हत्या केल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.


# 'नीट' सारखाच 'एमएच-सीईटी' मध्ये महाघोटाळा?

**मुंबई / प्रतिनिधी-** देशात झालेल्या नीट पेपरफुटी प्रकरणानंतर अनेक सवाल विद्यार्थ्यांकडून उपस्थित करण्यात आले. अशा स्पर्धा परीक्षांमध्ये होणा-या पेपरफुटीमुळे तरु णांचे भविष्य धोक्यात येते, यासाठी केंद्र सरकारने ठोस पाउले उचलावीत यासाठी अनेक आंदोलने झाली. यानंतर, आता राज्यातील एमएच-सीईटी परीक्षेच्या निकालावरू न नवा वाद निर्माण झाला आहे.

काँग्रेसचे नेते सचिन सावंत, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे रोहित पवार यांच्यासह अनेक विरोधी पक्षातील नेत्यांनी एमएच-सीईटी निकालात कथित गैरव्यवहार झाल्याचा आरोप केला आहे.

काँग्रेसचे सचिव सचिन सावंत यांनी सर्वप्रथम एमएच-सीईटीमध्ये कथित घोटाळ्याचा आरोप केला. बारावीत ३५ ते ४० टक्के गुण मिळालेल्या काही विद्यार्थ्यांना एमएच-सीईटी मध्ये ९० ते १०० पर्सेंटाईल कसे मिळाले? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सचिन सावंत यांनी निकालाची उच्चस्तरीय चौकशी करू न दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. यानंतर, आमदार रोहित पवारांनीदेखील याच मुद्यावरू न सरकारवर निशाणा साधला.

काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत म्हणाले




की, देशभरात नीट पेपरफुटीने विद्यार्थी आणि पालकांची चिंता वाढली आहे. आयुष्याचा महत्त्वाच्या टप्प्यावर जर तरु ण पिढीला फसवले जात असेल तर ही देशाची सुद्धा फसवणूक आहे. नीट पेपरफुटीची चौकशी सुरू असली तरी अशा प्रकारच्या चौकशीतून पुढे काहीही निष्पन्न होत नाही, हा आजवरचा अनुभव आहे. तसेच नीट सारखाच गडबड घोटाळा एमएच-सीईटी परीक्षेतही झाला आहे. दहावी बारावीला जेमतेम ३५-४० टक्के पडलेल्या विद्यार्थ्यांना एमएच-सीईटीपरीक्षेत १०० पर्सेंटाईल पडलेले आहेत, हा घोटाळा असून त्याची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करा, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते महादेव बालगुडे यांनी सोशल मीडियावरील प्लॅटफ ?र्मवर एका शिक्षकाचा व्हीडीओ शेअर केला. या सुमारे ३० मिनिटांच्या व्हीडीओमध्ये एमएच-सीईटीच्या निकालात कथित गैरव्यवहार झाल्याचा दावा करण्यात आला आहे. हे स्वत: शिक्षक आहेत. एमएच-सीईटी घोटाळा कसा झाला, यावरील त्यांचा संपूर्ण व्हीडीओ पाहा. पत्रकार आणि शिक्षकांसारखे अराजकीय लोक पुराव्यांसह बोलतात, तेव्हा जनतेचा विश्वास बसतो. हा मुद्दा सर्वप्रथम काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी उपस्थित केला होता. असे म्हणत त्यांनी टीका केली.

# दादांच्या अपघाताचा रिपोर्ट नाही, आमचा संयम संपतोय-युगेंद्र पवार

**बारामती/प्रतिनिधी-** राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या विमान अपघाताला सहा महिने पूर्ण होउनही तपासाचा अंतिम निष्कर्ष समोर न आल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते युगेंद्र पवार यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.



तपास यंत्रणांनी विलंब न करता अहवाल प्रसिद्ध करून अपघाताच्या दिवशी नेमकं काय घडलं, हे जनतेसमोर मांडावं, अशी मागणी त्यांनी केली.अजित पवार यांच्या अपघाती निधनाला सहा महिने पूर्ण झाल्याच्या निमित्ताने युगेंद्र पवार यांनी बारामती येथील विद्या प्रतिष्ठान परिसरातील अजित पवार यांच्या स्मृतीस्थळाला अभिवादन केले. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना युगेंद्र पवार यांनी अपघात प्रकरणाच्या तपासाच्या गतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.दादांना जाउन सहा महिने झाले, मात्र चौकशीतून अद्याप कोणतेही ठोस उत्तर मिळालेले नाही. अनेकजण या विषयावर बोलतात; पण प्रत्यक्षात काहीही पुढे सरकत नसल्याचं दिसतं. ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे, असे युगेंद्र पवार म्हणाले. अपघातानंतर सुरक्षेच्या दृष्टीने अपेक्षित उपाययोजनाही पूर्ण झालेल्या नसल्याचा आरोप त्यांनी केला.साधे सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे कामही पूर्ण झालेले नाही. सीआयडी आणि डीजीसीएकडून तपास सुरू असल्याचे सांगितले जाते; परंतु अद्याप अंतिम अहवाल समोर आलेला नाही, असे त्यांनी नमूद केले. पुढे त्यांनी सांगितले, कारवाई होत नाही, चौकशीचा निष्कर्षही जाहीर होत नाही. आम्ही सहा महिने संयमाने वाट पाहिली. आता मात्र त्या दिवशी नेमके काय घडले, याचे स्पष्ट उत्तर मिळणे आवश्यक आहे. संबंधित यंत्रणांनी दुसरा अहवाल तातडीने प्रसिद्ध करावा, अशी मागणीही युगेंद्र यांनी केली आहे.

# शेतक-यांबद्दल गुलाबराव पाटलांचे वादग्रस्त विधान

**जळगाव /प्रतिनिधी-** एकवेळेस शेतक-यांना लोडशेडिंगचा थोडा त्रास झाला तरी आम्ही सहन करू, पण उद्योजकांना विजेचा तुटवडा होता कामा नये, असे वादग्रस्त विधान राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री आणि जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले आहे. जळगाव येथील अतिरिक्त वीज ट्रान्सफार्मरच्या (५एमव्हीए) लोकार्पण सोहळ्यात बोलताना गुलाबराव पाटील यांनी वीज वितरण कंपनीच्या अधिका-यांना आणि उपस्थित उद्योजकांना संबोधित केले.उद्योजकांची बाजू मांडताना ते म्हणाले की, आमची हात जोडून विनंती आहे की, एकवेळेस शेतक-यांना थोडा त्रास झाला तरी आम्ही सहन करू न घेउ, पण उद्योजकांना त्रास होउ देउ नका. कारण उद्योजकाला मजुरांना पैसे द्यायचे असतात. लाईट गेली म्हणून तो मजुरांना पैसे नाकारू शकत नाही. त्यात त्याचा प्रोडक्शनचा मोठा लॉस होतो. जर सतत लाईट जात असेल, तर नवीन उद्योजक इथे कारखाने टाकण्यास तयार होणार नाहीत. या उद्योगांमुळेच आमच्या परिसरातील ५००-१००० मुलांना किमान रोजगार मिळतो.

**शेतक-यांना दिवसा लाईट-** यासोबतच त्यांनी आपल्या मतदारसंघातील कामाचे कौतुक करताना म्हटले की, जळगाव ग्रामीण हा असा एकमेव मतदारसंघ आहे जिथे आता शेतक-यांना शेतात १००% दिवसा लाईट मिळते. त्यामुळे रात्रीच्या वेळी शेतात जाण्याची आणि सापा-विंचवांची शेतक-यांची धास्ती कमी झाली आहे. जिल्हा नियोजन समितीतून ह्याहावितरणला १३० कोटी रु पये देणारा मी एकमेव पालकमंत्री असेल, ज्यामुळे जिल्ह्यात ७५० ट्रान्सफ ?र्मर उभे राहिले आणि पेंडन्सी



कमी झाली, असा दावाही त्यांनी केला.

**स्मार्ट मीटरवरून अधिका-यांना कानपिचक्या-** भाषणाच्या शेवटी त्यांनी महावितरणच्या अधिका-यांना वाढत्या वीज बिलांवरू न चिमटा काढला. तुमच्या स्मार्ट मीटरचे आमच्यावर लय प्रेम आहे, ते जरा सांभाळा बाबा! लोक रोज सकाळी एवढी मोठी वीज बिले घेउन माझ्या घरी येतात, असे म्हणत त्यांनी वाढत्या बिलांबाबत नाराजी व्यक्त केली.

**रोहिणी खडसे यांचा गुलाबराव पाटलांवर घणाघात**

गुलाबराव पाटलांच्या या विधानानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) नेत्या रोहिणी खडसे यांनी आक्रमक भूमिका घेत त्यांच्यावर (ट्विटर) द्वारे खरपूस टीका केली आहे.

**पालकमंत्र्यांना आठवडाभर उपाशी ठेवा-** रोहिणी खडसे यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे, पालकमंत्री महोदय म्हणतात की शेतक-यांना वीज नसली तरी चालेल, पण उद्योजकांना विजेचा तुटवडा होता कामा नये! वाह रे वाह यांना आठवडाभर उपाशी ठेवले पाहिजे, तेव्हाच त्यांना अन्नधान्य पिकवणा-या शेतक-यांचे महत्त्व कळेल! निवडणुकीत शेतक-यांच्या नावाने मते मागायची आणि सत्तेत आल्यावर उद्योगपतींच्या मांडीवर जाउन बसायचे हे सरकारचे चांगलेच चालले आहे, असा घणाघात त्यांनी केला.

**महायुती सरकारवर निशाणा-** या वक्तव्यातून महायुती सरकारचा खरा चेहरा समोर आला असून, हीच या सरकारची शेतकरी आणि शेतीविषयीची भूमिका आहे, असा आरोप रोहिणी खडसे यांनी केला आहे. गुलाबराव पाटील यांच्या या विधानामुळे आणि रोहिणी खडसे यांच्या आक्रमक टीकेमुळे जळगावच्या आणि राज्याच्या राजकारणात शेतकरी विरु द्ध उद्योजक हा मुद्दा पुन्हा एकदा तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## जाहीर सुचना

**सर्व लोकांना या जाहीर सुचनेद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी** शेखर रमेशराव देशपांडे, **रा.रतन भवन, जुना सराफा, अमरावती, ता.जि.अमरावती यांचे मालकीची व ताब्यातील खालील वर्णन केलेली मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केला असून लवकरच खरेदीखत करुन घेणार आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-**

**नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर वि.कचेरीचे कक्षेतील व अमरावती मनपा च्या हद्दीतील मौजे पेठ अमरावती, प्रगणे बडनेरा, ता.जि.अमरावती येथील नझूल शिट नं.९२-सी, नगर भूमापन क्र.२३६ याचे एकुण क्षेत्रफळ १५२.६० चौ.मी. आहे. यापैकी उत्तर-दक्षिण वाटणीचा पश्चिमेकडील भाग याचे क्षेत्रफळ ७६.३२ चौ.मी. (८२१.५० चौ.फुट) यावर आरसीसी कॉलम पध्दतीचे वर छत स्लॅबचे असलेले दोन मजली मकान यात तळ मजल्यावर तीन रुम, संडास-बाथरुम व पहिल्या मजल्यावर तीन रुम, बांधकामाचे एकुण क्षेत्रफळ ७६.२२ चौ.मी. (८२१.५० चौ.फुट) याचा वार्ड क्र.३६ असून मालमत्ता क्र.६६ आहे. नळ कनेक्शन, इलेक्ट्रिक फिटीगसह व इले.मिटरसह याची चतुःसिमा खालीलप्रमाणे--**

| | | |
|---|---|---|
| **पुर्वेस** | - | **रमेश जैन यांचे मकान** |
| **पश्चिमेस** | - | **चव्हाण यांचे घर** |
| **उत्तरेस** | - | **धरमकर यांचे मकान** |
| **दक्षिणेस** | - | **सरकारी रस्ता** |

**वरील वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचे कोणतेही हितसंबंध, सहकारी/राष्ट्रीयकृत/वित्त संस्थेचे/सावकारी कर्ज, गहाण, बोझा, वारस हक्क, ताबा, कर्ज, इजमेंटरी हक्क, दान, खरेदी, लीज, अटॅचमेंट, रिझर्वेशन, एक्विझिशन, कूळ वहिवाट, चोळी-बांगडी वगैरे कोणत्याही प्रकारचा बोझा अथवा अन्य कोणतेही अधिकार असल्यास किंवा सरकारी बँक, सहकारी संस्था, निमसरकारी अथवा खाजगी कर्ज असल्यास त्यांनी ही सुचना प्रेषित झाल्यापासून ५ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कागदपत्रे व पुराव्यासह लेखी हरकत घ्यावी. जर वरील मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार/हरकत आली नाही तर आमचे पक्षकार वर नमुद मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत/तक्रार, वाद ऐकला जाणार नाही, त्याचप्रमाणे नंतर कोणाचेही कोणतेही उजर चालणार नाही.**

**अमरावती**
दिनांक २८.०७.२०२६

**(ॲड.आशिष कृ.लांडे)**
**नोटरी भारत सरकार**
**२४, प्रमोद कॉलनी, राजापेठ, अमरावती**
**मो.९४२१७४०२३०**

# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## पारदर्शकता आणणार?

जंतर-मंतरवरील विद्यार्थी आंदोलनानंतर केंद्र सरकारने आता परीक्षा पद्धतीतील उणिवा आणि दोष सुधारण्यासाठी वेगाने पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. संसदेमध्ये नवीन परीक्षा सुधारणा विधेयक सादर झाले; पण केवळ कायद्यावरच विसंबून न राहता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उच्चस्तरीय तांत्रिक कार्यदलाची (टास्क फोर्स) घोषणा केली. इन्फोसिसचे सहसंस्थापक आणि आधार तसेच युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस यांसारख्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचे शिल्पकार म्हणून जागतिक पातळीवर ख्याती असलेले नंदन निलेकणी यांच्याकडे या समितीचे नेतृत्व सोपवले आहे. या कार्यदलामध्ये 'इस्रो'चे माजी अध्यक्ष एस. सोमनाथ, गुप्तचर ब्युरोचे संचालक तपन डेका, भारतीय तंत्रज्ञान संस्था मद्रासचे संचालक व्ही. कामकोटी, शालेय शिक्षणाच्या माजी सचिव अनिता करवाल आणि उच्च शिक्षण सचिव अमृत लाल मीना यांसारख्या नामवंत तज्ज्ञांचाही समावेश आहे. ही समिती आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून परीक्षा पद्धतीची संपूर्ण प्रक्रिया गळतीरहीत आणि विश्वासार्ह कशी बनवता येईल, यावर काम करणार आहे. यातून सरकारने आपला दृष्टिकोन आणि प्राधान्यक्रम स्पष्ट केला आहे. विद्यमान सरकारने २०२४ मध्ये नीट आणि इतर स्पर्धा परीक्षांच्या पार्श्वभूमीवर 'इस्रो'चे माजी अध्यक्ष डॉ. के. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय तज्ज्ञ समिती स्थापन केली होती. त्या समितीने देशभरातील परीक्षा प्रणालीचा सखोल अभ्यास करून सुधारणा तसेच नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या रचनेत बदलासाठी आणि तंत्रज्ञानाचा सुरक्षित वापर करण्यासाठी १०१ शिफारशींचा अहवाल सादर केला होता. सर्वोच्च न्यायालयातील प्रतिज्ञापत्रानुसार, १०१ शिफारशींपैकी बहुतांश शिफारशी प्रत्यक्ष अमलात आणल्या गेल्या. परीक्षा केंद्रांवर कडेकोट सुरक्षा व्यवस्था राखण्यासाठी राज्य पातळीवर आणि जिल्हा पातळीवर विशेष समन्वय समित्या स्थापन केल्या. बहुतांश परीक्षा केंद्रे शासकीय संस्था किंवा केंद्रीय विद्यालयांच्या माध्यमातून निवडली जात असून, परीक्षांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे, मोबाईल जॅमर आणि आधुनिक डेटा विश्लेषणाचा प्रभावी वापर केला जात आहे, तरीही विद्यार्थी आंदोलनांतील उद्रेकाची दखल घेत नवी कमिटी स्थापन केली आहे. परीक्षा प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्ता, बायोमेट्रिक पडताळणी आणि सायबर सुरक्षेचे बळकट कवच निर्माण करण्यासाठी नीलेकणी आणि कमिटीतील सदस्यांच्या तांत्रिक कौशल्याचा उपयोग करून घेणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. नंदन निलेकणी हे भारतीय तंत्रज्ञान क्षेत्रातील विश्वासार्ह नाव आहे. १९८१ मध्ये नारायण मूर्ती यांनी ज्या सहकाऱ्यांसमवेत 'इन्फोसिस'ची स्थापना केली, त्यामध्ये निलेकणींचे योगदान मोठे होते. त्यांच्या नेतृत्वाखाली इन्फोसिसने जागतिक माहिती-तंत्रज्ञान उद्योगात भारताची ओळख निर्माण केली. २००९ मध्ये त्यांनी यूआयडीएआयचे संस्थापक अध्यक्ष म्हणून काम स्वीकारले. त्यांच्या नेतृत्वाखाली 'आधार' प्रकल्पाची उभारणी झाली. आज एक अब्जाहून अधिक भारतीयांची डिजिटल ओळख आधार कार्ड हेच आहे. त्यांचा हा प्रयोग आजही जागतिक स्तरावर अभ्यासला जातो. यूपीआयच्या धोरणात्मक चौकटीत त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले. २०१९ मध्ये रिझर्व्ह बँकेच्या डिजिटल पेमेंट समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी देशभर डिजिटल व्यवहारांचा प्रसार वाढविणाऱ्या शिफारशी केल्या. जीएसटी व्यवस्थेच्या डिजिटल संरचनेला आकार देणाऱ्या तांत्रिक सुधारणांमध्येही त्यांचा सहभाग होता. जी-२० च्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा कार्यगटाचे सहअध्यक्ष, सर्वोच्च न्यायालयाच्या एआय समितीचे तज्ज्ञ सदस्य आणि 'इंडिया एनर्जी स्टॅक'चे प्रमुख मार्गदर्शक अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या. कर्मचारी निवड आयोगाच्या २०१७ मधील परीक्षा गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या समितीत ते होते. त्यामुळे परीक्षा प्रक्रियेतील तांत्रिक कमकुवत दुवे, प्रशासकीय अडचणी आणि सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी या सर्वांची त्यांना सखोल माहिती आहे. राष्ट्रीय परीक्षा व्यवस्था पेपरफुटीमुक्त, सायबर हल्ल्यांपासून सुरक्षित, उत्तरदायी आणि पूर्णपणे पारदर्शक बनविण्यासाठी हा टास्क फोर्स कोणत्या तातडीच्या तसेच दीर्घकालीन उपाययोजना सुचवतो याकडे देशाचे लक्ष आहे. वास्तविक, जगातील कोणतीही परीक्षा व्यवस्था शंभर टक्के अभेद्य किंवा फूलप्रूफ असल्याचा दावा करता येत नाही. अमेरिकेपासून चीनपर्यंत सर्वच देशांनी पेपरफुटी, कॉपी, डिजिटल हॅकिंग किंवा मूल्यमापनातील त्रुटींचा सामना केला आहे; मात्र विकसित देशांनी या घटनांना संपूर्ण परीक्षा परिसंस्थेचा विषय मानला. तंत्रज्ञान, कठोर प्रशासन, बहुपदरी सुरक्षा, संस्थात्मक स्वायत्तता आणि सतत लेखापरीक्षण यांच्या साहाय्याने त्यांनी जोखीम कमीत कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आज फिनलंड, सिंगापूर, जपान, दक्षिण कोरिया, ब्रिटन आणि काही प्रमाणात चीनच्या परीक्षा प्रणाली जगभर अभ्यासल्या जातात. फिनलंडची परीक्षा प्रणाली सर्वाधिक विश्वासार्ह मानली जाते. कारण, ती केवळ अंतिम परीक्षेवर अवलंबून नाही. विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण मूल्यमापन, शिक्षकांवरील उच्च विश्वास आणि अत्यंत मर्यादित राष्ट्रीय परीक्षा ही तिची वैशिष्ट्ये आहेत. फिनलंडमध्ये शिक्षकांना मास्टर्स पदवी अनिवार्य असून त्यांची निवड अत्यंत कठोर प्रक्रियेतून होते. प्रश्नपत्रिका तयार करणे, मूल्यांकन आणि गुणवत्ता तपासणी यासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यरत असते. मुख्य म्हणजे, तेथे एकाच परीक्षेवर विद्यार्थ्यांचे भविष्य अवलंबून नसल्यामुळे पेपरफुटीचे आकर्षण आपोआप कमी होते. संशोधकांच्या मते, परीक्षा सुरक्षित करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे एका परीक्षेवरील अतिअवलंबित्व कमी करणे. 'नीट'ला तामिळनाडूसह अनेक राज्यांनी विरोध केला होता. या परीक्षेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर अन्याय होतो, खासगी कोचिंग संस्थांवर अवलंबून असलेले विद्यार्थी अधिक फायदेशीर ठरतात, गरीब आणि सामाजिकदृष्ट्या वंचित विद्यार्थ्यांच्या संधी कमी होतात अशी या विरोधामागची भूमिका होती. महाराष्ट्रात राज ठाकरे यांच्या मनसेसह अनेकांनी ही पद्धती बंद करा, अशी मागणी केली होती. काही शिक्षणतज्ज्ञांच्या मते, विद्यार्थ्यांच्या बारावीतील कामगिरीला अधिक महत्त्व दिले जावे किंवा प्रवेशासाठी बहुआयामी मूल्यांकन प्रणाली विकसित केली जावी. त्यामुळे राष्ट्रीय पातळीवरील परीक्षांचे विकेंद्रीकरण होणेही गरजेचे आहे. तसे झाल्यास केंद्र सरकारचे उत्तरदायित्व आपोआपच कमी होईल. एका परीक्षेतील गैरव्यवहाराचा परिणाम संपूर्ण देशावर होणार नाही. प्रत्येक राज्य आपला अभ्यासक्रम, भाषिक गरजा आणि स्थानिक परिस्थितीनुसार परीक्षा आयोजित करू शकेल; परंतु राज्यांची प्रशासकीय क्षमता, तांत्रिक पायाभूत सुविधा आणि सायबर सुरक्षा व्यवस्था समान नाही. त्यामुळे या बिकट समस्येवर काय तोडगा निघतो, हे पाहणे औचित्याचे ठरणार आहे.

---

**जेन-झी पेक्षा आमच्या मनात अधिक पुर्वग्रह, ईर्षा, मत्सर, हेवे-दावे आहेत का ? आमच्यावरील संस्कारांपासून आणि वैचारिक आग्रहांपासून मुक्त होऊन आम्ही या पिढीशी संवाद करण्यास तत्पर आहोत का ? या सर्व प्रश्नांची उत्तरे आता मिलेनियल्, जेन-एक्स आणि बुमर्स च्या पिढ्यांनी शोधली पाहिजे.**

## जंतर-मंतर : उत्क्रांतीचा पुढील टप्पा

आपल्या पृथ्वीवर निर्जीव पदार्थांमधून सजीव देह निर्माण झाले, तो उत्क्रांतीचा एक टप्पा होता. पुढे त्या सजीव देहांना अत्यंत विषम पर्यावरणात टिकून राहण्यासाठी ज्या ज्या प्रेरणा नैसर्गिकरित्या मिळत जाणे आवश्यक होते त्या त्या प्रेरणा त्यांच्या जाणीवेत उपजतपणे निर्माण होत गेल्या. स्वतःचे शरीर टिकवून ठेवणे, त्याचे पोषण करणे, बाह्य संकटांचा सामना करणे आणि आपल्या जातीचे (प्रजातीचे) आणखी जीव निर्माण करणे या त्यांच्या गरजा होत्या. त्यासाठी भूक, तहान, भय, आक्रमण (प्रसंगी हिंसा), लैंगिक वासना इत्यादी प्रेरणा सजीवांमध्ये सहजच वाढत गेल्या.

उत्क्रांतीच्या पुढील टप्प्यावर जेव्हा आईच्या गर्भातून बालक जन्माला येऊ लागले त्यावेळी ते बालक सक्षम होईपर्यंत त्याचे रक्षण, पोषण करणे ही प्रेरणा आयांमध्ये निर्माण झाली. त्यातूनच वात्सल्य, ममता, प्रेम या अधिक उच्च दर्जाच्या भावना देखील निर्माण झाल्या. मानवेतर प्राणी जन्मल्यावर लवकरच सक्षम होतात. परंतु मानवी बालकाला जन्मानंतर दीर्घकाळ जपावे लागते.

एकट्या आईला हे कठीण जाते म्हणून कुटुंब संस्था निर्माण झाली. आपण ज्या बालकाचे भरण-पोषण, रक्षण केले त्याने आपल्या वृद्धापकाळी आपलेही भरण-पोषण, रक्षण करावे अशी अपेक्षा आई-बापांमध्ये वाढू लागली. त्या अपेक्षेने आग्रही स्वरूप घेतले तेव्हा धार्मिक-सामाजिक नियमांच्या चौकटी आखल्या जाऊ लागल्या. मोठ्यांचे ऐकणे हा लहानांचा धर्म मानल्या गेला. ज्ञान हे आधीच्या पिढीकडून पुढच्या पिढीकडे वारश्याने मिळत असते, अशी समजूत रूढ झाली. पितृआज्ञा प्रमाण मानून वनवास स्वीकारणाऱ्या श्रीरामाचा आदर्श शेकडो वर्षे आमच्या समोर ठेवल्या गेला. समाजाला संशय असेल तर प्रसंगी पत्नीचाही त्याग करावा, म्हणजे स्वतःच्या व्यक्तिगत सुखाकडे /आनंदाकडे दुर्लक्ष करावे, असाही एक धडा श्रीरामांच्या चरित्रातुन शिकवला गेला.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देखील १९७० च्या दशकापर्यंत मध्यम वर्गीय हिंदूंची कुटुंबसंस्था व समाजव्यवस्था हेच पारंपारिक आदर्श प्रमाण मानत होती. तोपावेतो आमच्या कुटुंबातील स्त्रिया फारश्या घराबाहेर पडत नसत आणि त्यांचा सर्व वेळ स्वयंपाकघरात किंवा घराच्या देखभालीत खर्च होत असे. १९८० च्या दशकापासून ही परिस्थिती हळू हळू बदलू लागली. मुलीचे शिक्षण हे केवळ लग्नासाठी जास्तीचे क्वालिफिकेशन नसून त्यांनाही शिक्षण घेऊन स्वतःचे करियर शोधण्याचा हक्क आहे, अशी समाजभावना वाढत गेली. कुकिंग गॅस, मिक्सर, फ्रीज, वॉशिंग मशीन, स्कूटर, गिझर इत्यादी शोधांमुळे व त्या वस्तूंच्या वाढत्या उपलब्धतेमुळे स्त्रिया स्वयंपाकघरातून बऱ्यापैकी मोकळ्या होऊ लागल्या. १९८० नंतर तरुण मातांमध्ये जणू अष्टभुजा देवीचा संचार झाला आणि त्या एकाच वेळी नोकरी सांभाळून देखील स्वयंपाक करणे, मुलांना शाळेत सोडणे व परत आणणे, बाजारहाट करणे, घरखर्चाचा हिशेब ठेवणे इत्यादी कामे उत्साहाने करू लागल्या.

१९८१ ते ९६ दरम्यान जन्माला आलेल्या पिढीला मिलेनियल्स म्हणतात. ही पिढी संगणक, इंटरनेट व मोबाईल चा वाढता वापर करू लागली. त्यानंतर १९९७-२०१२ दरम्यान जन्माला आलेली पिढी स्मार्टफोन, सोशल मिडिया आणि हाय स्पीड इंटरनेट सहजपणे हाताळू लागली. याच पिढीला जेन-झी म्हणतात आणि नुकत्याच दिल्लीच्या जंतर-मंतर वर झालेल्या आंदोलनामुळे या पिढीने एकाएकी सार्वजनिक चर्चाविश्वात महत्वाचे स्थान मिळविले आहे.

जंतर-मंतर वरील आंदोलनापूर्वी मी या पिढीच्या पालकांकडून बऱ्याच तक्रारी ऐकत आलो आहे. मुख्य तक्रार ही की जेन-झी मुले-मुली समाजापासून तुटले आहेत. आई-बापांशी त्यांचा संवाद नसतो.

दिवसभर स्वतःला खोलीत कोंडून घेतात आणि सोशल मिडिया, गेम्स व फोन कॉल्स मध्ये व्यस्त असतात. त्यांना सामाजिक, राजकीय प्रश्नांची जाण नाही आणि घेणे-देणेही नाही. अनेक पालकांना आपली मुले मनोरुग्ण होत आहेत की काय अश्या चिंतेनेही ग्रासलेले असते.

परंतु २५ जुलै पूर्वीच्या ८-१० दिवसांमध्ये दिल्लीला जंतर-मंतर वर आणि अनेक राज्यांमध्ये रस्त्यांवर अथवा मैदानांवर हजारोंच्या संख्येने एकत्र आलेल्या जेन-झी पिढीचे जे एकूण वर्तन सोशल मिडियातून प्रत्यक्ष पाहायला मिळाले, ते थक्क करणारे होते. आमच्या पिढीला नेत्यांची आणि वैचारिक चौकटींची गरज भासायची. नेत्यांनी आवाहन केल्यानंतरच आंदोलने व्हायची आणि आपापल्या वैचारिक चौकटीनुसार मागण्या ठरलेल्या असायच्या. यावेळी कोणीही एक नेता दिसला नाही. कॉक्रोच जनता पार्टीचा संस्थापक अभिजित दिपके स्वतःच म्हणाला 'मला हिरो करू नका'. सरकारसोबतच्या वाटाघाटींमध्ये तो स्वतः सामील नव्हता. अभिजित दिपके दलित आहे आणि त्याने हाक दिल्यावर आंदोलनात सामील झालेले युवक युवती वेगवेगळ्या जाती-धर्मांचे आहेत. ते आपापल्या बुद्धीनुसार सहजतेने मिमिक्स, पोस्टर्स, घोषणा, गाणी इत्यादी माध्यमांतून व्यक्त होत होते. तरीही त्यांच्यात एक सुसंवाद आढळून येत होता. नेतृत्वपदाची स्पर्धा नव्हती.

विनोद आणि उपहास हे त्यांचे प्रभावी अस्त्र-शस्त्र होते. भय, चिंता, साशंकता त्यांच्या चेहऱ्यांवर दिसत नव्हती. गंभीर स्वरूपाच्या आंदोलनातही ते आपला आनंद टिकवून होते. द्वेष, कटुता, मत्सर, संताप या विकारांपासून त्यांनी बऱ्याच अंशी स्वतःला दूर ठेवले होते. दलित सवर्ण, हिंदू-मुस्लीम अश्या द्वैतापासून ते मुक्त होते. आंदोलनाची पुढील वाटचाल ठरविताना त्यांनी खूप लवचिकता दाखविली आणि ताठरपणा ठेवला नाही. त्यातले बहुसंख्य तरुण हे घट्ट वैचारिक चौकटींनी बांधलेले नव्हते. आमच्या पिढीसाठी हे एक अनुकरणीय उदाहरण आहे. खरेतर मनोरुग्ण ते आहेत की आम्ही, असाही पालकांनी स्वतःला प्रश्न विचारला पाहिजे. आमच्या अपेक्षांमध्ये आग्रही ताठरपणा असतो का ? निराग्रही लवचिकतेची व खुल्या मनाने समस्यांना सामोरे जाण्याची आमची तयारी असते का ? जेन-झी पेक्षा आमच्या मनात अधिक पुर्वग्रह, ईर्षा, मत्सर, हेवे-दावे आहेत का ? आमच्यावरील संस्कारांपासून आणि वैचारिक आग्रहांपासून मुक्त होऊन आम्ही या पिढीशी संवाद करण्यास तत्पर आहोत का ? या सर्व प्रश्नांची उत्तरे आता मिलेनियल्, जेन-एक्स आणि बुमर्स च्या पिढ्यांनी शोधली पाहिजे.

नैसर्गिक उत्क्रांतीने निदान भारतात तरी जुलै २०२६ मध्ये एक पाऊल पुढे टाकले आहे. संपूर्ण मानव जातीत सुसंवादी जीवनाचा विकास व्हावा, जाणिवांचे उन्नयन व्हावे या दिशेनेच वाटचाल होणार आहे. पण आतापर्यंतच्या उत्क्रांतीच्या इतिहासानुसार ही वाटचाल वेड्या-वाकड्या पद्धतीने, कधी दोन पावले मागे जात तर कधी चार पावले पुढे सरकत होत राहणार आहे.

**किशोर देशपांडे**

## जेन-झी:मोबाईलच्या पडद्यामागची उद्याची नेतृत्वशक्ती




अर्थातच ही अल्फा आहे जेन - झी नुसार कारण वयोवर्ष-२०२३ मध्ये जन्मलेले मूल हे जनरेशन अल्फा मध्येच गणले जाते,जेन-झी मध्ये नाही.

'इन्साफ की डगर पे,बच्चो दिखाओ चल के... ये देश है तुम्हारा, नेता तुम ही हो कल के...'या जुन्या गीतातील संदेश आजच्या जेन-झी पिढीकडे पाहिल्यावर अधिक अर्थपूर्ण वाटतो. आजची मुले ही फक्त मोबाईलमध्ये गुंतलेली पिढी नाही, तर माहितीच्या महासागरात वाढलेली, प्रश्न विचारणारी, मत मांडणारी आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारी पिढी आहे.

आपण अनेकदा तक्रार करतो की,'आजची मुले दिवसभर मोबाईलवर असतात.' पण प्रश्न मोबाईलचा नाही; प्रश्न त्याच्या वापराचा आहे.मुलांच्या हातातून मोबाईल हिसकावून घेण्यापेक्षा त्यांनी मोबाईलवर काय पाहत आहेत, काय शिकत आहेत आणि त्याचा समाजासाठी कसा उपयोग करत आहेत,हे पाहणे अधिक आवश्यक आहे. योग्य मार्गदर्शन मिळाले तर हेच तंत्रज्ञान ज्ञान, जागरूकता आणि सामाजिक जबाबदारीचे प्रभावी माध्यम बनू शकते.

अलीकडच्या अनेक सामाजिक आणि विद्यार्थी चळवळींमध्ये तरुणांनी सोशल मीडियाचा वापर करून मोठ्या प्रमाणात जनजागृती केली. माहिती पोहोचवली, लोकांना जोडले आणि आपल्या भावना व्यक्त केल्या. हे पाहून एक गोष्ट स्पष्ट होते,उद्याचा भारत घडवणारी पिढी विचार करत आहे, प्रश्न विचारत आहे आणि समाजाशी जोडली जात आहे.

अर्थात,लोकशाहीत प्रत्येक आंदोलन किंवा प्रत्येक मत योग्यच असेल असे नाही. पण संविधानाच्या चौकटीत राहून शांततेच्या मार्गाने प्रश्न विचारणे, माहितीची पडताळणी करणे, संवाद साधणे आणि अन्यायाविरोधात आवाज उठवणे ही लोकशाहीची खरी ताकद आहे.आपल्या संस्कृतीनेही अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची, सत्याची बाजू घेण्याची आणि समाज हितासाठी कार्य करण्याची शिकवण दिली आहे.

आज पालकांनी मुलांना फक्त 'मोबाईल बंद कर' असे सांगण्यापेक्षा,'तू काय पाहतोस?','काय शिकतोस?','काय विचार करतोस?' हे विचारण्याची वेळ आली आहे. कारण योग्य दिशा मिळाल्यास मोबाईल हा केवळ मनोरंजनाचे साधन न राहता ज्ञान,नेतृत्व आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र ठरू शकतो.देशाला केवळ पदवीधर नव्हे, तर जागरूक, संवेदनशील, संविधानावर विश्वास ठेवणारे आणि जबाबदार नागरिक हवे आहेत. उद्याचे न्यायाधीश, शास्त्रज्ञ, प्रशासक, पत्रकार, उद्योजक आणि लोकप्रतिनिधी हे आजचेच तरुण आहेत. त्यांच्या हातात मोबाईल आहे; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या हातात उद्याच्या भारताचे भविष्य आहे.

म्हणूनच त्या जुन्या गीतातील ओळी आजही प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी आहेत..'ये देश है तुम्हारा, नेता तुम ही हो कल के' ही केवळ गाण्याची ओळ नाही, तर प्रत्येक नव्या पिढीवर असलेल्या जबाबदारीची जाणीव आहे.चला, आजच्या मुलांवर अविश्वास न दाखवता त्यांना योग्य दिशा, योग्य संस्कार आणि योग्य विचार देऊया. कारण उद्याचा भारत त्यांच्या हातांनीच घडणार आहे.


**ॲड. धनंजय देशमुख**
मो.९२८४३८२१०२

### गुरू जीवन जगण्याची योग्य दृष्टी

एक महात्मा आपल्या दोन शिष्यांची परीक्षा घेतात. दोघांनाही एक फळ देऊन आज्ञा देतात 'जिथे तुम्हाला पाहणारे कोणीच नसेल, अशा ठिकाणी जाऊन हे फळ खा.' एक शिष्य खोली बंद करून फळ खातो; परंतु दुसरा शिष्य खूप जागा शोधतो, अखेर फळ घेऊन परत येतो. तो म्हणतो,'गुरुदेव, मला अशी जागाच सापडली नाही. कारण देव सर्वत्र आहे. मी कुठेही गेलो, तरी देव मला पाहत होता. तसेच माझ्या मनात तुम्ही आहात त्यामुळे माझ्या प्रत्येक कृतीकडे, विचाराकडे तुमचे लक्ष आहे असे मला जाणवले' हीच खरी गुरुकृपा आणि गुरूंच्या शिकवणीचे सार आहे. गुरूंचे ज्ञान केवळ ऐकून उपयोग होत नाही, ते आचरणात उतरवले की ते जीवनाला दिशा देते. आजच्या धावपळीच्या जीवनात माणूस देवाला मंदिरापुरता मर्यादित समजतो; पण गुरू शिकवतात की देव प्रत्येक जीवात, प्रत्येक क्षणात आणि प्रत्येक कृतीत आहे. ही अनुभूती ज्याला येते, त्याचे जीवनच बदलते. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आपणही गुरूंच्या शिकवणीचे केवळ श्रवण न करता ती आचरणात आणण्याचा संकल्प करूया. गुरूंच्या मार्गदर्शनानेच अज्ञानाचा अंधार दूर होऊन आत्मज्ञानाचा प्रकाश प्राप्त होतो.गुरूंचे खरे ऋण फेडण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्यांच्या शिकवणीप्रमाणे जीवन जगणे होय.

**प्रांजली ब्रम्हे**

## देशाच्या आरोग्य व्यवस्थेला लागलेला नफ्याचा 'कॅन्सर' !



विज्ञान, तंत्रज्ञान संशोधनाचा फायदा मानव जातीला होण्याच्या ऐवजी कॉर्पोरेट भांडवलशाही सुपर प्रॉफिट्स कमावण्यासाठी करत आहे. वैद्यकीय क्षेत्र त्याचे नागडे उघडे उदाहरण आहे. इतरही बरीच आहेत.'आयसीएमआर'च्या आकडेवारीनुसार २०२५ या वर्षात देशात १५.७ लाख नवीन कॅन्सर रुग्णांची नोंद झाली. हा आकडा दरवर्षी वाढतच आहे. हा फक्त एका वर्षाचा आकडा.आधीच्या वर्षामध्ये कॅन्सरची बाधा झाल्याचे निदान झालेले आणि आज जिवंत असणाऱ्यांची संख्या २५ लाख आहे असे सांगितले जाते.हे दोन आकडे एकत्रितपणे बघितले की कॅन्सरला यमाचे बोलावणे का म्हणतात ते समजते. एका वर्षात १५ लाख आणि तरीदेखील संचित आकडा २५ लाख. यातून हेच दिसून येते की कॅन्सरचे निदान झाल्यानंतर रुग्ण काही वर्षात मृत्यू पावण्याची शक्यता इतर गंभीर आजारांपेक्षा जास्त आहे.

जागतिक आकडेवारी देखील याला दुजोरा देते. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार जगात दरवर्षी दोन कोटी रुग्णांना कॅन्सरचे निदान होते, संचित आकडा सव्वा पाच कोटी आणि दरवर्षी मृत्यू पावणाऱ्या कॅन्सर रुग्णांची संख्या एक कोटी. नवउदारमतवादाने आपला एवढा ब्रेनवॉश केला आहे की व्यक्तीचे/कुटुंबाचे गंभीर प्रश्न हे त्यांची व्यक्तिगत शोकांतिका आहे असे सगळेजण मानतात. व्यक्तिगत म्हणजे ज्याने त्याने निस्तरावी किंवा आयुष्यभर यातना सहन कराव्यात. दैवाला दोष द्यावा. नाही सहन झाले तर आत्महत्या करावी.प्रत्येक नागरिकाच्या कुटुंबाच्या व्यक्तिगत समस्या असतात हे कोणी नाकारणार नाही. पण कोणत्या समस्यांची मुळे सिस्टिममध्ये असतात किंवा सिस्टीम शत्रुभावी असल्यामुळे उद्भवणाऱ्या समस्येची तीव्रता कमी होण्याऐवजी कशी अधिक तीव्र, जीव घेणारी होतेष्ठ. यावर आपण विचार केला पाहिजे.

कॅन्सर आजाराचे उदाहरण घ्या. कँसर रोगाची मुळे देखील सिस्टीम केंद्री आहेत असे तज्ज्ञ सांगतात. पण ही पोस्ट त्यासाठी नाही. कँसर झाल्यानंतर होऊ शकणाऱ्या उपचारांबद्दल आहे. आधुनिक कॅन्सर आजाराचे निदान झाल्यानंतर काय उपचार, काय थेरपी करायच्या यावर गेल्या काही वर्षात खूप उपयुक्त संशोधन झाले आहे. ज्यांना ते उपचार मिळतात ते कॅन्सरवर मात करून चांगले आयुष्य जगत आहेत. दुसऱ्या बाजूला ज्यांना त्या संशोधनाचा लाभ मिळत नाही ते फार काळ जगत नाहीत.

कॅन्सरमुळे मृत्यू पावणाऱ्यांमध्ये उपचार न परवडल्यामुळे मृत्यू पावण्याचे कारण खूप मोठे आहे आणि अर्थात हे सर्व नागरिक गरीब/निम्न मध्यमवर्गीय आहेत.लेट मी रिपीट. कॅन्सरची लागण झाली आणि रुग्ण मृत्यू पावला असे ते नाहीये. कॅन्सरची लागण झाल्यानंतर उपलब्ध प्रगत उपचार न परवडल्यामुळे मृत्यू पावला असे ते आहे. कारण केमो पासून सर्जरी पर्यंतच्या सर्व उपचारांना हजारो पासून लाखो पर्यंत पैसे लागतात. कँसर पेशंट असणाऱ्या आजूबाजूच्या कुटुंबाना विचारा.

कॅन्सर आजारावरील उपचार करणारी सार्वजनिक इस्पितळे, रुग्णांच्या संख्येच्या मानाने खूप कमी आहेत. त्याची कारणे आरोग्य क्षेत्र खाजगी मालकीला नफा कमवण्यासाठी ओपन करू देण्यामध्ये आहेत. आपल्या रुग्णाचा जीव न वाचवण्याचा ऑप्शन कुटुंबीयांकडे नसल्यामुळे अशा रुग्णांना नाईलाजाने कॉर्पोरेटीकरण/वित्तियकारणाने वेढलेल्या खाजगी इस्पितळातून महागड्या सेवा घ्यायला भाग पडते. कॉर्पोरेट हॉस्पिटल्स चेन्सच्या उत्पन्न आणि नफ्याच्या आकडेवारीत हे पकडले जाते. मोठ्या कॉर्पोरेट हॉस्पिटलसच्या वार्षिक उत्पन्नापैकी १७ ते २५ टक्के उत्पन्न त्यांच्या एकट्या ऑन्कोलॉजी डिपार्टमेन्टकडून मिळत आहे. उत्पनाचे आणि नफ्याचे रुपयातील आकडे काही हजार रुपये आहेत.

हॉस्पिटल उद्योगात हे सिक्रेट पोचले आहे की ऑनकॉलॉजि सेवांची मागणी वाढत आहे आणि हे देखील की त्यातील नफ्याच्या मार्जिन्स प्रचंड आकर्षक आहेत. त्यामुळे आज अनेक खाजगी छोटी मध्यम हॉस्पिटल्स ऑन्कोलॉजी डिपार्टमेंट सुरु करण्याच्या स्पर्धेत उतरली आहेत. (आकडेवारी व संदर्भ बिझिनेस लाईन जुलै २०, पान क्रमांक ६)

**संजीव चांदोरकर**

# फातिमा शेख नगर परिषद शाळेत नगराध्यक्षांचा धडक तपासणी दौरा..!

## मुख्याध्यापकांच्या निलंबनाचे निर्देश, अनुपस्थित शिक्षकांवर ही कारवाई

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**यवतमाळ, दि. २८ :** नगर परिषदेच्या फातिमा शेख नगर परिषद शाळेत मंगळवारी सकाळी ७ वाजता नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शिनी अशोक उईके यांनी अचानक भेट देत शाळेच्या कामकाजाची सखोल पाहणी केली. या धडक तपासणीदरम्यान शाळेतील अनियमितता उघडकीस आल्याने मुख्याध्यापकांच्या निलंबनासाठी तातडीने कारवाईचे निर्देश देण्यात आले. तसेच विनापरवानगी अनुपस्थित असलेल्या काही शिक्षकांची चौकशी करून त्यांच्यावरही नियमानुसार कठोर कारवाई करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

पाहणीदरम्यान नगराध्यक्षा उईके यांनी विविध वर्गांना भेट देऊन विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. शैक्षणिक सुविधा, दैनंदिन अध्यापन, शिक्षकांची उपस्थिती तसेच विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींची माहिती त्यांनी प्रत्यक्ष जाणून घेतली. यावेळी मुख्याध्यापक अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आले. तसेच काही शिक्षकही पूर्वपरवानगीशिवाय गैरहजर असल्याचे आढळून आले. विद्यार्थ्यांकडून मिळालेली माहिती आणि प्रत्यक्ष पाहणीत समोर आलेल्या बाबींची नोंद घेत संबंधितांवर प्रशासकीय कारवाईची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शिनी उईके यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, नगर परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिक्षकांची नियमित उपस्थिती आणि शाळांमधील शिस्त राखणे ही प्रशासनाची सर्वोच्च जबाबदारी आहे. आपल्या कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. नगर परिषदेच्या सर्व शाळांमध्ये शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना सक्षम शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी अशा अचानक पाहण्या नियमितपणे सुरू राहतील. विद्यार्थ्यांच्या भविष्यासोबत खेळणाऱ्या कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्यावर नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शिनी अशोक उईके यांनी यावेळी दिला.

# 'रस्ता तुमच्या बापाचा आहे का?' म्हणत धमकी..!

## वाईलिंगीत पांदण रस्त्यावरून वाद चिघळला

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**दिग्रस, दि. २८ :** दिग्रस तालुक्यातील वाईलिंगी येथे शासनाच्या मनरेगा योजनेतून तयार करण्यात आलेल्या हनुमान मंदिर ते ऋषिटेकडी पांदण रस्त्यावरून पुन्हा वाद उफाळून आला असून, रस्त्याने ये-जा करणाऱ्या ग्रामस्थांना अडवून अश्लील शिवीगाळ, दमदाटी व जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे गावातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचा दावा करत सुमारे ४० ग्रामस्थांनी मंगळवारी तहसीलदार मयूर राऊत तसेच दिग्रस पोलीस ठाण्यात प्रतिबंधात्मक कारवाईची मागणी करणारे निवेदन सादर केले.

निवेदन नुसार, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून मंजूर झालेला हा पांदण रस्ता पोलीस बंदोबस्तात पूर्ण करण्यात आला असून, परिसरातील शेतकरी याच मार्गाचा वापर करतात. मात्र संबंधित शेत मालक प्रकाश हरसिंग पवार हे रस्त्यावरून जाणाऱ्यांना अडवून "रस्ता तुमच्या बापाचा आहे का?" असे म्हणत अश्लील शिवीगाळ करतात तसेच सरपंच व त्यांच्या पती बाबत ही आक्षेपार्ह वक्तव्य करून जिवे मारण्याच्या धमक्या देत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकारामुळे महिलांसह शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाल्याने संबंधित व्यक्तीवर प्रतिबंधात्मक कारवाई करून गावातील शांतता कायम ठेवावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर सरपंच प्रियंका जाधव यांच्यासह सुमारे ४० ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. दरम्यान, या प्रकरणातील आरोप हे ग्रामस्थांनी प्रशासनाकडे दिलेल्या लेखी निवेदनावर आधारित असून, संबंधित व्यक्तीची बाजू अद्याप समोर आलेली नाही. प्रशासनाच्या चौकशीनंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

# धमकी की दडपशाही? माहिती मागणाऱ्या पत्रकाराला कथित धमकी..!

## SPकडे तक्रार, CCTV जतन करण्याची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दिग्रस, दि. २८ :** वृत्तसंकलनासाठी अधिकृत माहिती घेण्यास गेलेल्या पत्रकाराला पोलीस उपनिरीक्षकाने कथितरित्या धमकावत अपमानास्पद वागणूक दिल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणी पत्रकार अजित पाटील महिंद्रे यांनी यवतमाळचे पोलीस अधीक्षक यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करून संबंधित अधिकाऱ्यावर चौकशी व शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी केली आहे.

तक्रारीनुसार, दि. २४ जुलै २०२६ रोजी दुपारी सुमारे २ ते ३.३० वाजण्याच्या दरम्यान दिग्रस पोलीस ठाण्यात रेतीने भरलेला ट्रक जप्त करून आणल्याची माहिती मिळाल्यानंतर त्या घटनेची अधिकृत माहिती जाणून घेण्यासाठी पत्रकार अजित पाटील महिंद्रे हे पोलीस ठाण्यात गेले होते. त्यावेळी पत्रकार अशोक जाधव हेही त्यांच्यासोबत उपस्थित होते. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंडे यांच्या उपस्थितीत चर्चा सुरू असताना पोलीस उपनिरीक्षक पंकज दाभाडे यांनी, "तू माहिती का विचारतो? तुझी नोंद रजिस्टरमध्ये घेतो. तुझ्यावर खोटे गुन्हे दाखल करतो," अशा शब्दांत धमकी दिली व अपमानास्पद वागणूक दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. पत्रकार अजित पाटील यांनी तक्रारीत म्हटले आहे की, लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा प्रतिनिधी म्हणून शासकीय कामकाजातील पारदर्शकतेसाठी माहिती मागणे हा पत्रकारांचा वैधानिक व व्यावसायिक अधिकार आहे. मात्र, माहिती विचारल्यामुळेच धमकी देऊन दबाव टाकण्याचा प्रयत्न झाल्याने पत्रकार म्हणून आपल्या प्रतिमेला धक्का बसला असून मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक पंकज दाभाडे यांच्याविरुद्ध सखोल चौकशी करून आवश्यक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, पत्रकारांना कर्तव्य बजावण्यापासून रोखणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर भूमिका घ्यावी, तसेच ही घटना पोलीस निरीक्षकांच्या दालनात घडल्याचा दावा असल्याने संबंधित CCTV फुटेज तातडीने सुरक्षित ठेवून त्याची तपासणी करण्यात यावी, अशी मागणीही तक्रारीत करण्यात आली आहे. सदर तक्रारीची प्रत मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच पोलीस महासंचालक, मुंबई यांनाही पाठविण्यात आली आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षेत पूर्वा तेलंगेची दमदार भरारी..!

## ३०० पैकी २६४ गुणांसह ८८ टक्के यश.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**राळेगाव, दि. २८ :** अरविंद तेलंगे राळेगाव शहरातील संत तुकडोजी महाराज प्राथमिक शाळेची इयत्ता सातवीची विद्यार्थिनी पूर्वा अमोल तेलंगे हिने शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत ३०० पैकी २६४ गुण मिळवून ८८ टक्के गुणांची चमकदार कामगिरी केली आहे. तिच्या या यशामुळे शाळेसह पालक व परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पूर्वाच्या या यशाबद्दल संत तुकडोजी महाराज प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक तसेच शिक्षकवृंद यांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच शिष्यवृत्ती मार्गदर्शन वर्गाचे अमोल सर, सौ. शारदा अमोल पाहुणे व सर्व शिक्षिका यांनी पूर्वाच्या घरी भेट देऊन तिचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार केला. तिच्या मेहनतीचे आणि गुणवत्तेचे कौतुक करत भविष्यातही अशाच उज्ज्वल यशाची अपेक्षा व्यक्त केली. पूर्वा तेलंगे हिने मिळविलेल्या या घवघवीत यशाबद्दल राळेगाव तालुक्यातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तिच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत आहे. तिच्या या यशाचे श्रेय तिने आई-वडील, शिक्षक व मार्गदर्शक यांना दिले आहे.

## थोडक्यात



### राज्यस्तरीय निबंध स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद..!

**३७५ विद्यार्थ्यांनी व्यक्त केले राष्ट्रीय विचार**

**उमरखेड :** स्व. शिवलालजी गोकुलदासजी राठी यांच्या स्मरणार्थ श्री हरिकिशनजी बजाज मेमोरियल माहेश्वरी शिक्षण विकास संस्था, नांदेड आणि स्व. शिवलालजी राठी स्मृती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय भव्य निबंध स्पर्धा उत्साहात पार पडली. उमरखेड येथील साकळे विद्यालयात झालेल्या या स्पर्धेत इयत्ता ८ वी ते १२ वीच्या ३७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. राष्ट्रीय भावना व सामाजिक भान जागृत करण्याच्या उद्देशाने आयोजित स्पर्धेचा विषय ऐनवेळी जाहीर करण्यात आला. मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत ४०० शब्दांच्या मर्यादेत विद्यार्थ्यांनी निबंध सादर केले. स्पर्धेचे परीक्षण गोपनीय व पारदर्शक पद्धतीने होणार असून, १५ ऑगस्ट रोजी गुणवंतांना रोख पारितोषिके व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. डॉ. सुशील राठी, गोपाललालजी लोया यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा यशस्वी झाली. आयोजनासाठी संदीप भट्टड, स्वप्रील काचर्डे, नंदकिशोर पुरमे, गणेश कळलावे तसेच मुख्याध्यापक व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.




### गुरुकुल कॉन्व्हेंट विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**झरी :** तालुक्यातील मुकूटबन येथील गुरुकुल विद्यालयाने सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करुन शाळेच्या शैक्षणिक यशाची परंपरा कायम राखली आहे . विद्यालयातील विद्यार्थीनी कु.आध्या अभिजित दसनापूरे कु.स्वरांशी संजय दानव कु.टिंकल राजेंद्र वराकर उत्कृष्ठ गुण मिळवत यशाची पताका फडकावली . या यशाबद्दल यशस्वी विद्यार्थीनीचे त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे तसेच पालकांचे विद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले . विद्यार्थ्यांच्या या यशामागे नियमित अभ्यास शिक्षकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन आणि पालकाचे सहकार्य हे महत्वाचे घटक असल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले . यावेळी मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असुन भविष्यातही अशाच गुणवंत विद्याथ्र्यांची परंपरा कायम राहील असा विश्वास व्यक्त केला .

### आत्महत्या प्रकरणानंतर नवे आरोप,आरोपींवर कारवाईची मागणी

**डॉ. सुषमा वानखेडे यांची पोलिस अधीक्षकांकडे तक्रार जामीन रद्द करून अटक व कुटुंबाला संरक्षण देण्याची मागणी**

**यवतमाळ :** सावंगी (मेघे) येथील आत्महत्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर डॉ. सुषमा अरुण वानखेडे यांनी उत्तम गणपती वानखेडे व लक्ष्मी उत्तम वानखेडे (रा. उमरखेड) यांच्याविरुद्ध वर्धा पोलिस अधीक्षकांकडे तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत संबंधितांकडून जीवे मारण्याच्या धमक्या, मानसिक छळ, न्यायालयात खोटे प्रतिज्ञापत्र सादर करून दिशाभूल तसेच शासनाला चुकीची माहिती दिल्याचे आरोप करण्यात आले आहेत. तक्रारीनुसार, सावंगी पोलिस ठाण्यात C.R. क्र. ५५४/२०२६ अन्वये BNS कलम ७४, ७५(१)(i), ७९ तसेच POCSO कायद्यातील कलम ८ अंतर्गत गुन्हा दाखल असूनही संबंधितांवर अपेक्षित कारवाई झालेली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. आरोपींचा जामीन तातडीने रद्द करून अटक करावी, सखोल चौकशी करावी आणि फिर्यादीसह त्यांच्या कुटुंबाला पोलिस संरक्षण द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, तक्रारीतील आरोपांची स्वतंत्रपणे अधिकृत पुष्टी झालेली नसून, या प्रकरणात पोलिस प्रशासन पुढे कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### औषधा शिवाय उपचारांची संधी..!

**बाभूळगावात सहा दिवसीय एक्युप्रेशर- सुजोक चिकित्सा शिबिर**

**बाभूळगाव :** जैन स्थानक, बाभूळगाव यांच्या पुढाकाराने २९ जुलै ते ३ ऑगस्ट दरम्यान एक्युप्रेशर, सुजोक व व्हायब्रेशन चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. श्री अंबाजी महाराज मंदिराजवळील जैन स्थानकात सकाळी ७.३० ते १२.३० व सायंकाळी ४ ते ८.३० या वेळेत उपचार होतील. सहा दिवसांसाठी केवळ २०० रुपये नोंदणी शुल्क असून उपचार मोफत दिले जाणार आहेत. जोधपूर (राजस्थान) येथील तज्ज्ञ थेरपिस्ट टीएच जितेंद्र कुमार व टीएच प्रकाश चौधरी विविध वेदना, सांधेदुखी, मधुमेह, रक्तदाब, थायरॉईड, मानसिक तणाव आदी समस्यांवर उपचार करणार आहेत. नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# माणुसकीचा हात शिवरकर कुटुंबासाठी १.५५ लाखांची हृदयस्पर्शी मदत

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**राळेगाव, दि. २८ :** संकटाच्या काळात समाज एकवटला तर दुःखाचा भार हलका होतो, याची प्रचिती राळेगावमध्ये पुन्हा एकदा आली. कॅन्सरग्रस्त सुरेश शिवरकर यांच्या कुटुंबावर पत्नीच्या निधनानंतर दुःखाचा डोंगर कोसळला असताना, संपूर्ण राळेगाव शहराने माणुसकीचा हात पुढे करत तब्बल १,५५,६१८ इतकी आर्थिक मदत उभी केली. भाजीपाला विक्री करून संसार चालवणारे सुरेश शिवरकर कॅन्सरशी झुंज देत आहेत. उपचारासाठी सर्व बचत खर्ची पडली, व्यवसायही बंद पडला. पतीच्या सेवेत दिवस-रात्र झटणाऱ्या पत्नी वनश्री शिवरकर यांचे डबल निमोनियामुळे २९ जून रोजी निधन झाले.

त्यामुळे तीन लहान मुलांचे भविष्य अंधारात आले. या कुटुंबाला मदतीची गरज असल्याचे पत्रकार प्रकाश खुडसंगे यांनी सोशल मीडियावरून भावनिक आवाहन केले. त्यानंतर सामाजिक कार्यकर्ते देविदास खुणकर, विक्रम सैय्यद, अनिल भोयर, गोविंद खुणकर व दिगंबर भूत यांच्या पुढाकारातून शहरातील व्यापारी, नागरिक व युवकांनी मदत संकलन मोहीम राबवली. अनेक दानशूर नागरिकांनीही ऑनलाईन आर्थिक हातभार लावला. याशिवाय संत गजानन महाराज मित्र मंडळ, सोनुर्ली रोड मॉर्निंग ग्रुप आणि संत गाडगे महाराज ज्येष्ठ नागरिक ग्रुप यांनीही उदार मदत दिली. जमा झालेली संपूर्ण रक्कम शिवरकर कुटुंबाला त्यांच्या घरी जाऊन सुपूर्द करण्यात आली. जाती-धर्म, पक्ष आणि पंथाच्या सीमा विसरून राळेगावकरांनी दिलेला हा आधार केवळ आर्थिक मदत नसून, संकटात माणूस माणसासाठी उभा राहतो, हा सामाजिक संदेश देणारा प्रेरणादायी आदर्श ठरला आहे.

# अवघ्या तीन तासांत जबरी चोरीचा पर्दाफाश..!

## ८४ हजारांचा मुद्देमाल जप्त, आरोपी जेरबंद

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद , दि. २८ :** पुसद शहरातील स्मार्ट बाजार परिसरात वृद्धाची १४,५०० रुपयांची जबरी चोरी करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या तीन तासांत जेरबंद करत गुन्ह्याचा छडा लावला. या कारवाईत चोरीची संपूर्ण रक्कम, गुन्ह्यात वापरलेली पल्सर दुचाकी व मोबाईलसह एकूण ८४,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

२७ जुलै रोजी महाराष्ट्र बँकेतून पैसे काढून घरी जात असलेल्या आझाद लतीफ सय्यद (वय ६५) यांना अडवून झटापट करत खिशातील १४,५०० रुपये हिसकावून नेण्यात आले होते. या प्रकरणी पुसद शहर पोलिसांत गुन्हा दाखल झाला होता. गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बसस्थानक परिसरात सापळा रचून आनंद विलास पवार (वय २०, रा. आरंभी, ता. दिग्रस) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर चोरीची रक्कम जप्त करण्यात आली. आरोपीला पुढील कारवाईसाठी पुसद शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

# कर्जमुक्तीचा लाभ हवा,पात्र शेतकऱ्यांनी तातडीने मोफत e-KYC करा..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २८ :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची यादी जाहीर करण्यात आली असून, कर्जमुक्तीचा लाभ मिळविण्यासाठी सर्व लाभार्थ्यांनी तातडीने आधार प्रमाणीकरण (e-KYC) पूर्ण करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

पात्र लाभार्थ्यांची यादी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राष्ट्रीयीकृत बँका, ग्रामपंचायत, गावचावडी, सहाय्यक निबंधक कार्यालय, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था तसेच संबंधित बँकांच्या कार्यालयात प्रसिद्ध करण्यात आली आहे. यादीत नाव असलेल्या शेतकऱ्यांनी जवळच्या सेतू सुविधा केंद्रावर जाऊन मोफत e-KYC करून घ्यावे. आधार प्रमाणीकरणासाठी बँकेचे पासबुक, आधार कार्ड, लाभार्थी यादीतील Specific ID आणि आधारशी संलग्न मोबाईल क्रमांक आवश्यक आहे. सहकार आयुक्त व निबंधक, सहकार संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या २७ जुलै २०२६ च्या निर्देशानुसार e-KYC सेवा पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली आहे. ज्या लाभार्थी शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण यशस्वीरीत्या पूर्ण होईल, त्यांच्या बँक खात्यात शासनाकडून कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी कोणताही विलंब न करता तातडीने e-KYC प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार राजेंद्र इंगळे तथा सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था) अजित देहणकर यांनी केले आहे.

# टिनशेड कोसळून उघड झाला आर.एम. इंटरनॅशनल स्कूलचा हलगर्जी कारभार..!

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**राळेगाव, दि. २८ :** राळेगाव येथील आर.एम. इंटरनॅशनल स्कूल (बचपन पब्लिक स्कूल) मधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत गंभीर निष्काळजीपणा समोर आला आहे. शाळेच्या परिसरात उभारण्यात आलेल्या जुन्या टिनपत्रे आणि ताडपत्रीने झाकलेल्या टिनशेडवर मुसळधार पावसाचे पाणी साचल्याने ते अचानक कोसळले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र घटनेच्या वेळी विद्यार्थी परिसरात असल्याने मोठी दुर्घटना थोडक्यात टळल्याची चर्चा आहे.

घटनेनंतर संतप्त पालकांनी शाळेत धाव घेत प्रशासनाला जाब विचारण्याचा प्रयत्न केला. मात्र शाळेचे प्रभारी शुक्ला हे अनुपस्थित असल्याने त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे पालकांमध्ये संतापाची लाट उसळली असून शाळा व्यवस्थापनाच्या निष्काळजी कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करून जीर्ण अवस्थेतील टिनशेडचा वापर करण्यात आल्याचा आरोप पालकांनी केला आहे. अशा प्रकारची घटना भविष्यात पुन्हा घडू नये, यासाठी संपूर्ण शाळा इमारत, टिनशेड व इतर संरचनांची तातडीने तांत्रिक सुरक्षा तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे. या घटनेमुळे आपल्या पाल्यांच्या सुरक्षिततेबाबत पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शिक्षण विभागाने तातडीने या प्रकरणाची चौकशी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

# यवतमाळ बँकेतून दीड लाखाची चोरी

**यवतमाळ, दि. २८ :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेत दिवसाढवळ्या चोरीची एक खळबळजनक घटना घडली आहे. कॅश काउंटरवर कर्तव्य बजावत असलेल्या महिला कॅशियर सौ. ज्योती रामकृष्ण घोटेकर या थोड्या वेळासाठी वॉशरूमला गेल्या होत्या. नेमकी हीच संधी साधून आरोपी शालिकराम चेतन मांडवगळे (वय ३०, रा. देवीनगर लोहारा) याने कुणाच्याही लक्षात न येता कॅश काउंटरवरून ५०० रुपयांच्या नोटांचे ३ बंडल, म्हणजेच एकूण १ लाख ५० हजार रुपयांची रोकड शिताफीने लांबवली. हा प्रकार काही वेळातच उघडकीस आल्यानंतर बँकेत एकच तारांबळ उडाली. याप्रकरणी अवधूतवाडी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

# अमरावतीतील ऐतिहासिक सोमेश्वर महादेव देवस्थानची मालकी अबाधित

## 'तो' बेकायदेशीर आदेश अखेर रद्द

**अमरावती/का.प्र.**

येथील भाजीबाजार परिसरातील श्री सोमेश्वर महादेव संस्थानच्या मालकीची, बाजारमूल्यानुसार तब्बल ५० कोटी रुपये किमतीची १२ एकर (४.८५ हेक्टर) मोक्याची शेतजमीन कुळ कायद्यांतर्गत कब्जेदार सुमन रामरतन कोठार यांच्या नावे अवघ्या ९६० रुपयांमध्ये खरेदी देण्याचा अमरावतीचे तत्कालीन तहसीलदार विजय लोखंडे यांचा २६ सप्टेंबर २०२४ रोजीचा बेकायदेशीर आदेश उपविभागीय अधिकारी , अमरावती यांनी पूर्णतः रद्द केला आहे. याबाबतची माहिती पत्रकार परिषदेमध्ये मंदिर महासंघाचे राज्य कोर कमिटी पदाधिकारी अनुप जयस्वाल यांनी दिली.

पत्रकार परिषदेला मंदिर महासंघाचे विदर्भ समन्वयक श्रीकांतजी पिसोळकर, सावंगा विठोबा संस्थानचे सचिव अशोकजी सोनवाल, जिल्हा समन्वयक सचिनजी वैद्य, श्रीराम मंदिर चे विश्वस्त हरिभाऊ नानवटकर, विष्णू संस्थांनचे मनोज वानखडे, सुरज वानखडे, डॉ चंद्रशेखर गिरी, सोमेश्वर संस्थांनचे विश्वस्त अमोल इंगोले, रवींद्र डहाके व इतर




उपस्थित होते. तहसीलदारांनी मूळ सुनावणीदरम्यान कोणतीही साक्ष-पुरावे नोंदवले नाहीत, उलटतपासणी घेतली नाही, आणि अपील कालावधी शिल्लक असतानाच घाईघाईने खरेदी प्रमाणपत्र निर्गमित केले. तसेच धर्मादाय आयुक्तांची कोणतीही पूर्वपरवानगी घेण्यात आली नव्हती. ही बाब महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राज्य पदाधिकारी अनुप जयस्वाल यांच्या निदर्शनास आल्यावर मंदिर महासंघाने या विक्री आदेशास कडाडून विरोध दर्शवला. तसेच संस्थानच्या वतीने श्री. रवींद्र डहाके, अमोल इंगोले व इतर विश्वस्तांनी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे अपील दाखल केले.

सदर शेतजमीन अमरावती महानगरपालिकेच्या हद्दीत येत असल्याने कुळ वहीवाट अधिनियमाच्या तरतुदीनुसार तिला कुळ कायदा लागूच होत नाही. उपविभागीय अधिकाऱ्यांच्या न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने संस्थानला २१ ऑगस्ट १९६९ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या 'सुट प्रमाणपत्राची' प्रत सादर करण्यात आली. श्री सोमेश्वर संस्थान हे मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेअंतर्गत रीतसर नोंदणीकृत संस्थान असल्याने तसेच संस्थानकडे कुळ कायद्यांतर्गत प्राप्त सुट प्रमाणपत्र उपलब्ध असल्याने, उपविभागीय अधिकाऱ्यांनी संस्थानचे अपील मंजूर करत तहसीलदारांचा बेकायदेशीर आदेश ८ जुलै २०२६ रोजी रद्द केला. या प्रकरणी संस्थानच्या वतीने ॲड. रमण जयस्वाल यांनी, तर कब्जेदार सुमन रामरतन कोठार यांचे वतीने ॲड. ऋषी छाबडा यांनी बाजू मांडली. ही मौल्यवान शेतजमीन मनपा हद्दीत असल्याने व तिचे बाजारमूल्य ५० कोटींच्या घरात असल्याने सुनावणीदरम्यान संबंधित बिल्डर लॉबी प्रशासकीय स्तरावर अत्यंत सक्रिय असल्याचे दिसून आले होते. मात्र, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा राज्यस्तरावर सातत्याने सुरू ठेवल्याने प्रशासनावर नैतिक दबाव निर्माण झाला आणि बिल्डर लॉबीचे मनसुबे उधळून लावण्यात यश आले. या निर्णयात अनुप जयस्वाल यांच्यासह रवींद्र डहाके, अमोल इंगोले या संस्थानच्या विश्वस्तांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

## संक्षिप्त

### पुण्यात २ ऑगस्टला गुरुपौर्णिमा उत्सव

#### मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित राहणार

**अमरावती-**श्री संत अच्युत महाराज सांस्कृतिक प्रतिष्ठान,



पुणे यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही श्री संत अच्युत महाराज गुरुपौर्णिमा उत्सव रविवार २ ऑगस्टला सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत भारतरत्न पंडित भीमसेन जोशी कलामंदिर, औंध पुणे येथे आयोजिण्यात आला आहे. पुण्यातल्या उत्सवाचे हे तिसरे वर्ष आहे.या उत्सवात श्री संत सचिन देव महाराजांचे आशीर्वचन लाभणार आहे. विशेष अतिथी म्हणून राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य तथा सांगलीचे पालकमंत्री चंद्रकात पाटील उपस्थित राहणार आहे. त्यांचेही मार्गदर्शन होणार आहे. यंदाच्या उत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. २०२४ मध्ये कोथरुड व २०२५ मध्ये बालेवाडी येथे गुरुपौर्णिमा उत्सव झाला होता. या उत्सवाला अमरनाथ श्राइन बोर्डाचे सदस्य डॉ. सुरेश हावरे यांच्यासह अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती. यंदाच्या औंध पुणे येथे होणाऱ्या उत्सवात गुरुभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री संत अच्युत महाराज सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

### नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना गणवेश वाटप



**अमरावती-**विकास विद्यालय, विलासनगर येथे शालेय कर्मचाऱ्यांच्या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून स्वखर्चाने विद्यालयातील नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या गरजू व नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना शालेय जीवनाची आनंददायी सुरुवात करण्यास मोठा हातभार लागला.यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा मेश्राम, सेवानिवृत्त लिपिक सतीश मेटांगे यांनी विद्यार्थ्यांना नियमित शाळेत उपस्थित राहून मनापासून अभ्यास करण्याचा तसेच शिस्त, स्वच्छता आणि चांगले संस्कार जोपासण्याचा संदेश दिला. त्यांनी या समाजोपयोगी उपक्रमात योगदान देणाऱ्या सर्व शालेय कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक कौतुक करून आभार व्यक्त केले.विद्यालयातील शिक्षक देविदास चव्हाण,प्रवीण भागवत,संदीप जुनघरे,मनीष सोनवाल,दिनेश निघोट,अनिल बडगे, अजय बिजवे,रक्षा कैथवास,निकिता शिरभाते,शिक्षकेतर कर्मचारी प्रसेनजीत सदांशिवे,शुभम गवळी, श्रीमती मीना सरकटे, श्रीमती सरला आकोडे ,विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

### श्रीकृष्ण मंदिर येथे लीळाचरित्र निरुपण सोहळा

**अमरावती-**द्वारकाधीश श्रीकृष्ण मंदिर



माताखिडकी अमरावती येथ महानुभाव वासनिक सेवा मंडळ व श्री कृष्ण मंदिर देवस्थान ट्रस्ट अमरावती चा संयुक्त विद्यमाने लीळाचरित्र प्रवचन सोहळ्याचे आयोजन गुरूवार ३० जुलै ते रविवार ९ ऑगस्ट २०२६ पर्यंत करण्यात आले आहे श्री चक्रधर स्वामींच्या अगम्य लीळांवर निरूपण दररोज सायंकाळी ६:३० ते ८ वाजेपर्यंत राहील. या वेळेत वडनेर भुजंग निवासी देवदत्त आश्रमाचे संचालक प.पु.प.म.श्री दिगंबर मुनी अंकुळनेर बाबा महानुभाव यांच्या सुमधुर वाणीतून लीळाचरित्र निरूपण करण्यात येईल.प.पु. बाबांची संपूर्ण भारतात अनेक ठिकाणी सतत प्रवचने होत असतात. या प्रवचन सोहळ्याचे उद्घाटन शनिवार ३० जुलै रोजी सायंकाळी ठीक ६ श्रीकृष्ण मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सुभाष पावडे, उपाध्यक्ष डॉ. अशोक राऊत तसेच सचिव ॲड अरुण ठाकरे, कोषाध्यक्ष इंजि. एस. पी. देशमुख मंडळाचे अध्यक्ष बाबुराव बोराळकर यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या सोहळ्याचा समारोपीय कार्यक्रम रविवार ९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता, घेण्याचे ठरले आहे. समारोपीय कर्यक्रमाचे अध्यक्ष, प. पू. प. म. आचार्यप्रवर श्री दर्यापुरकर बाबा, बडनेरा आश्रम, हे असणार आहे.

### श्री क्षेत्र गुरुकुंज आश्रम येथे आज गुरुपौर्णिमा उत्सव

**गुरुकुंज मोझरी-**भारतीय संस्कृतीचे जतन व गुरुशिष्य



परंपरेचा गौरव करण्यासाठी तसेच समाजात नैतिक मुल्य रुजविण्यासाठी अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामंडळातर्फे गुरुकुंज आश्रमात राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या महासमाधी समोर गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ४ वा. उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील यांच्या हस्ते महासमाधीचे पूजन व अभिषेक करण्यात येईल. त्यानंतर सामुदायिक ध्यान व त्यावरील चिंतन सर्वाधिकारी प्रकाश वाघ करणार आहे. सकाळी ८ ते ९ डॉ. सागर बांबल यांचा खंजिरी भजनाचा कार्यक्रम सादर होणार आहे. सकाळी १० ते ११ कु. धनश्री खंडारे ही भक्तीसंगीताचा कार्यक्रम सादर करतील. सकाळी ११ ते १२ गुरुमहात्म्य या विषयावर योगेश गावंडे यांचे प्रवचन होणार आहे. दुपारी १ ते २ सुरमणी डॉ. कमल भोंडे (अमरावती) यांचा नादकमलाचा कार्यक्रम होणार आहे. सकाळी ९ वाजता पासून दुपारी १२ वाजेपर्यंत शैलेष जगताप (वर्धा) व अनुरूद्ध सुरतेकर (नागपूर) यांच्या अभंग गायनाचा कार्यक्रम होणार आहे. दुपारी १२ ते १ कु.स्नेहल संत (हिंगणघाट) हे गुरुवंदना सादर करणार आहे. दुपारी २ ते ३ या वेळेत अमरावतीच्या कु.स्वरा केतकर अभंगवाणी सादर करतील. दुपारी ३ ते ४ गजानन पळसकर (अमरावती) यांचा भक्तीसंगीताचा कार्यक्रम होणार आहे. दुपारी ४ ते ६ वैभव मंडलिक (मुंबई) यांचे अभंग गायन होणार आहे. सायं. ७ वाजता सामुदायिक प्रार्थना व त्यावरील चिंतन अरविंद देशमुख करतील. सायंकाळी ७.३० वा. महाआरतीने गुरुपौर्णिमेचा समारोप करण्यात येईल.

## आज स्व.दादासाहेब काळमेघ स्मृती पुण्यस्मरण कार्यक्रम



**अमरावती -** स्व.दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठान तर्फे स्व. दादासाहेबांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करण्याच्या निमित्ताने २९ वा पुण्यस्मरण कार्यक्रम उद्या बुधवार २९ जुलै रोजी सायंकाळी पाच वाजता छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृह डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख राहतील तर प्रमुख अतिथी म्हणून मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूरचे कुलगुरू डॉ.अविनाश आवलगावकर, सप्त खंजिरी वादक हभप श्री सत्यपाल महाराज, तरुण भारतचे मुख्य संपादक शैलेश पांडे, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलसचिव सुभाष बेलसरे यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. यासोबतच दादासाहेब काळमेघ यांना मानणारा विविध क्षेत्रातील त्यांचा मोठा चाहता वर्ग उपस्थित राहील.या वैचारिक कार्यक्रमाचा आस्वाद सर्व विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी घ्यावा अशी विनंती आयोजकाच्या वतीने करण्यात आली आहे.

## बिबट्याच्या शिकार व अवयवांच्या अवैध व्यापार प्रकरणी आरोपींची कारागृहात रवानगी

### आणखी आरोपी जाळ्यात येण्याची शक्यता

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

वनपरिक्षेत्रात उघडकीस आलेल्या बिबट्याच्या शिकार व वन्यप्राण्यांच्या अवयवांच्या अवैध व्यापारप्रकरणी अटक करण्यात आलेल्या तिन्ही आरोपींना वनकोठडीची मुदत संपल्यानंतर सोमवारी न्यायालयात हजर करण्यात आले. सुनावणीनंतर न्यायालयाने तिन्ही आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावली असून त्यांची कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

या प्रकरणात पुरण प्रल्हाद राठोड (रा. चिरोडी), प्रकाश किसन जाधव (रा. पाथरगाव) आणि मंगेश शेषराव जाधव (रा. कानडी, ता. मुर्तिजापूर, सध्या रा. चिरोडी) या तिघांना वनविभागाने अटक केली होती. यापूर्वी न्यायालयाने त्यांना २७ जुलैपर्यंत वनकोठडी सुनावली होती. वनकोठडीदरम्यान वनविभागाने आरोपींकडे सखोल चौकशी करून महत्त्वाची माहिती संकलित केली आहे.कारवाईदरम्यान आरोपींकडून बिबट्याची हाडे, नखे, मिशा तसेच चंदन लाकूड जप्त करण्यात आले होते. तिन्ही आरोपींविरुद्ध वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ (सुधारणा २०२२), भारतीय वन अधिनियम तसेच महाराष्ट्र वननियमांतील विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दरम्यान, चांदूर रेल्वे वनविभाग या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करीत असून, या अवैध व्यापारामागील मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणात आणखी काही आरोपींचा सहभाग आहे का, याचा शोध सुरू असून, वन्यजीवांच्या अवैध शिकार व अवयवांच्या तस्करीशी संबंधित इतर घटनांचे धागेदोरेही तपासातून समोर येण्याची शक्यता वनसुत्रांकडून व्यक्त केली जात आहे. वाईल्डलाईफ क्राइम कंट्रोल ब्युरो (मुंबई) यांच्या गुप्त माहितीच्या आधारे सुरू झालेल्या या कारवाईमुळे वन्यजीवांच्या अवैध व्यापारात सहभागी असलेल्या टोळ्यांमध्ये खळबळ उडाली असून, तपास जसजसा पुढे सरकत आहे तसतसे या प्रकरणात आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## देवडी व चावलमंडी रस्त्याचे रुंदीकरण काळाची गरज -नगराध्यक्षा माथने

**अचलपूर/वार्ताहर**

अमरावती जिल्ह्यातील अ वर्ग दर्जा असलेली अचलपूर नगर परिषद हद्दीतील अचलपूर शहर हे ऐतिहासिक शहर म्हणून ओळखले जाते.अचलपूर शहराची लोकसंख्या एक लक्षाचा वर असून देवडी आणि चावलमंडी रस्त्याचे रुंदीकरण ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन



अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने यांनी केले.या दोन्ही रस्त्याचे रुंदीकरण साठी नियमानुसार भूसंपादन ची प्रक्रिया राबवून दुकानदारांना मोबदला सुद्धा मिळणार असल्याची माहिती ही अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने यांनी दिली.

एकीकडे देवडी रस्त्यावरील काही दुकानदारांनी हा रस्ता वन वे करून रस्त्याचे रुंदीकरण न करता सध्या स्थितीत असलेल्या त्याच रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्याची मागणी केली आहे.मात्र देवडी व चावलमंडी या दोन्ही रस्त्याला लागूना शाळा,महाविद्यालय,शासकीय कार्यालय,शासकीय पशुवैद्यकीय रुग्णालय,जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय,बँक,पोलिस स्टेशन,व्यापार संकुल असल्याने शेतकरी, मजूर,विद्यार्थी,शासकीय कर्मचारी,नागरिकांची मोठी गर्दी असते.मात्र दोन्ही रस्ते अरुंद असल्याने वाहतूक कोंडी मुळे वाहनचालक त्रस्त झाले आहे.यामुळे आमच्या प्रतिनिधीने यासंदर्भात अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने यांची पुढील भूमिका काय राहणार? यासाठी त्यांच्या संपर्क साधून त्यांची प्रतिक्रिया घेतली.

उमेश कोल्हे हत्याप्रकरणी फिर्यादी व पीडित कुटुंबाकडून

## एनआयए विशेष न्यायालयात वकीलपत्र दाखल; पुढील न्यायालयीन लढ्यासाठी विधिज्ञांची नियुक्ती

**मुंबई-**अमरावती येथील बहुचर्चित उमेश कोल्हे हत्याप्रकरणी आज (३० जुलै २०२६) मुंबई येथील राष्ट्रीय तपास संस्था विशेष सत्र न्यायालयात फिर्यादी दिवंगत उमेश कोल्हे यांच्या कुटुंबीयांच्या वतीने अधिकृत वकीलपत्र दाखल करण्यात आले.

फिर्यादी व पीडित कुटुंबीयांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ॲड. प्रकाश साळसिंगीकर,ॲड. गणेश नागरगोजे, ॲड. खेताराम सोळंकी, ॲड. संकेत राव, ॲड. तेजस सावंत आणि ॲड. श्रीराम चिंदरकर यांनी न्यायालयात हजेरी लावून वकीलपत्र दाखल केले. यापुढील सर्व न्यायालयीन कामकाज, युक्तिवाद आणि कायदेशीर प्रक्रिया वरील विधिज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे.

उल्लेखनीय आहे की, २१ जून २०२२ रोजी अमरावती येथील औषध विक्रेते (केमिस्ट) उमेश कोल्हे यांची दोन मोटारसायकलस्वार हल्लेखोरांनी गळा चिरून निर्घृण हत्या केली होती.तत्कालीन भाजपच्या निलंबित प्रवक्त्या नुपूर शर्मा यांनी पैगंबर मोहम्मद यांच्याविषयी केलेल्या वक्तव्यांना सोशल मीडियावर पाठिंबा दर्शवल्याच्या पार्श्वभूमीवर ही हत्या करण्यात आल्याचा आरोप तपासात समोर आला. या घटनेनंतर देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या.

प्राथमिक तपासादरम्यान महाराष्ट्र पोलिसांनी २ जुलै २०२२ रोजी सात आरोपींना अटक केली होती. त्यानंतर या प्रकरणाचा तपास राष्ट्रीय तपास संस्थेकडे वर्ग करण्यात आला. एनआयएने ६ जुलै २०२२ रोजी महाराष्ट्रातील १३ ठिकाणी छापेमारी करून द्वेष पसरविणारी पत्रके, चाकू, मोबाईल फोन, सिमकार्ड, मेमरी कार्ड तसेच इतर महत्त्वाचे आक्षेपार्ह साहित्य जप्त केले. एनआयएने या प्रकरणात आरोपपत्र दाखल करून इरफान शेख, शोएब खान, मुदस्सिर अहमद, आतिफ रशीद, युसुफ खान, अब्दुल तौफीक, शाहरुख पठाण यांच्यासह शामिम अहमद फिरोज अहमद, अब्दुल अरबाज, मौलवी मुश्फिक अहमद आणि शामिम अहमद यांच्याविरुद्ध गंभीर आरोप नोंदविले आहेत. या आरोपींवर बेकायदेशीर कृती (प्रतिबंध) अधिनियम (UAPA) तसेच भारतीय दंड संहितेच्या कलम ३४, १५३-अ, १५३-ब, १२०-ब आणि ३०२ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तपास यंत्रणेनुसार हा पूर्वनियोजित कट असल्याचा आरोप असून, धार्मिक तेढ निर्माण करून दहशतवादी स्वरूपाची कारवाई करण्याचा उद्देश असल्याचे आरोपपत्रात नमूद करण्यात आले आहे.देशभरात चर्चेचा विषय ठरलेल्या या प्रकरणातील न्यायालयीन सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले असून, फिर्यादी व पीडित कुटुंबाच्या वतीने प्रभावीपणे बाजू मांडण्यासाठी अनुभवी विधिज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या प्रकरणातील पुढील सर्व न्यायालयीन कार्यवाही, पुराव्यांवरील युक्तिवाद आणि फिर्यादी पक्षाची बाजू आता ॲड. प्रकाश साळसिंगीकर, ॲड. गणेश नागरगोजे, ॲड. खेताराम सोळंकी, ॲड. संकेत राव, ॲड. तेजस सावंत आणि ॲड. श्रीराम चिंदरकर यांच्या वतीने NIA विशेष न्यायालयात मांडण्यात येणार आहे.

## एचएमएस डॉक्टरांना एमएमसी नोंदणी देण्यास विरोध

**मुंबई -** होमिओपॅथी डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (एमएमसी) कडून नोंदणी देण्यासाठी सुरू असलेल्या आंदोलनाला विरोध करत इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्य, एमएआरडी, एएसएमआय, एमएसएन, जेडीएन व इतर समविचारी वैद्यकीय संघटनांनी तीव्र निषेध नोंदवला आहे.

आयएमए महाराष्ट्र राज्याने प्रसिद्धीपत्रकाद्वारे सरकारला इशारा दिला की, दबावाला बळी पडून बीएचएमएस चिकित्सकांना एमएमसी नोंदणी देण्याचा कोणताही प्रयत्न करू नये. अशी कोणतीही हालचाल ही तर्कविसंगत, अशास्त्रीय असून सामाजिक आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होईल, असे संघटनांचे म्हणणे आहे.

**उद्यापासून सेवा बंदचा इशारा**

आयएमए महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी, राज्य सचिव डॉ. विक्रांत देसाई आणि राज्य खजिनदार डॉ. अमोल गिट्टे यांनी सांगितले की, सरकारने असा निर्णय पुढे नेल्यास सर्व संलग्न संघटनांचे डॉक्टर उद्या सकाळपासून तात्काळ सेवा बंद आंदोलन सुरू करतील. यामध्ये बाह्यरुग्ण सेवा तसेच इमर्जन्सी सेवा देखील बंद ठेवण्यात येतील.

**रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी निर्णय**

हा निर्णय कोणत्याही भावनेच्या भरात नसून रुग्णांच्या सुरक्षिततेबाबत, वैद्यकीय व्यवसायातील व्यावसायिक मानकांबाबत आणि विविध वैद्यकीय पद्धतींमधील भेद अस्पष्ट करून पात्र ॲलोपॅथिक वैद्यकीय सेवेचे महत्त्व कमी करणाऱ्या धोरणात्मक निर्णयांच्या दूरगामी परिणामांबाबत गंभीर चिंतेतून घेण्यात आला आहे, असे पत्रकात नमूद करण्यात आले आहे.संघटनांनी महाराष्ट्र राज्य सरकारला अशा कोणत्याही हालचालीचा तातडीने पुनर्विचार करण्याचे आवाहन केले आहे. आंदोलनाचा सविस्तर कार्यक्रम आणि पुढील कृती लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.या प्रसिद्धीपत्रकाला आयएमए महाराष्ट्र राज्यासोबत एमएआरडी, एएसएमआय, एमएसएन, जेडीएन आणि इतर सहयोगी वैद्यकीय संघटनांनी पाठिंबा दिला आहे.

## जीवनाला सेवाविद्यापीठ करणारे कुलगुरू-दादासाहेब काळमेघ

पृथ्वी तलावावरील समाज उद्बोधनाचे व उत्कर्षाचे कार्ये ही ईश्वर आज्ञेत महामानवाद्वारे पूर्ण केली जातात.अश्या महामानवांना बालपणीच स्वतःच्या जन्माचा उद्देश व जीवन कार्य उमजते.अशाच एका समाजसेवेची अत्यंत संवेदनशील करुणा प्राप्त जीवनकार्याचे धनी ठरलेले राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा ख्यातनाम श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती संस्थेचे माजी अध्यक्ष प्रा.वासुदेव मोतीरामजी उपाख्य दादासाहेब काळमेघ यांच्या जीवनातील मार्मिक प्रसंग व घटना ह्या समाज प्रबोधनासाठी आजही मोलाचा आहेत.एकदा जन्म झाल्यानंतर मातृ-पितृ यांच्या छायेत दादासाहेब काळमेघ यांच्या तिष्ण बुद्धिमत्तेची ओळख होते.डॉ भाऊसाहेबांच्या अपेक्षेप्रमाणे वासुदेव काळमेघ हा विद्यार्थी स्वच्छतेसह या वसतीगृहाचा सेवकही झाला.अंजनगाव ( सुर्जी ) तील जन्मगाव चौसाळा ते आश्रयस्थान वरुड (बोंदरे ) व नंतर श्रद्धानंद वसतीगृहाचा कठीण प्रवास ज्या बालमनाने प्रत्यक्ष अनुभवला.

वसतीगृहात सेवा देऊन त्या मिळकतीतून शिक्षण मदत निर्माण करणे ही आज आपल्या शासनाने सुरु केलेली अर्न ॲण्ड लर्न विद्यार्थी पॉलिसी दादासाहेब काळमेघ यांनी त्याकाळी स्वतःसाठी लावून घेतली.सागर विद्यापीठ व आय आय टी खरगपूर या ठिकाणी उच्च शिक्षण प्राप्त करून नागपूर येथील प्रख्यात लक्ष्मी नारायण इन्स्टीट्यूट येथे प्राध्यापकाच्या नोकरीस त्यांनी सुरवात केली.या दरम्यानचा एक प्रसंग अत्यंत मार्मिक व भावना प्रधान आहे. वसतीगृहाचा पालक-शिक्षक व विद्यार्थ्यांचे नाते कसे असते त्याचे हे प्रत्यक्ष कृतीदर्शन ठरले.



विद्यापीठातील त्यांची शिस्त, धाडसी निर्णय व आज ज्याला प्राधान्य दिल्या जाते ती राष्ट्रीय सेवा योजना ( एन एस एस ) हा उपक्रम सुरू करणारे ते पहिले विद्यापीठ समन्वयक ठरले. कुलगुरू पदानंतर त्यांना समाजाने बहाल केलेले शिक्षण महर्षि डॉ भाऊसाहेब देशमुख यांच्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे दहा वर्षाचे अध्यक्षपद भूषवित त्यांनी अध्यक्षपदाची व्याख्या शिवपरीवारास शिकविली.

कुलगुरू ते श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा अध्यक्ष हा पदभार पाहतांना दादासाहेबांनी महाराष्ट्रभर शिक्षणाचा उत्तुंग प्रचार व प्रसार करून एक नवी दिशा दिली.त्यांच्या काळात व तालमीत तयार झालेले ग्रामीणभागातील अनेक शिक्षण संस्था, डॉक्टर, प्राध्यापक, शिक्षक, समाजसेवक , शेतीनिष्ठ पदवीधर तसेच राजकीय नेतृत्व सुद्धा याचे श्रेय दादासाहेब काळमेघ यांना जाते.जागतिक किर्तीची शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध करणारा यशस्वी पुरुष स्व डॉ श्रीकांत जिचकार हे दादासाहेबांचे शिष्य होते.विदर्भवीर भाऊ जाबुवंतराव धोटे हे दादासाहेबांचे परममित्र होते.माजी राष्ट्रपती डॉ शंकरदयाल शर्मा यांचेशी दादासाहेबांचे अतिशय घनिष्ट संबंध होते.विदर्भातील दोन ख्यातनाम संत वासुदेव महाराज व संत अच्युत महाराज यांच्या सोबत त्यांचे जिवाभावाचे संबंध असल्याने दादासाहेबाबांच्या अध्यात्म सेवेतील प्रबोधनात अधिक बळकटी आली. दादासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेला श्री क्षेत्र सालबर्डीचा महायज्ञ आजही आठवणीत आहे . इतके मोठे व महान कार्य करणारा कर्मयोगी होऊन गेल्यानंतर ह्या सर्व स्मृती जपणे तसेच त्याला सतत उजाळा देणे तसेच हे सर्व कार्य सातत्याने पुढे नेणे यातच या अर्थपूर्ण तथा कृती संपन्न जीवनाचा गौरव, आदर व तृप्त समाधानाची कृतज्ञता साधता येते. दरवर्षी २९ जुलै या दिवशी नागपूर व अमरावती येथे एकाच दिवशी व एकाच वेळी आयोजित या स्मृती सोहळयास आजही अलोट गर्दी असते.डॉ भाऊसाहेबांच्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेतून बाहेर पडलेल्या माझ्या सारख्या अनेक विद्यार्थ्यांचे दादासाहेब काळमेघ हे दैवत तथा प्रेरणास्थान आहेत. उच्च कोटीची सेवा साधणाऱ्या महामानवास २९ व्या स्मृतीदिनी विनम्र अभिवादन करतो .

**प्रा. गजानन भारसाकळे**
अकोला .
मो.९५५२२२६९२५

# गुरुपौर्णिमा आत्मोन्नती ते समाजोन्नती

'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः
गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुः साक्षात् परब्रह्म
तस्मै श्रीगुरवे नमः।।'



भारतीय संस्कृतीने गुरुला केवळ ज्ञानदाता मानले नाही, तर जीवनाला दिशा देणारा प्रकाशस्तंभ मानला आहे. गुरुपौर्णिमा हा फक्त गुरूंना वंदन करण्याचा दिवस नाही; तो आत्मपरीक्षणाचा, कृतज्ञतेचा आणि गुरूंनी दाखविलेल्या मार्गावर चालण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. पूजनाने गुरूंचा सन्मान होतो; परंतु त्यांच्या विचारांचे आचरण झाले, तरच गुरुतत्त्वाचे खरे पूजन घडते.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानाची दारे खुली केली, संत तुकारामांनी भक्तीला लोकभाषेचे सामर्थ्य दिले, समर्थ रामदासांनी कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा दिली, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामविकासाचा मंत्र दिला आणि संत गाडगेबाबांनी स्वच्छता, सेवा व समाजप्रबोधनाची वाट दाखविली. या तेजस्वी संतपरंपरेत वं. श्री संत अच्युत महाराज यांनी अध्यात्म आणि समाजसेवा यांचा सुंदर संगम घडविला. त्यांचा जीवनमंत्र होता -'आत्मोद्धारातून लोकोद्धार.'

संत अच्युत महाराजांनी आपल्या प्रत्येक कृतीतून सेवा हीच साधना असल्याचे दाखवून दिले. 'समाजसेवा हीच ईशसेवा', 'उणे दिसे ते पूर्ण करी' आणि 'न जाई रीता एक क्षणही फुकाचा' ही त्यांची वचने आजही प्रत्येकाला विचार करायला भाग पाडतात. दुसऱ्यांच्या उणिवा शोधण्याऐवजी त्यांना उभे करण्याची वृत्ती, वेळेचा सदुपयोग आणि प्रत्येक जीवाबद्दल करुणा ही त्यांच्या जीवनाची खरी ओळख होती. त्यांच्या प्रवचनांत अध्यात्माबरोबरच समाजजीवनाची स्पष्ट दिशा होती. लोकशिक्षण, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक ऐक्य, व्यसनमुक्ती, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा यांचा त्यांनी सातत्याने पुरस्कार केला. गावोगावी अनेक दशके केलेल्या त्यांच्या प्रबोधनाने हजारो कुटुंबांच्या विचारविश्वात सकारात्मक परिवर्तन घडविले.

महापुरुषांचे विचार समाजात जिवंत राहतात ते त्यांच्या कार्यातून.

संत अच्युत महाराजांच्या करुणामय जीवनदृष्टीतून प्रेरणा घेऊन उभे राहिलेले श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल हे त्याचे जिवंत उदाहरण आहे. सामान्य माणसालाही अत्याधुनिक हृदयरोग उपचार उपलब्ध व्हावेत, या ध्येयातून सुरु झालेली ही सेवा आज हजारो रुग्णांसाठी आशेचा किरण ठरली आहे. हे रुग्णालय म्हणजे केवळ वैद्यकीय सेवा नव्हे, तर करुणा, समर्पण आणि मानवतेचा अखंड प्रवाह आहे.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता, तंत्रज्ञान आणि वेगवान जीवनशैलीच्या युगात माहिती सहज उपलब्ध आहे; परंतु विवेक, संस्कार, संवेदनशीलता आणि माणूसकी यांची जोपासना अधिक आवश्यक बनली आहे. अशा काळात संत अच्युत महाराजांचे विचार अधिकच समर्पक वाटतात. ते आपल्याला सांगतात की समाजाची उन्नती ही प्रत्येक व्यक्तीच्या चारित्र्य, सेवा आणि कर्तव्यभावनेतूनच घडते.

गुरुपौर्णिमा हा केवळ स्मरणाचा दिवस नाही; तो संकल्पाचा दिवस आहे. गुरूंना हार-फुले अर्पण तर करावेच आणि त्याचबरोबर त्यांच्या एका तरी विचाराचे आपल्या

**गुरुपौर्णिमा**

जीवनात रोपण करणे खूप महत्त्वाचे आहे. आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहणे, समाजासाठी काहीतरी देणे, गरजूंच्या पाठीशी उभे राहणे आणि 'उणे दिसे ते पूर्ण करी' या भावनेने जगणे- हीच गुरुपौर्णिमेची खरी साधना आणि सद्गुरूंना अर्पण केलेली सर्वोत्तम गुरुदक्षिणा ठरेल.

'थोर महात्मे होऊन गेले, चरित्र त्यांचे पहा जरा; आपण त्यांच्या समान व्हावे, हाच सापडे बोध खरा.'

**प्रा. सागर पासेबंद**
मो.९४२३०५३१३७

# गुरुपौर्णिमा:ज्ञान, नम्रता आणि कृतज्ञतेचा सोहळा !

भारतीय संस्कृतीमध्ये 'गुरू' ही संकल्पना केवळ शिक्षकापुरती मर्यादित नाही.गुरू म्हणजे अज्ञानरूपी अंधकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देणारा, व्यक्तिमत्त्वाला दिशा देणारा, जीवनाला मूल्यांची जोड देणारा आणि माणसामधील सुप्त सामर्थ्य जागृत करणारा दिव्य मार्गदर्शक होय. म्हणूनच भारतीय परंपरेत गुरूला देवापेक्षाही श्रेष्ठ स्थान दिले गेले आहे. 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः' हा मंत्र गुरूच्या या सर्वोच्च स्थानाची साक्ष देतो. गुरुपौर्णिमा हा दिवस अशा सर्व गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा, त्यांच्या ऋणाची जाणीव ठेवण्याचा आणि त्यांच्या आदर्शांचा स्वीकार करण्याचा पवित्र उत्सव आहे.

आषाढ पौर्णिमेला साजरी होणारी गुरुपौर्णिमा महर्षी वेदव्यास यांच्या जयंतीनिमित्त साजरी केली जाते. वेदांचे वर्गीकरण, महाभारताची निर्मिती, अठरा पुराणांचे संकलन आणि ब्रह्मसूत्रांची रचना करून त्यांनी भारतीय ज्ञानपरंपरेला अमूल्य योगदान दिले.म्हणूनच त्यांना 'आदिगुरू' मानले जाते. या दिवसाला 'व्यासपौर्णिमा' असेही संबोधले जाते. ही परंपरा हजारो वर्षांपासून अखंडपणे भारतीय संस्कृतीचा आत्मा जपत आहे.

गुरू हा केवळ विषय शिकवणारा शिक्षक नसतो; तो जीवन जगण्याची कला शिकवतो. पुस्तकातील ज्ञान माणसाला विद्वान बनवू शकते, परंतु जीवनमूल्यांचे शिक्षण त्याला खऱ्या अर्थाने सुसंस्कृत आणि संवेदनशील बनवते. गुरू शिष्याला केवळ यशाची वाट दाखवत नाही, तर अपयशातही खंबीरपणे उभे राहण्याची शक्ती देतो.तो केवळ बुद्धी विकसित करत नाही, तर विवेक, संयम, प्रामाणिकपणा, शिस्त, करुणा आणि राष्ट्रनिष्ठा यांसारख्या गुणांचेही बीजारोपण करतो.

भारतीय इतिहासात गुरू-शिष्य परंपरेची असंख्य तेजस्वी उदाहरणे आढळतात. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला दिलेला भगवद्गीतेचा उपदेश हा केवळ युद्धभूमीवरील संवाद नसून संपूर्ण मानवजातीसाठी जीवनतत्त्वज्ञान आहे. समर्थ रामदासांनी छत्रपती शिवाजी महाराजांना राष्ट्रधर्म, स्वराज्य आणि लोककल्याणाचा आदर्श दिला. स्वामी विवेकानंदांना जगभर भारतीय अध्यात्माचा संदेश देण्याची प्रेरणा त्यांच्या गुरू श्रीरामकृष्ण परमहंसांकडून मिळाली. या उदाहरणांमधून गुरूचे कार्य केवळ शिक्षणापुरते मर्यादित नसून समाजनिर्मिती आणि राष्ट्रनिर्मितीपर्यंत विस्तारलेले असल्याचे स्पष्ट होते.

आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात माहिती सहज उपलब्ध झाली आहे. इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल साधनांमुळे ज्ञानाचे अनेक स्त्रोत निर्माण झाले आहेत. परंतु माहितीचा महासागर आणि ज्ञानाचा प्रकाश यात मूलभूत फरक आहे. माहिती दिशा देत नाही; दिशा गुरू देतो. तंत्रज्ञान प्रश्नांची उत्तरे देऊ शकते, परंतु योग्य प्रश्न विचारण्याची बुद्धी गुरूकडूनच मिळते. म्हणूनच आधुनिक युगातही गुरूचे महत्त्व किंचितही कमी झालेले नाही; उलट योग्य मार्गदर्शनाची गरज अधिक वाढली आहे.

गुरू हा केवळ शाळा किंवा महाविद्यालयातील शिक्षकच नसतो. आई-वडील हे मुलाचे पहिले गुरू असतात. संस्कार देणारे कुटुंब, मूल्ये शिकवणारा समाज, अनुभवातून शिकवणारे जीवन आणि आत्मज्ञानाकडे नेणारे आध्यात्मिक मार्गदर्शक हेही आपल्या जीवनातील गुरूच आहेत. प्रत्येक व्यक्तीकडून काहीतरी शिकण्याची वृत्ती जोपासली, तर संपूर्ण जगच आपले गुरुकुल बनते.

गुरुपौर्णिमेचा खरा अर्थ केवळ गुरूंना पुष्पहार अर्पण करणे किंवा शुभेच्छा देणे एवढाच नाही. त्यांच्या शिकवणीचा स्वीकार करणे, त्यांच्या आदर्शांना जीवनात उतरवणे आणि समाजासाठी उपयुक्त व्यक्तिमत्त्व घडवणे हीच गुरूंना खरी गुरुदक्षिणा आहे. गुरूंनी दिलेल्या ज्ञानाचा उपयोग केवळ स्वतःच्या प्रगतीसाठी नव्हे, तर समाजहित आणि राष्ट्रहितासाठी करणे हे प्रत्येक शिष्याचे कर्तव्य आहे.

आजच्या काळात मूल्यांचे क्षरण, वाढती स्पर्धा, मानसिक ताण, स्वार्थ आणि सामाजिक विघटन यांसारख्या अनेक समस्या समाजासमोर उभ्या आहेत. अशा वेळी गुरूंच्या विचारांची आणि मार्गदर्शनाची आवश्यकता अधिक प्रकर्षाने जाणवते. ज्ञानासोबत विवेक, यशासोबत विनय, प्रगतीसोबत नैतिकता आणि शक्तीसोबत संवेदनशीलता यांचा समतोल साधण्याची प्रेरणा गुरू देतात. त्यामुळे गुरुपौर्णिमा हा केवळ धार्मिक उत्सव नसून मानवी संस्कारांचा आणि ज्ञानसंस्कृतीचा उत्सव आहे.

गुरू म्हणजे चालणारा दीपस्तंभ. स्वतः जळून इतरांच्या जीवनात प्रकाश निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे गुरू. त्यांच्या ज्ञानामुळेच शिष्य अंधारातून प्रकाशाकडे, असत्यातून सत्याकडे आणि अज्ञानातून आत्मज्ञानाकडे प्रवास करतो. म्हणूनच भारतीय संस्कृतीत गुरूचे स्थान सदैव सर्वोच्च राहिले आहे आणि राहील.

या गुरुपौर्णिमेनिमित्त आपण प्रत्येकाने आपल्या जीवनातील सर्व गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त करूया. त्यांच्या शिकवणीचे आचरण करूया, ज्ञानाचा दीप इतरांच्या जीवनातही प्रज्वलित करूया आणि 'तमसो मा ज्योतिर्गमय' या भारतीय संस्कृतीच्या चिरंतन संदेशाला आपल्या आचरणातून साकार करूया. हाच गुरुपौर्णिमेचा खरा अर्थ आणि हाच आपल्या गुरूंना अर्पण केलेला सर्वात मौल्यवान प्रणाम ठरेल.

**कुमार व्यंकटेश नेरकर**
योगशास्त्र
अभ्यासक, अमरावती
मो.७६२०६८७३०३

# वन्यजीव जगतील तरच मानव जीवन वाचणार

### आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन विशेष

पृथ्वीवरील प्रत्येक जीव आपल्या स्वतंत्र अस्तित्वाने आणि वैशिष्ट्यपूर्ण भूमिकेद्वारे नैसर्गिक समतोल राखण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देतो. अन्नसाखळीतील प्रत्येक घटक आवश्यक आहे, कारण एखाद्या एका जीवाचेही असंतुलन संपूर्ण परिसंस्थेवर परिणाम करू शकते.आजच्या काळात मनुष्याला वगळता इतर सर्व जीव निसर्गसंवर्धनात आपली भूमिका पार पाडत आहेत.स्वच्छ हवा, शुद्ध पाणी आणि पुरेसे अन्न हे सर्वांच्या जीवनासाठी आवश्यक असून ते फक्त पर्यावरण निरोगी आणि संतुलित असेल तरच उपलब्ध होऊ शकते. सूक्ष्मजीव माती सुपीक बनवतात, तर पक्षी आणि वन्यप्राणी बियांचा प्रसार करून नवीन वनस्पती व जंगलांच्या वाढीस मदत करतात.जंगलातील जीव सुरक्षित राहिले तर जंगल हिरवेगार राहते, ऋतुचक्र संतुलित राहते, जलस्त्रोत सुरक्षित राहतात आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण होते.त्यामुळे प्रदूषण कमी होते, रोगांचा धोका घटतो आणि जीवनमान अधिक चांगले होते.प्रत्यक्षात वन्यजीव हे निसर्गाचे खरे रक्षक आहेत, कारण पर्यावरणीय समतोल राखण्यात त्यांची अत्यंत महत्त्वाची भूमिका असते.मनुष्याशिवाय निसर्ग स्वतःला पुन्हा वेगाने सावरू शकतो; परंतु निसर्गाशिवाय मानवजीवनाची कल्पनाही अशक्य आहे.त्यामुळे निसर्ग आणि वन्यजीवांचे संरक्षण करणे ही आपली सर्वात मोठी जबाबदारी आहे.

प्रत्येक सजीवाला आपल्या नैसर्गिक अधिवासात जगण्याचा अधिकार आहे.मात्र, गेल्या काही दशकांमध्ये वाढलेल्या मानवी हस्तक्षेपामुळे वन्यजीव आणि मानव यांच्यातील संघर्ष मोठ्या प्रमाणात वाढला आहे.या संघर्षात दोघांनाही जीवितहानीचा सामना करावा लागतो.स्वातंत्र्यपूर्व काळात राजे-महाराजे आणि इंग्रजांनी मोठ्या प्रमाणावर शिकार केल्यामुळे अनेक वन्यप्राण्यांची संख्या अत्यंत कमी झाली. अनेक प्रजाती कायमस्वरूपी नामशेष झाल्या. वन्यजीवांची झपाट्याने घटणारी संख्या रोखण्यासाठी सरकारने विविध कायदे केले आहेत. आयआयटी बॉम्बे आणि सस्त्रा विद्यापीठातील संशोधकांच्या संशोधनानुसार, २०१५ ते २०१९ या कालावधीत देशात प्रत्येक १ चौ.कि.मी. जंगलवाढीच्या बदल्यात सुमारे १८ चौ.कि.मी. जंगल नष्ट झाले.नैसर्गिक, दाट आणि जुनी जंगले झपाट्याने नाहीशी होत आहेत. हीच परिस्थिती कायम राहिली तर त्या जंगलांमध्ये राहणाऱ्या वन्यजीवांचे अस्तित्व गंभीर संकटात येईल.

देशात वाढत्या शहरीकरणामुळे पारंपरिक शेती कमी होत आहे. शहराजवळच्या खेडोपाडी कॉंक्रीटची जंगले उभी राहत असून नैसर्गिक जंगले आकुंचन पावत आहेत आणि मानवी हालचाली सातत्याने वाढत आहेत. जंगलाजवळ निसर्गाच्या सानिध्यात फार्महाऊस उभारण्याचा कल वाढला आहे. विकासाच्या नावाखाली जंगलातून महामार्ग बांधले जात आहेत तसेच जंगलतोड करून उत्खनन सुरू आहे. यामुळे वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास थेट नष्ट होत आहेत आणि वर्षानुवर्षे नैसर्गिक आपत्तींची तीव्रता वाढत आहे.

ज्या जंगलांमध्ये वाघ राहतात, तेथील परिसंस्था अधिक समृद्ध आणि संतुलित असते. वाघ हा केवळ एक वन्यप्राणी नसून संपूर्ण जंगलाचा संरक्षक आहे. त्याच्या अस्तित्वासाठी विशाल, सुरक्षित आणि मानवी हस्तक्षेपापासून मुक्त अधिवास आवश्यक असतो.अशा अधिवासांचे संरक्षण केल्याने असंख्य वन्यप्राणी, वनस्पती, सूक्ष्मजीव आणि संपूर्ण जैवविविधता सुरक्षित राहते. वाघ शाकाहारी प्राण्यांची संख्या नियंत्रित ठेवतो, त्यामुळे वनस्पतींचा अतिवापर टळतो आणि नैसर्गिक समतोल अबाधित राहतो. सुरक्षित जंगले अधिक प्रमाणात कार्बन शोषून घेतात आणि हवामान बदलाचे दुष्परिणाम कमी करण्यास मदत करतात. तसेच दाट जंगले पावसाच्या पाण्याचा प्रवाह नियंत्रित करून पुराची तीव्रता कमी करतात आणि कोट्यवधी लोकांना गोड्या पाण्याचा पुरवठा करतात. त्यामुळे वाघ आणि त्यांच्या अधिवासाचे संरक्षण म्हणजे संपूर्ण पर्यावरणाचे संरक्षण होय. हे संरक्षण मानवजीवन, शेती, जलस्त्रोत आणि भावी पिढ्यांसाठी अत्यंत आवश्यक आहे.

दरवर्षी २९ जुलै रोजी 'आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन' साजरा केला जातो.या दिवसाचा उद्देश संकटग्रस्त



मोठ्या मांजरांच्या प्रजाती आणि त्यांच्या नैसर्गिक अधिवासाच्या संरक्षणाबाबत जनजागृती करणे हा आहे.वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी आहे.'वाघ वाचवा, जंगल वाचवा, निसर्ग वाचवा' हा संदेश याच कारणासाठी दिला जातो, कारण वाघ टिकले तरच आपणही सुरक्षित राहू. ही बाब प्रत्येकाने समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. ग्लोबल टायगर फोरमच्या माहितीनुसार, जगभरातील जंगलांमध्ये केवळ ५,६६० वाघ शिल्लक आहेत. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांच्या 'भारतातील वाघांची स्थिती: सह-भक्षक आणि भक्ष्य-२०२२' या अहवालानुसार त्यापैकी ३,६८२ वाघ भारतात आढळतात. दरवर्षी रस्ते अपघात, शेतांमधील विजेचा धक्का, उघड्या विहिरीत पडणे आणि अवैध शिकारीमुळे असंख्य वन्यजीवांचा अकाली व दुर्दैवी मृत्यू होतो. विदर्भ (महाराष्ट्र) येथील वृत्तपत्रांमध्ये विशेषतः वाघांच्या मृत्यूच्या घटना वारंवार प्रसिद्ध होत असतात. सातत्याने वाढणारे वाघांचे मृत्यू हे गंभीर चिंतेचे कारण आहे. गेल्या सहा महिन्यांत महाराष्ट्रात २४ वाघांचा मृत्यू झाला आहे. तसेच २०२५ मध्ये मध्यप्रदेशात ५४ वाघांचा, तर महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या माहितीनुसार महाराष्ट्रात ४१ वाघांचा मृत्यू झाला.

शास्त्रज्ञांच्या मते वाघ सुमारे २० लाख वर्षांपासून पृथ्वीवर अस्तित्वात आहेत. मात्र, गेल्या शंभर वर्षांत मानवी हस्तक्षेप, जंगलतोड आणि अवैध शिकारीमुळे त्यांच्या संख्येत सुमारे ९७ टक्क्यांची घट झाली आहे. त्यामुळे त्यांना संकटग्रस्त प्रजाती मानले जाते. आजही अवैध शिकार हा त्यांच्या अस्तित्वासमोरील सर्वात मोठा धोका आहे. वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर आशियामध्ये त्यांच्या संवर्धनासाठी सातत्याने कार्यरत आहे. २०१६ मध्ये काही भागांत वाघांची संख्या वाढल्याची नोंद झाली असली, तरी दक्षिण-पूर्व आशियात त्यांची संख्या अजूनही घटत आहे.

मनुष्यासारख्या बुद्धिमान प्राण्याकडे आज कायदेशीर अधिकार, प्रगत तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे, शासनव्यवस्था, न्यायव्यवस्था, सोशल मीडिया, नातेवाईक, मित्रपरिवार आणि समाज असे अनेक आधार उपलब्ध आहेत. तरीसुद्धा उच्चशिक्षित आणि जागरूक असूनही अनेक प्रसंगी माणूस स्वतःला असहाय्य आणि फसवला गेल्यासारखे अनुभवतो. स्वतःच्या समस्यांच्या निराकरणासाठी सरकारी कार्यालये, लोकप्रतिनिधी आणि न्यायालयांचे उंबरठे झिजवूनही अनेकदा त्याला समाधानकारक न्याय मिळत नाही. पावसाळ्यात पूर, उन्हाळ्यात दुष्काळ, उष्णतेची लाट आणि पाण्याची टंचाई, हिवाळ्यात धुके, हायपोथर्मिया तसेच विविध नैसर्गिक आपत्ती अशा संकटांना मानवालाही सामोरे जावे लागते. सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध असूनही जर माणूस अशा परिस्थितीत हतबल होत असेल, तर त्याच्या तुलनेत वन्यप्राण्यांची अवस्था किती कठीण असेल, याची कल्पनाही करणे अवघड आहे.

**डॉ. प्रीतम भी. गेडाम**
मो.-०८२३७४ १७०४१

# एका वेळी एका घोटाने जगाला पुनर्जलीकरण करावे

### जागतिक ओआरएस दिवस



१९७१ च्या बांगलादेश युद्धाच्या वेळी कॉलरा साथीच्या आजारात हजारो लोकांचे प्राण वाचवणारे भारतीय बालरोगतज्ज्ञ डॉ.दिलीप महालानबिस यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाची आठवण म्हणून जागतिक स्तरावर दरवर्षी २९ जुलै रोजी जागतिक ओआरएस दिवस (वर्ल्ड ओआरएस डे) साजरा केल्या जातो. २०२६ ची या दिवसाची संकल्पना 'ओआरएस: एक स्वस्थ भविष्यासाठी एक सोपा उपाय- ओआरएस:ए सिम्पल सोल्युशन फोर अ हेल्दीअर फ्युचर' आहे.विशेषतः मुलांमध्ये निर्जलीकरणामुळे होणारे मृत्यू टाळण्यासाठी, डायरिया आणि उलट्यांच्या वेळी शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठी 'ओआरएस' (ओरल रीहायड्रेषण सोल्युशन ) या जीवनरक्षक द्रावणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी/ समर्पित आहे. हा साधा पण प्रभावी उपाय लाखो लोकांचे प्राण वाचवित आहे, कधीकधी सर्वात सोप्या उपायांचाच सर्वात मोठा परिणाम होतो.ओआरएसने डिहायड्रेशनवर उपचार करण्यासाठी एक सुरक्षित, परवडणारा आणि सहज उपलब्ध मार्ग प्रदान करून जागतिक आरोग्यात क्रांती घडवली आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या (नेशनल हेल्थ मिशन ) आकडेवारीनुसार, कॉलरा आणि गॅस्ट्रो अतिसारामुळे भारतात दरवर्षी सुमारे १ लाख मुलांचा मृत्यू होतो. तापमान वाढीमुळे दरवर्षी अनेक उघड्यावरील कार्यक्रमांमध्ये डिहायड्रेशनचे बळी जाण्याच्या घटना घडतात.डिहायड्रेशन हे मुलांमधील टाळता येण्याजोग्या मृत्यूंच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे. रुग्णालयांपासून ते घरांपर्यंत, ओआरएसचे एक छोटे पाकीट जीवन आणि मृत्यू यातील फरक ठरवू शकते, विशेषतः मर्यादित संसाधने असलेल्या ठिकाणी ओआरएस( ग्लुकोज, सोडियम आणि पोटॅशियम यांचे योग्य संतुलन असलेले शास्त्रीयदृष्ट्या तयार केलेले मिश्रण आहे हे सोल्युशन अतिसार, उलट्या, उष्माघात, कॉलरा आणि डेंग्यूसारख्या आजारांमुळे आणि जास्त घाम येण्यामुळे आपल्या शरीरातील अतिरिक्त पाणी कमी होते, तेव्हा सोडियम आणि पोटॅशियमसारखे महत्त्वाचे क्षारही शरीरातून कमी (निर्जलीकरण होतात) यावर उपचार करण्यासाठी वापरले जाणारे एक सोपे, कमी खर्चाचे आणि जीवनरक्षक सूत्र आहे.ज्यामुळे गंभीर गुंतागुंत टाळता येते.जेव्हा अतिसार, उलट्या ओआरएस या क्षारांची भरपाई करते आणि ओआरएस शरीराला अधिक कार्यक्षमतेने द्रवपदार्थ शोषून घेण्यास मदत करते, ज्यामुळे थकवा, गोंधळ/ गंभीर प्रकरणांमध्ये मृत्यूसारख्या गुंतागुंती टाळता येतात. ओआरएस सर्वांसाठी सुरक्षित आहे, पण ५ वर्षांखालील मुलांना अतिसार, आजारपणात/उष्णतेच्या वेळी वृद्ध व्यक्ती, ज्या लोकांना ताप किंवा उलट्या होत आहेत, उष्ण वातावरणातील खेळाडू किंवा कामगार, निर्जलीकरणाची लक्षणे जसे की तोंड कोरडे पडणे, गडद रंगाची लघवी, चक्कर येणे किंवा थकवा जाणवणे दिसत असतील या लोकांसाठी ते विशेषतः महत्त्वाचे आहे.ओआरएस कसे वापरावे-: आपले हात धुआ पूर्ण सॅशे(पोकेट) १ लिटर स्वच्छ पाण्यात मिसळा. चांगले ढवळा.अतिरिक्त काहीही घालू नका. ६ तासांच्या आत वापरा. जर सॅशे उपलब्ध नसतील तर घरी बनवण्याची ओआरएसची कृती : आपले हात धुआ १ लिटर स्वच्छ पाण्यात ६ चमचे साखर आणि अर्धा चमचा मीठ मिसळा. पूर्णपणे विरघळेपर्यंत ढवळा. २४ तासांच्या आत वापरा.यात दुसरे काहीही घालू नका.जास्त मीठ किंवा साखर हानिकारक ठरू शकते त्यामुळे प्रमाण तंतोतंत पाळा. हा दिवस केवळ कॅलेंडरवरील एक तारीख न राहता, कृती करण्याचे आवाहन ठरू द्या. हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवा, गैरसमज दूर करा आणि हायड्रेशनला (शरीरात पुरेसे पाणी ठेवण्याला) प्राधान्य द्या. कारण जेव्हा जीव वाचवण्याचा प्रश्न येतो, तेव्हा पाण्याचा प्रत्येक घोट खरोखरच महत्त्वाचा असतो. जगाला पुन्हा सजीव करण्याची सुरुवात ज्ञानाने होते आणि त्यासाठी एका सोप्या उपायाची गरज आहे.

ओआरएसचा घ्या आधार, जुलाब-उलट्यांवर हाच एक उपचार!

**डॉ. मनोज निचत** डायरेक्टर
श्रीकृष्ण हार्ट अंड मलटीस्पेशालीटी हॉस्पिटल, अमरावती

**प्रासंगिक**

## गुरु वंदन ..!

ज्याईच्या पासुन मी
शिकलो कायी

माहा साष्टांग दंडवत
त्याहीच्या पायी..!

माय बाप गुरुचा
ज्याला मिळे आर्शिवाद

जनम मरण्याच्या फेऱ्यातुन
मुक्त होई तो निर्विवाद..

ज्याच्यावर असीन
सद्गुरूची छाया

भौ त्याले भ्रमीत
करू शकत नाई माया..

सदगुरुंच्या उपदेशाचं
जो करे पालन

सफल होऊन जातं
त्यांचं मानवी जीवन..!



**अशोक सारडा मेहकर**
(९४२१३९४३३९)

# लोकसेवा हक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर

## राज्य सेवा हक्क आयोगाकडून मनपाच्या कामकाजाचा आढावा

■ प्रतिनिधी | अकोला ■

नागरिकांना शासनाच्या सेवा अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेळेत उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाने अकोला महानगरपालिकेच्या कामकाजाचा आढावा घेतला. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अमरावती विभागाचे आयुक्त तथा राज्य सेवा हक्क आयोगाचे सदस्य अरुण डोंगरे यांनी मंगळवारी मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेतली.

### नागरिकांना विहित मुदतीत, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण सेवा देण्याच्या सूचना



बैठकीत मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी महानगरपालिकेमार्फत नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या ऑनलाइन व ऑफलाइन अधिसूचित सेवा, विविध विभागांची कार्यपद्धती, प्रशासकीय संरचना तसेच नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांची सविस्तर माहिती सादर केली.

यावेळी अरुण डोंगरे यांनी लोकसेवा हक्क अधिनियमाचा उद्देश नागरिकांना विहित मुदतीत दर्जेदार आणि नागरिकाभिमुख सेवा उपलब्ध करून देणे हा असल्याचे सांगितले. प्रत्येक पदनिर्देशित अधिकाऱ्याने वेळेत सेवा देण्याची जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच सेवा देण्यात अनावश्यक विलंब किंवा निष्काळजीपणा टाळण्याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. अधिनियमातील तरतुदींचे काटेकोर पालन केल्यास नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल, असेही त्यांनी नमूद केले. बैठकीपूर्वी अरुण डोंगरे यांचे मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. उपसचिव देवेंद्र चव्हाण, कक्ष अधिकारी क्षितीज तोंडे आणि सहायक कक्ष अधिकारी सुजीत सरोदे यांचाही सत्कार करण्यात आला.

बैठकीला उपायुक्त दिलीप जाधव, सहायक आयुक्त विठ्ठल देवकते, देविदास निकाळजे, राजेश सरप, गजानन घोंगे, सहायक नगररचनाकार मृणालिनी मानतकर, शिक्षणाधिकारी हरिश्चंद्र इटकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अविनाश सोनोने, कर अधीक्षक नंदिनी दामोदर, संगणक विभागप्रमुख हेमंत रोजतकर, अग्निशमन विभागाचे मनीष कथले, पाणीपुरवठा विभागाचे नरेश बावणे, बांधकाम विभागाचे सुधीर माल्टे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीचे संचालन सहायक आयुक्त तथा जनसंपर्क विभागप्रमुख विठ्ठल देवकते यांनी केले, तर आभार प्रदर्शन उपायुक्त दिलीप जाधव यांनी मानले.

# शैक्षणिक गुणवत्तेसह संगीत क्षेत्रातही आस्की किड्स स्कूलचा सूर बुलंद

■ प्रतिनिधी | अकोट ■




### गांधर्व महाविद्यालयाच्या संगीत परीक्षेत १०० टक्के निकाल; विद्यार्थ्यांची घवघवीत कामगिरी

शैक्षणिक गुणवत्तेसोबत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याची परंपरा जपणाऱ्या अकोट येथील आस्की किड्स पब्लिक स्कूलने संगीत क्षेत्रातही उल्लेखनीय यशाची नोंद केली आहे. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या वतीने आयोजित संगीत परीक्षेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले आहे.

गायन व सिंथेसायझर विषयाच्या शास्त्रीय संगीत परीक्षेसाठी शाळेतील १७ विद्यार्थी सहभागी झाले होते. या सर्व विद्यार्थ्यांनी यश मिळवत शाळेचा लौकिक वाढविला. यामध्ये ११ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य (डिस्टिंक्शन) मिळविले, तर सहा विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

तबला विषयाच्या शास्त्रीय संगीत परीक्षेसाठी १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी दोन विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, नऊ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, तर एका विद्यार्थ्याने द्वितीय श्रेणी मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

सुगम संगीत परीक्षेतही आस्की किड्स पब्लिक स्कूलच्या १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे या सर्व विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत शंभर टक्के यशाची नोंद केली.

विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, शाळेचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षक आणि पालकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना संगीत शिक्षक रजनी भवाने आणि अजय लोणकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल तसेच विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन देणाऱ्या पालकांचेही सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक व सांगीतिक वाटचालीसाठी शुभेच्छाही व्यक्त करण्यात आल्या.

# भूमीवर चिखल, डोळ्यांत शिक्षणाची आस!



### खेट्रीतील उर्दू शाळेकडे जाणारा रस्ता चिखलमय; विद्यार्थ्यांची रोजच जीव मुठीत धरून पायपीट

■ प्रतिनिधी | खेट्री ■

'शिक्षणाचा मार्ग सुकर असावा,' अशी अपेक्षा असताना पातूर तालुक्यातील खेट्री येथे विद्यार्थ्यांना मात्र चिखलातून वाट काढत शाळेत जावे लागत आहे. खेट्री येथील मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू माध्यमिक शाळा तसेच कब्रस्तानाकडे जाणारा मुख्य रस्ता पावसाळ्यात पूर्णपणे चिखलमय झाल्याने विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांची गैरसोय होत आहे.

खेट्री, शिरपूर आणि पिंपळखुटा परिसरातील अनेक विद्यार्थी या मार्गाचा वापर करून दररोज शाळेत ये-जा करतात. मात्र पावसामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल आणि पाण्याची डबकी साचत असल्याने विद्यार्थ्यांना अक्षरशः पायपीट करावी लागत आहे. अनेक वेळा घसरून पडण्याच्या घटनाही घडल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

ग्रामस्थ आणि शाळा प्रशासनाने रस्त्याच्या दुरुस्तीसाठी संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा केल्याचे सांगितले जाते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि सुलभ मार्ग उपलब्ध व्हावा यासाठी रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून पाण्याचा योग्य निचरा करण्याची मागणी पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांनी केली आहे.

**'निधी मिळाल्यानंतर तातडीने दुरुस्ती'**

'शाळा आणि कब्रस्तानाकडे जाणारा रस्ता चिखलमय झाल्यामुळे विद्यार्थी व ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मात्र ग्रामपंचायतीकडे रस्त्याच्या दुरुस्तीसाठी आवश्यक निधी उपलब्ध नाही. शासनाकडून निधी प्राप्त होताच रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात येईल.'

**जहूर खान**, सरपंच, खेट्री

# सर्वांसाठी मोफत 'नवीन एआय मास्टर क्लास'

**अकोला :** आयटी क्षेत्रातील पायाभूत ज्ञान देणारा सर्वोत्तम कोर्स म्हणून एमएससीआयटी ची ओळख सर्वदूर आहे.या एका कोर्सला दोन कोटीहून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेणे हा एक जागतिक विक्रम आहे.

बदलत्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित युगाचा दर्जा लक्षात घेता महाराष्ट्र ज्ञान महामंडळाने पारंपरिक एमएससीआयटी कोर्स अधिक अद्यावत करून त्यात कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सुरक्षा, डेटा साक्षरता व क्लाऊड कम्प्युटिंग यासारख्या नवयुगातील कौशल्यांचा समावेश केला असून नागरिकांसाठी महामंडळाच्या वतीने मोफत आर्टिफिशियल इंटेलिजंट मास्टर क्लास उपक्रम साकार करण्यात आला असल्याची माहिती महाराष्ट्र ज्ञान महामंडळचे अमरावती विभागीय समन्वयक देवेंद्र पाथरे यांनी दिली. महामंडळाचे अमरावती विभागीय समन्वयक चंद्रमुनी हनवते, अकोला जिल्हा समन्वयक प्रशांत धर्मे यांच्या उपस्थितीत या मोफत नव उपक्रमाची माहिती देण्यात आली. महामंडळाच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून एमकेसीएल ने 'आपण करूया महाराष्ट्र एआय रेडी' ही एआय जनजागरण मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे महामंडळाच्या वतीने मोफत ६० मिनिटांचा एआय मास्टर क्लास सुरू केला.

## लसीकरण, स्वच्छता आणि उपचाराने हिपॅटायटिसवर मात शक्य

**अकोला :** हिपॅटायटिस हा गंभीर आजार असला तरी योग्य माहिती, लसीकरण, स्वच्छता आणि वेळेवर उपचार यांच्या मदतीने त्यावर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. जागतिक हिपॅटायटिस दिन हा केवळ एक दिवस नसून निरोगी समाज घडविण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे.

# पोदारच्या बाल विद्यार्थ्यांनी लुटला चिखलात खेळण्याचा आनंद

**अकोला :** अकोला शिक्षणा सोबतच अनेक आरोग्यदायी उपक्रम राबविणाऱ्या स्थानीय सुधीर कॉलोनी परिसरातील पोदार प्रेप शाळेत योग इन मड या संकल्पनेवर आधारित मड अर्थात चिखल दिन उत्साहात संपन्न झाला.या उपक्रमात चिमुकल्यानी आपल्या पालकसमवेत चिखलात खेळण्याचा मनमुराद आनंद लुटला.यातून बालकांनी निसर्गातील विविध संवेदना अनुभवत धावपळीच्या वातरवरणातून मोकळा श्वास घेण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला. कार्यक्रमात चिमूकल्यानी मनसोक्त चिखलात डुंबून धम्माल केली.यावेळी बाल विद्यार्थ्यांनी मातीत विविध खेळ साकार करीत जल्लोष केला.उपक्रमात शाळेच्या प्राचार्य नीता तलरेजा, मुख्याध्यापिका संगीता धानुका याची प्रामुख्याने उपस्थिती लाभली.त्यांनी ही यावेळी विद्यार्थ्यांसमवेत यात सहभाग घेतला.बालकांनी यावेळी योग मुद्रा,मड पेंटिंग,मड बेकरी, मड प्ले समवेत अनेक खेळ साकार करीत धमाल उडवून दिली.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार किरण गोपाल चंदन रा. शामसुंदर अपार्टमेंट, भागवत प्लॉट, अकोला, ता. जि. अकोला. यांच्या मालकी, ताब्यातील व उपभोगातील मालमत्तेचे वर्णन : मौजे प्र. ता. जि. र. स. डी. र.डी. अकोला येथील म.न.पा. अकोला हददीतील नझुल प्लॉट नं. १/५, शिट क्र. ६४ सी, क्षेत्र २७७२ चौ. फुट, प्लॉट व त्यावरील बांधकाम परवानगी म.न.पा. अकोला चे महानगर पालीका केस क्रमांक १४/७६८/१९८८-८९, दि. १८/०१/१९८९ कराराप्रमाणे अपार्टमेंट बांधल्यानंतर सदर अपार्टमेंटला शामसुंदर असे नाव देण्यात आले. त्यामधील फ्लॅट क्र. १०१, पहिल्या माळयावरील ज्याचे बांधकाम क्षेत्र ५०० चौ. फुट आहे. ज्यामध्ये दोन बेडरूम, एक हॉल, एक किचन, संडास बाथरूम व बालकनी आहे. ज्यास चतुर्सिमा पुर्वेस : भागवत यांचे घर, पश्चिमेस : कराळे यांचे घर, उत्तरेस : ३० फुटाचा रोड, दक्षिणेस : जिना व फ्लॅट क्र. १०२ येणे प्रमाणे चतु:सिमेतील मालमत्ता आमचे पक्षकारास विकणे आहे.

तरी इच्छुकांनी आमचे पक्षकारासोबत संपर्क करून सदर मालमत्तेबाबत रास्त भावात खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करून घ्यावा करीता ही जाहिर नोटीस.

अकोला
दि. २०/०७/२०२६

**ॲड. अविनाश एस. उजाडे**
अकोला, ता. जि. अकोला.

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकास या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मी स्वत: नामे बलराम मिठुलाल बामनेट यांनी शंकर जियालाल धमेरिया, रा. बापु नगर, आपातापा रोड, अकोला ता.जि. अकोला यांच्याकडुन त्यांचे मालकीचे व ताब्यातील आपातापा दमानी रोड बापु नगर, अकोला जुना वार्ड नं. सी-७, मालमत्ता क्र. ७८८, सिमेंट विटाचे पक्के बांधकाम दोन रूम, संडास बाथरूम व समोर खुली जागा ज्याची ईमला ईसार पावती दि. ०२/०५/२०२४ रोजी रू. ३,००,०००/- मध्ये केली. सदर मालमत्तेचा ११ महिन्याच्या अवधीकरीता खरेदीचा करारनामा केला आहे. वरील वर्णीत मालमत्तेचा आपण दुसऱ्यासोबत कोणताही व्यवहार, गहाण, बोजा व हितसंबंध अशाप्रकारचा व्यवहार करू नये, जर आपण खरेदीखत नोदंवुन देण्यास नकार दिला तर आम्ही स्वतः रितसर वि. न्यायालयामधुन योग्य दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करतील व उद्भवणाऱ्या खर्चास व परिणामास शंकर जियालाल धमेरिया हे जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

सदर मालमत्ते संबंधात प्रकरण दिवाणी दावा नं.आरसीएस ३०९/ जिल्हा अकोला दिवाणी न्यायालयात प्रकरण चालु आहे.

दि. २८/०७/२०२६

**ॲड. बि.एम.बामनेट**
पत्ता- अकोला बार असोसिएशन
अकोला मो. ८३२९८३०२६३

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

क्र.प्रस्तु.-२/कावि/१४१९/२०२६ दिनांक २७.०७.२०२६

### जाहीरनामा

याव्दारे सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार जन्म मृत्यु नोंदणी करीता अर्जदार शुभम मदन भरगड, गिता नगर अकोला यांचे आत्या नामे संतोष बोधुलाल भरगड, खोलेश्वर अकोला यांचा मृत्यु येथे दिनांक २५.०५.२०२३ रोजी झाला असून त्यांच्या मृत्युची नोंद निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग अकोला महानगरपालिका, अकोला येथे नजर चुकीने करण्यात आली नाही. करिता अर्जदार यांनी मृत्युची नोंद घेण्याकरीता आदेश होणेबाबत निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, अकोला महानगरपालिका, अकोला येथे विनंती अर्ज सादर केला आहे.

त्यानुसार, शुभम मदन भरगड, गिता नगर अकोला यांचे आत्या नामे संतोष बोधुलाल भरगड, खोलेश्वर अकोला यांच्या मृत्युची नोंद घेण्याकरिता कोणाला काही आक्षेप / हितसंबंध असतील त्यांनी आपले आक्षेप हरकत अर्ज हया कार्यालयात जाहिरनामा प्रसिध्दी पासुन सुट्टीचे दिवस वगळून पंधरा दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावे, विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप हरकती विचारात घेतल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्थळ : अकोला
दिनांक :-

शिक्का

**कुणाल झाल्टे**
**तहसिलदार अकोला**

## जाहीर नोटीस

### वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०४९/२०२६ प्रोसेस नं.८७८८/२०२६
चौ.ता. २०/०८/२०२६ दिनांक : १४/०७/२०२६

**अर्जदार :** ओमप्रकाश शंभुनाथ तिवारी रा.चाचोंडी रोड, राजेश नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. शंभुनाथ रामफेर तिवारी २. हिराबाई शंभुनाथ तिवारी
**पत्ता :-** रा. चाचोंडी रोड, राजेश नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शंभुनाथ रामफेर तिवारी यांचे दि. ०२/०३/२०२१ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत हिराबाई शंभुनाथ तिवारी याचे दि. १४/०९/२०२२ रोजी अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११४७/२०२६ प्रोसेस नं.९२८५/२०२६
चौ.ता. २८/०८/२०२६ दिनांक : २१/०७/२०२६

**अर्जदार :** १. सलमा बी आमद खान रा. काली मस्जीद, हुमायू रोड, अकोला. ता. जि. अकोला. २. हलीमा बी फिरोज खान रा. बैदपूरा, काला चबुतरा, अकोला. ता. जि. अकोला. ३. जरीना बी युसुफ खान रा. लाडीस फैल, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला. ४. फरीदा परवीन सुलेमान खान रा. मोहम्मद अली रोड, अजमेरी चक्की जवळ, अकोला. ता. जि. अकोला. ५. इकबाल खान आमद खान ६. फिरोज खान आमद खान ७. बेबी फिरोजा आमद खान ८. साजीद खान आमद खान ९. रूबीना बी आमद खान १०. फारूख खान आमद खान क्र. ५ ते १० रा. काली मस्जिद, हुमायू रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : आमद खान लाल खान
**पत्ता :-** रा. काली मस्जिद, हुमायू रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत आमद खान लाल खान यांचे दि. १४/१०/२०२४ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १२१५/२०२६ प्रोसेस नं.९४२५/२०२६
चौ.ता. ३१/०८/२०२६ दिनांक : २३/०७/२०२६

**अर्जदार :** १. नागोराव तुकाराम आठवले, रा. दहिहांडा, ता. जि. अकोला. २. देवकाबाई मनोहर भारसाकळे, रा. पिंपरी खुर्द, ता. जि. अकोला. ३. प्रभा अशोक गावंडे, रा. पो. सांगळूद, ता. दर्यापूर, जि. अमरावती. ४. वर्षा जनार्दन वानखडे, रा. मोठी उमरी, अकोला, ता. जि. अकोला. ५.यशोदा कांतिलाल उमाळे, रा. मु. कपिलेश्वर, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : तुकारामजी नथ्थुजी आठवले
**पत्ता :-** रा. दहिहांडा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत तुकारामजी नथ्थुजी आठवले यांचे दि. ०६/१०/२०१६ रोजी परसापुर, ता. अचलपूर, जि. अमरावती येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ३१/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०६७/२०२६ प्रोसेस नं.८८७९/२०२६
चौ.ता. २०/०८/२०२६ दिनांक : १६/०७/२०२६

**अर्जदार :** १. नितेश हरीदास मुंडे २. मंजित हरीदास मुंडे ३. शालनी हरीदास मुंडे सर्व रा. शिवसेना, विर भगतसिंग नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भाउराव यशवंत मुंडे
**पत्ता :-** रा. शिवसेना, विर भगतसिंग नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भाउराव यशवंत मुंडे यांचे दि. १८/११/१९९७ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११६०/२०२६ प्रोसेस नं.९१६६/२०२६
चौ.ता. २७/०८/२०२६ दिनांक : २०/०७/२०२६

**अर्जदार :** सुनिल पुरूषोत्तम घोडके रा. ४२–डी, ॲडव्होकेट लहाने यांचे घराजवळ, केशव नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. पुरूषोत्तम लक्ष्मणराव घोडके २. शोभाताई पुरूषोत्तम घोडके
**पत्ता :-** रा. ४२ - डी, ॲडव्होकेट लहाने यांचे घराजवळ, केशव नगर,अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत पुरूषोत्तम लक्ष्मणराव घोडके यांचे दि. १६/०९/२०१९ रोजी राहते घरी निधन झाले आहे. तसेच मयत शोभाताई पुरूषोत्तम घोडके यांचे दि. २६/०९/२०१७ रोजी सिटी हॉस्पिटल, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०८/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०७५/२०२६ प्रोसेस नं.९३३२/२०२६
चौ.ता. २९/०८/२०२६ दिनांक : २२/०७/२०२६

**अर्जदार :** १. कमलाबाई कल्लू यादव २. भारत कल्लू यादव ३. जमुनाप्रसाद कल्लू यादव ४. दिनानाथ कल्लू यादव ५. दिपक कल्लूराम यादव ६. रेखा नंदकिशोर यादव क्र. १ ते ६ रा. मोहता मिल चाळ, तपे हनुमान नगर, अकोला. ता. जि. अकोला. ७. सुरेखा राजेश यादव रा. लोकमान्य नगर, जुना बाळापूर नाका, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कल्लू भगवतीप्रसाद यादव
**पत्ता :-** रा. मोहता मिल चाळ, तपे हनुमान नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कल्लू भगवतीप्रसाद यादव यांचे दि. ०५/०२/२०२१ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०६९/२०२६ प्रोसेस नं.८७७९/२०२६
चौ.ता. १९/०८/२०२६ दिनांक : १४/०७/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती सुलभा शिवदास पवार २. शरद शिवदास पवार ३. अक्षय शिवदास पवार सर्व रा. रामचंद्र निवास, सुधीर कॉलनी, विवेकानंद नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शिवदास रामधन पवार
**पत्ता :-** रा. रामचंद्र निवास, सुधीर कॉलनी, विवेकानंद नगर,अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शिवदास रामधन पवार यांचे दि. ०८/०३/२०२६ रोजी राहत्या घरी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## दरपत्रक

### कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग, अकोला मुर्तिजापुर रोड, अकोलाक्र. ४४४ 001

E-Mail-aklirrigation@gmail.com फोन नं:- (०७२४) २४१४३१६

कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग, अकोला अंतर्गत निरीक्षण वाहन बाहय यंत्रणेकडुन कंत्राटी पध्दतीने भाडेतत्वावर घेणे साठी दरपत्रक मागविण्यांत येत आहेत. सदर दरपत्रक हे दिनांक २८/७/२०२६ ते ०४/८//२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग, अकोला मुर्तिजापुर रोड, नेहरू पार्कजवळ, अकोला येथे सादर करावीत.

सदर करारा करीता लागु असलेल्या अटी व शर्ती तसेच सविस्तर जाहिरात व अर्जाचा नमुना हा कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग, अकोला, मुर्तिजापुर रोड, नेहरु पार्कजवळ, अकोला या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळुन उपलब्ध आहेत.

सदर सविस्तर जाहिरात व अर्जाचा नमुना जलसंपदा विभागाच्या wrd.maharastra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

वि.मा.का./अम./जाहि/
३७५/ २०२६-२०२७

**(चि.वि. वाकोडे)**
कार्यकारी अभियंता
अकोला पाटबंधारे विभाग, अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २२९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त

### दारूबंदीचा सल्ला महागात; चाकूहल्ल्यात एक जखमी

**देवळी-**गावातील अवैध दारू व्यवसाय बंद करण्याचा सल्ला दिल्याचा राग मनात धरून एका व्यक्तीवर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना चिंचाळा येथे घडली. या प्रकरणी देवळी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. भिमराव डुकरे हे घराच्या अंगणात बसले असताना काही जण समीर भुजाडे याला घरी घेऊन जात होते. त्यावेळी दारूचे धंदे बंद करावेत, असे सांगण्यात आले. त्यावर गावातील महिलांनी पुढाकार घेऊन महिला मंडळ स्थापन करण्याचा सल्ला देण्यात आला. त्यानंतर काही वेळाने समीर भुजाडे पुन्हा घटनास्थळी आला आणि दारू व्यवसायाबाबत बोलल्याचा जाब विचारत वाद घातला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपीने जवळील चाकूने वार करून भिमराव डुकरे यांना जखमी केल्याची तक्रार आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### गांजा सेवन करणाऱ्यांवर कारवाई

**वर्धा-**जिल्ह्यात अमली पदार्थांच्या वाढत्या गैरवापराला आळा घालण्यासाठी विविध पोलिस ठाण्यांनी संयुक्त धडक मोहीम राबवून गांजा सेवन करणाऱ्या सहा जणांविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये कारवाई केली. सावंगी, समुद्रपूर, वर्धा शहर, हिंगणघाट, कारंजा आणि सेवाग्राम पोलिसांनी स्वतंत्र कारवाया करत आरोपींना रंगेहात ताब्यात घेतले. काही आरोपी चिलमच्या सहाय्याने गांजा सेवन करताना आढळून आले असून त्यांच्या ताब्यातून चिलमसह संबंधित साहित्य जप्त करण्यात आले. तरुणांमध्ये वाढत चाललेल्या अमली पदार्थांच्या व्यसनावर नियंत्रण मिळविण्यासाठी पोलिसांनी ही मोहीम अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. सर्व आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

### पुलफैलात जुगार अड्ड्यावर छापा

**वर्धा-**पुलफैल परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर शहर पोलिसांनी धाड टाकून चार जणांना अटक केली. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईलसह एकूण सुमारे १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून ही कारवाई केली. जुगार खेळताना आढळून आलेल्या चारही आरोपींना घटनास्थळावरून ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी रोख रक्कम तसेच जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य आणि मोबाईल जप्त केले. या प्रकरणी सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून शहर पोलिस पुढील तपास करीत आहेत. शहरात सुरू असलेल्या बेकायदा जुगार अड्ड्यांवर यापुढेही अशाच धडक कारवाया सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

### बुंदेलखंड विशेषांकाचे प्रकाशन

**वर्धा-** राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धा यांच्या 'राष्ट्रभाषा' या मासिकाच्या बुंदेलखंड विशेषांकाचे प्रकाशन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. बुंदेलखंडचा इतिहास, लोकसंस्कृती, कला, बुंदेली भाषा, शब्दकोश, वाक्प्रचार, म्हणी, सण-परंपरा आणि वीर साहित्याचा समृद्ध वारसा उलगडणारा हा विशेषांक अभ्यासकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मान्यवरांनी सांगितले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समितीचे पंतप्रधान डॉ. हेमचंद्र वैद्य होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. सरोज गुप्ता (सागर), डॉ. वीरेंद्र निरझर, डॉ. टिकाराम त्रिपाठी, डॉ. प्रमिला सागर, डॉ. ओ. पी. गुप्ता, प्राचार्य विजय व्यास, प्रकाश बाभळे व डॉ. अनुपमा गुप्ता उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व गांधीजींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी डॉ. हेमचंद्र वैद्य यांनी 'राष्ट्रभाषा' मासिकाच्या ७१ वर्षांच्या गौरवशाली प्रवासाचा आढावा घेतला. अतिथी संपादक डॉ. सरोज गुप्ता यांनी महाराष्ट्र आणि बुंदेलखंडच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक नात्याचा गौरव केला, तर डॉ. वीरेंद्र निरझर यांनी राजा छत्रसाल व छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक संबंधांचा उल्लेख केला. डॉ. प्रमिला सागर यांनी सादर केलेल्या बुंदेली गीतांनी कार्यक्रमात रंगत आणली. डॉ. अनुपमा गुप्ता यांनी संचालन केले, तर प्राचार्य विजय व्यास यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## महाराणा प्रतापांच्या अश्वारूढ पुतळ्यासाठी हालचाली

### जागा उपलब्ध करून देण्याची मागणी



**आर्वी/जनमाध्यम**

शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या महाराणा प्रताप यांच्या अश्वारूढ पूर्णाकृती पुतळ्यासाठी आर्वी शहरात योग्य जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी सकल राजपूत क्षत्रिय समाजाने केली आहे. यासंदर्भात समाजाच्या शिष्टमंडळाने आ.सुमित वानखडे, नगराध्यक्षा स्वाती गुल्हाने आणि उपाध्यक्ष गौरव जाजू यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

शिष्टमंडळाशी चर्चा करताना आमदार सुमित वानखडे यांनी पुतळा उभारणीच्या कार्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. समाजाच्या मागणीचा सकारात्मक विचार करून नगरपालिका हद्दीत योग्य जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. निवेदनात महाराणा प्रताप यांचे शौर्य, त्याग, स्वाभिमान आणि मातृभूमीप्रती असलेली निष्ठा भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे नमूद करण्यात आले.त्यामुळे आर्वी शहरात त्यांचा अश्वारूढ पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा,अशी समाजाची दीर्घकालीन मागणी असल्याचे शिष्टमंडळाने स्पष्ट केले.

यावेळी सकल राजपूत क्षत्रिय समाजाचे अध्यक्ष नंदकिशोरसिंह दीक्षित,उपाध्यक्ष सुशीलसिंह ठाकुर, सचिव राजेश सोलंकी यांच्यासह नयनसिंह चव्हाण, नरेंद्रसिंह चौहान,कपिलसिंह ठाकुर, प्रशांतसिंह ठाकुर, पवनसिंह ठाकुर, लखनसिंह ठाकुर, राजेंद्रसिंह दीक्षित, डॉ.श्रीकांत ठाकूर, प्रफुलसिंह ठाकूर, उदयसिंह चव्हाण, दिलीपसिंह चव्हाण,सुनीलसिंह ठाकुर, दिनेशसिंह चव्हाण, भरतसिंह सेंगर, संजयसिंह ठाकुर, बबनसिंह चंदेल, प्रेमसिंह कछवा, विशालसिंह चौहान,आकाशसिंह सोलंकी यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजाच्या या मागणीमुळे शहरात महाराणा प्रताप यांच्या स्मारक उभारणीच्या चर्चेला पुन्हा वेग आला आहे.

# जनता दरबार की जनतेची फसवणूक

## रायझा टाऊनच्या जीवघेण्या रस्त्यावर शाळेची व्हॅन पलटली, पालकमंत्र्यांविरोधात नागरिकांचा आक्रोश





**वर्धा/जनमाध्यम**

रायझा टाऊन परिसरातील रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अखेर अपघात घडल्याने नागरिकांचा संताप अनावर झाला आहे. मंगळवारी दुपारी सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास न्यू इंग्लिश स्कूलची विद्यार्थ्यांना सोडून परतणारी शाळेची व्हॅन रायझा टाऊन परिसरातील खराब रस्त्यावर पलटली. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, ही घटना म्हणजे प्रशासनाच्या निष्क्रियतेचा परिणाम असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

परिसरातील नागरिक व तेथे वास्तव्यास असलेल्या पत्रकारांनी या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी वर्षभरापूर्वीच पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या जनता दरबारात लेखी निवेदन दिले होते. त्यानंतरही अनेक वेळा निवेदने, पाठपुरावा आणि तक्रारी करूनही या प्रश्नाकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

त्यामुळे जनता दरबार हा केवळ दिखावा असून जनतेच्या समस्यांवर प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही होत नाही, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पिंपरीचे माजी सरपंच अजय गौळकर यांच्या उपस्थितीत पालकमंत्र्यांनी हा रस्ता क्रमांक एकमध्ये येत नसल्याने त्यासाठी निधी उपलब्ध होत नाही, असे उत्तर देत विषय टाळला होता. दुसरीकडे ग्रामपंचायतीकडेही रस्ता आणि नाल्याच्या बांधकामासाठी वारंवार निवेदन देण्यात आले,मात्र ग्रामपंचायतीकडूनही कोणतीही ठोस पावले उचलली गेली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

आज विद्यार्थ्यांना सोडून परतणारी व्हॅन पलटली आणि मोठा अनर्थ टळला. मात्र उद्या याच रस्त्यावर एखाद्या शाळकरी मुलाचा जीव गेला किंवा मोठी दुर्घटना घडली तर त्याची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न परिसरातील नागरिकांनी उपस्थित केला आहे.

नागरिकांनी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी तातडीने रायझा टाऊन परिसरातील रस्त्याचा प्रश्न निकाली काढावा, अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल,असा इशाराही दिला आहे.

## सावंगा पुनर्वसन येथे युवकाची आत्महत्या

**आष्टी -** तालुक्यातील सावंगा पुनर्वसन येथील रहिवासी किरण चंद्रशेखर राऊत (वय २८) यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे. कुटुंबीयांना युवक गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिल्यानंतर आष्टी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून आत्महत्येमागील कारण अद्याप समजू शकलेले नाही. या प्रकरणी आष्टी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. युवकाच्या अकाली निधनाने नातेवाईक आणि परिसरातील नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

## आंगणातील किलबिल जपणाऱ्या लेखणीला राष्ट्रीय मान

### किलकारियों के क्षीण स्वर विषयावरील निबंधासाठी राजकुमार जाजू प्रथम

**वर्धा/जनमाध्यम**

समाजातील घटती जन्मदराची चिंता आणि कुटुंब व्यवस्थेचे महत्त्व प्रभावी शब्दांत मांडणाऱ्या वर्ध्यातील राजकुमार जाजू यांना अखिल भारतीय निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा राष्ट्रीय सन्मान मिळाला. श्री माहेश्वरी सेवा मंच परिवार व माहेश्वरी महिला मंडल, अमरावती यांच्या वतीने स्व. शशिकांत जाजू यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित स्पर्धेत त्यांनी किलकारियों का क्षीण होता स्वर : चिंतन एवं संकल्प या विषयावर मौलिक निबंध सादर केला. प्रत्येक परिच्छेदाला स्वतंत्र शीर्षक देत समाजासमोरील



लोकसंख्यात्मक प्रश्न मांडल्याबद्दल परीक्षकांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

अमरावती येथील राठी एज्युकेशन हबमध्ये झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात त्यांना रु७,००१ रोख, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी बोलताना जाजू यांनी, 'कुटुंब आणि नव्या पिढीचे अस्तित्व हेच समाजाच्या भविष्याचे खरे बळ आहे. आंगणातील किलबिल थांबली तर संस्कृतीही निःशब्द होईल,असे प्रतिपादन केले.

राजकुमार जाजू यांच्या नावावर यापूर्वीही विविध साहित्य प्रकारांत ७५ हून अधिक जिल्हा, विदर्भ, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार नोंदले गेले असून, या नव्या यशाने वर्ध्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

## आषाढी एकादशीनिमित्त तुळशीचे रोप व फराळ वाटप

**वर्धा/जनमाध्यम**

नवक्षितिज चॅरिटेबल ट्रस्ट (शाखा वर्धा)च्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त हवालदारपुरा येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात तुळशीच्या रोपांचे व फराळाचे वाटप करून भक्तांना पर्यावरण संवर्धनासह अध्यात्माचा संदेश देण्यात आला. हा उपक्रम ट्रस्टचे प्रदेशाध्यक्ष सुनील कुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी वर्धा ते पंढरपूर हे सुमारे ५७० किलोमीटरचे अंतर सायकलने पार करून आषाढी वारी पूर्ण करणारे विदर्भातील प्रसिद्ध



सायकलपटू मुकुंद मसराम यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या जिद्दीचे व सामाजिक प्रेरणेचे कौतुक केले.

यावेळी नगरसेवक प्रदीप तलमले, ट्रस्टचे अध्यक्ष नरेश कुमरे, वैशाली सिडाम, मनोज सिडाम तसेच सत्कारमूर्ती मुकुंद मसराम यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांनी समाजात पर्यावरण संरक्षण,सेवाभाव आणि धार्मिक परंपरांचे जतन करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रवीण आडे,राहुल कोहचडे,संजय आत्राम, पल्लवी कुमरे,मुरलीधर कुमरे,भूषण कुमरे,अक्षय सिडाम,साजन कोडापे,नवीन टेकाम, कार्तिक मसराम, पंकज बिजवे,विश्वनाथ सडमाके,प्रमोद ढाले,पप्पू मसराम,दीपक राठी,प्रिया मसराम,वर्षा कुमरे तसेच महिला कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. उपस्थित भाविकांनी या उपक्रमाचे स्वागत करत ट्रस्टच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

## दुचाकीची धडक; पादचाऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू

**हिंगणघाट-**शहरातील संत तुकडोजी वॉर्ड परिसरात भरधाव दुचाकीच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या पादचाऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून निष्काळजी वाहनचालकाविरुद्ध संताप व्यक्त केला जात आहे. मुरलीधर संभाजी चौधरी (वय ६०) रा. पोहणा, ह.मु. संत ज्ञानेश्वर वॉर्ड, हिंगणघाट हे पायी जात असताना मागून आलेल्या भरधाव दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली. अपघातात ते गंभीर जखमी झाले. त्यांना प्रथम हिंगणघाट उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी आकाश मुरलीधर चौधरी यांच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी संबंधित दुचाकी चालकाविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालविल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## शहालंगडी मंदिर परिसरात आधार फाऊंडेशनचा दुसरा वृक्षारोपण टप्पा उत्साहात

**हिंगणघाट/जनमाध्यम**

पर्यावरण संवर्धनाचा दृढ संकल्प करत आधार फाऊंडेशनच्या वतीने शहालंगडी मंदिर परिसरात वृक्षारोपण मोहिमेचा दुसरा टप्पा उत्साहात पार पडला. या उपक्रमात पर्यावरणप्रेमी, ओम अंबु माता योगमित्र व गंगामित्र परिवाराचे सदस्य तसेच आधार फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अतुल वांदिले यांच्या उपस्थितीत विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

निसर्ग संवर्धन,जैवविविधतेचे संरक्षण आणि भावी पिढ्यांसाठी हरित पर्यावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सावली देणारी तसेच पर्यावरणपूरक विविध प्रजातींची झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्पही उपस्थितांनी यावेळी केला. आधार फाऊंडेशनच्या कार्यकारी अध्यक्षा माधुरी विहीरकर यांनी पर्यावरण संरक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे



सांगत, झाडे लावण्याबरोबरच त्यांचे संगोपन करणे अधिक महत्त्वाचे आहे. प्रत्येकाने किमान एक झाड लावून ते जगविण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले.संस्थापक अध्यक्ष अतुल वांदिले यांनी वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि कमी होत चाललेले हरित क्षेत्र लक्षात घेता वृक्षारोपण ही काळाची गरज असल्याचे सांगितले. आगामी काळात शहरातील विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून पर्यावरण जनजागृतीचे अभियान अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाला प्रा.डॉ. शरद विहीरकर, माया चाफले, डॉ. नरेंद्र मनवर, लक्ष्मीकांत धार्मिक, प्रा.गजानन जुमडे, प्रा.विजय हटवार यांच्यासह आधार फाऊंडेशनचे पदाधिकारी,ओम अंबु माता योगमित्र व गंगामित्र परिवाराचे सदस्य, सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसर हिरवागार करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## यादे रफी सुरसंगम स्मार्ट सिंगर स्पर्धा २ ऑगस्टला

### साहित्य कला शोधक मंचाचे आयोजन, नवोदित गायक-गायिकांना सुवर्णसंधी

**वर्धा/जनमाध्यम**

स्थानिक साहित्य कला शोधक मंचच्या वतीने गेल्या ४० वर्षांपासून सातत्याने आयोजित करण्यात येणारी 'यादे रफी सुरसंगम स्मार्ट सिंगर-२०२६' चित्रपट गीत गायन स्पर्धा यंदा रविवार, २ ऑगस्ट रोजी स्थानिक पूज्य दादाजी धुनीवाले सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचे मुख्य प्रायोजकत्व एम. टी. डी. ज्वेलर्स यांनी स्वीकारले आहे. १५ ते ४० वर्षे वयोगटातील नवोदित गायक-गायिकांसाठी ही स्पर्धा खुली आहे.

स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी आपल्या पसंतीच्या तीन हिंदी किंवा मराठी चित्रपट गीतांची तयारी करून यावे. प्राथमिक फेरीत परीक्षकांनी सुचविलेल्या गीताचा मुखडा आणि एक अंतरा सादर करावा लागणार आहे. स्पर्धेसाठी नावनोंदणीची अंतिम तारीख १ ऑगस्ट असून, इच्छुकांनी वेळेत नोंदणी



करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

यंदाच्या स्पर्धेसाठी एकूण ७९ हजार रुपयांची रोख पारितोषिके, सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक २१,००१ रुपये, द्वितीय १५,००१ रुपये, तृतीय १०,००१ रुपये, चतुर्थ ७,००१ रुपये आणि पाचवे ५,००१ रुपये असे पारितोषिकांचे स्वरूप आहे. ही पारितोषिके विविध मान्यवरांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या कुटुंबीय व संस्थांच्या वतीने प्रदान करण्यात येणार आहेत. याशिवाय, प्रत्येकी २,१०१ रुपयांची दहा प्रोत्साहनपर पारितोषिकेही विविध दाते व संस्थांच्या सहकार्याने देण्यात येणार आहेत. त्यामुळे नवोदित गायक-गायिकांना आपली कला सादर करण्याची आणि आकर्षक पारितोषिके जिंकण्याची संधी उपलब्ध झाली आहे. स्पर्धेची प्राथमिक फेरी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत, तर अंतिम फेरी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत होणार आहे. स्पर्धेविषयी अधिक माहितीकरिता स्पर्धा प्रमुख दिलीप मेणे किंवा सचिव प्रभाकर उगेमुगे यांच्याशी संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळविले आहे. विदर्भातील नवोदित व गुणवंत गायक-गायिकांना आपल्या गायनकलेला मंच मिळावा, या उद्देशाने आयोजित करण्यात येणाऱ्या या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन साहित्य कला शोधक मंचाच्या वतीने करण्यात आले आहे.

## तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**वर्धा-**नालवाडी येथील पाटील नगर परिसरात राहणाऱ्या धीरज सुधाकर चाफले (वय ३८) यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. कुटुंबीयांना ही बाब लक्षात येताच त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. घटनास्थळी दाखल झालेल्या रामनगर पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिस विविध अंगांनी तपास करीत आहेत. या प्रकरणी रामनगर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून तपास सुरू आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २४२**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# कठोरा नाका येथे ट्रकचा कहर

## २ ते ३ दुचाकींना धडक, चालकाला नागरिकांचा चोप

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील कठोरा नाका परिसरात मंगळवारी सायंकाळी सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास धान्य वितरण करणाऱ्या ट्रकने दोन ते तीन दुचाकींना धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात काही जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती असून नेमकी जखमींची संख्या अद्याप स्पष्ट झालेली नाही. अपघातानंतर ट्रक चालकाने घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप स्थानिकांनी केला. मात्र, संतप्त नागरिकांनी ट्रक अडवून चालकाला पकडले. चालक मद्यधुंद अवस्थेत असल्याचा दावा उपस्थित नागरिकांनी केला असून, त्यानंतर संतप्त जमावाने चालकाला चोप दिला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे. या अपघातामुळे कठोरा नाका परिसरात काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्क:**
९४२२८५७१६९,
९४२२९१८५६९

# गुरुपौर्णिमा : आत्मोन्नती ते समाजोन्नती

**'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः । गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः '**

भारतीय संस्कृतीने गुरूला केवळ ज्ञानदाता मानले नाही, तर जीवनाला दिशा देणारा प्रकाशस्तंभ मानला आहे. गुरुपौर्णिमा हा फक्त गुरूंना वंदन करण्याचा दिवस नाही; तो आत्मपरीक्षणाचा, कृतज्ञतेचा आणि गुरूंनी दाखविलेल्या मार्गावर चालण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. पूजनाने गुरूंचा सन्मान होतो; परंतु त्यांच्या विचारांचे आचरण झाले, तरच गुरुतत्त्वाचे खरे पूजन घडते.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानाची दारे खुली केली, संत तुकारामांनी भक्तीला लोकभाषेचे सामर्थ्य दिले, समर्थ रामदासांनी कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा दिली, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामविकासाचा मंत्र दिला आणि संत गाडगेबाबांनी स्वच्छता, सेवा व समाजप्रबोधनाची वाट दाखविली. या तेजस्वी संतपरंपरेत वं. श्री संत अच्युत महाराज यांनी अध्यात्म आणि समाजसेवा यांचा सुंदर संगम घडविला. त्यांचा जीवनमंत्र होता- 'आत्मोद्धारातून लोकोद्धार.'

संत अच्युत महाराजांनी आपल्या प्रत्येक कृतीतून सेवा हीच साधना असल्याचे दाखवून दिले. 'समाजसेवा हीच ईशसेवा', 'उणे दिसे ते पूर्ण करी' आणि 'न जाई रीता एक क्षणही फुकाचा' ही त्यांची वचने आजही प्रत्येकाला विचार करायला भाग पाडतात. दुसऱ्यांच्या उणिवा शोधण्याऐवजी त्यांना उभे करण्याची वृत्ती, वेळेचा सदुपयोग आणि प्रत्येक जीवाब?द्दल करुणा ही त्यांच्या जीवनाची खरी ओळख होती.



त्यांच्या प्रार्थनांत अध्यात्माबरोबरच समाजजीवनाची स्पष्ट दिशा होती. लोकशिक्षण, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक ऐक्य, व्यसनमुक्ती, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा यांचा त्यांनी सातत्याने पुरस्कार केला. गावोगावी अनेक दशके केलेल्या त्यांच्या प्रबोधनाने हजारो कुटुंबांच्या विचारविश्वात सकारात्मक परिवर्तन घडविले.

महापुरुषांचे विचार समाजात जिवंत राहतात ते त्यांच्या कार्यातून. संत अच्युत महाराजांच्या करुणामय जीवनदृष्टीतून प्रेरणा घेऊन उभे राहिलेले श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल हे त्याचे जिवंत उदाहरण आहे. सामान्य माणसालाही अत्याधुनिक हृदयरोग उपचार उपलब्ध व्हावेत, या ध्येयातून सुरु झालेली ही सेवा आज हजारो रुग्णांसाठी आशेचा किरण ठरली आहे. हे रुग्णालय म्हणजे केवळ वैद्यकीय सेवा नव्हे, तर करुणा, समर्पण आणि मानवतेचा अखंड प्रवाह आहे.

आज कृत्रिम बुद्धिमता, तंत्रज्ञान आणि वेगवान जीवनशैलीच्या युगात माहिती सहज उपलब्ध आहे; परंतु विवेक, संस्कार, संवेदनशीलता आणि माणुसकी यांची जोपासना अधिक आवश्यक बनली आहे. अशा काळात संत अच्युत महाराजांचे विचार अधिकच समर्पक वाटतात. ते आपल्याला सांगतात की समाजाची उन्नती ही प्रत्येक व्यक्तीच्या चारित्र्य, सेवा आणि कर्तव्यभावनेतूनच घडते.

गुरुपौर्णिमा हा केवळ स्मरणाचा दिवस नाही; तो संकल्पाचा दिवस आहे. गुरूंना हार-फुले अर्पण तर करावेच आणि त्याचबरोबर त्यांच्या एका तरी विचाराचे आपल्या जीवनात रोपण करणे खूप महत्त्वाचे आहे. आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहणे, समाजासाठी काहीतरी देणे, गरजूंच्या पाठीशी उभे राहणे आणि 'उणे दिसे ते पूर्ण करी' या भावनेने जगणे- हीच गुरुपौर्णिमेची खरी साधना आणि सद्गुरूंना अर्पण केलेली सर्वोत्तम गुरुदक्षिणा ठरेल.

'थोर महात्मे होऊन गेले, चरित्र त्यांचे पहा जरा; आपण त्यांच्या समान व्हावे, हाच सापडे बोध खरा.'

**-प्रा सागर पासेबंद**
**९४२३०५३१३७**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.३४५/२०२६ ने.ता.२४.०८.२०२६

**अर्जदार ः**
१. **विद्या विजयपंत दाते,** वय ५४ वर्षे, व्यवसाय - घरकाम, रा. लोखंडीपुरा करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. **उषा विलासराव आढे,** वय ५३ वर्षे, व्यवसाय - घरकाम, रा. गांधी चौक, आष्टी, ता.जि.वर्धा
३. **अनिल हरिचंद्र नवलकर,** वय ४९ वर्षे, व्यवसाय - मजुरी, रा. तळेगाव मोहना,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. **मालाताई मधुकर राऊत,** वय ५२ वर्षे, व्यवसाय - घरकाम, रा. नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती
५. **संगिता भारत खटाळे,** वय ४७ वर्षे, व्यवसाय - घरकाम, रा. प्रल्हादपुर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
६. **सुनिल हरिचंद्र नवलकर,** वय ४६ वर्षे, व्यवसाय - मजुरी, रा. तळेगाव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक हरीचंद्र रामचंद्र नवलकर यांचा मृत्यू दि.२७/१०/२०१९** रोजी तसेच **मृतक शांताबाई हरिचंद्र नवलकर** हिचा **मृत्यू दि.१७/०९/२०२२** रोजी रा.तळेगाव मोहना,ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथे झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदारांना मय्यतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे.त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३४५/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२१.०७.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,चांदूर बाजार

---

## सार्वजनिक जाहीर नोटीस / जाहीर सुचना

सर्व जनतेस या सार्वजनिक जाहीर नोटीसीने सुचित करण्यात येते की,

१) श्री.राजू उर्फ राजेंद्र माणिकराव नांदुरकर, वय अंदाजे ७० वर्षे, रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती हे दिनांक १६.०२.१९९५ पासून बेपत्ता आहेत. ते आमच्या राहत्या घरातून बाहेर गेल्यानंतर आजपर्यंत परत आलेले नाहीत. त्यांचा आजपर्यंत कोणताही ठावठिकाणा उपलब्ध झालेला नाही.

२) त्या काळी कुटुंबिय, नातेवाईक, मित्र परिवार तसेच गावातील नागरिकांच्या मदतीने अनेक वर्षे शोध घेण्यात आला परंतु कोणतीही विश्वसनीय माहिती मिळालेली नाही.

३) सध्या माझ्या पतीस कायदेशीररित्या मृत घोषित करण्यासाठी मा.दिवाणी न्यायालयात दावा दाखल करावयाचा आहे.

४) त्यामुळे जर कोणत्याही व्यक्तिस श्री.राजू उर्फ राजेंद्र माणिकराव नांदुरकर हे जीवंत असल्याचे अथवा त्यांच्या सध्याच्या वास्तव्याची कोणतीही विश्श्वसनीस माहिती असेल तर कृपया ही सूचना प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खालील पत्त्यावर किंवा चांदूर बाजार न्यायालयात लेखी स्वरुपात कळवावे.

**नांव -** वंदना राजू उर्फ राजेंद्र नांदुरकर
रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
मो.९५२७९१९२५५

निर्धारित कालावधीत कोणतीही हरकत अथवा माहिती प्राप्त न झाल्यास, उपलब्ध पुराव्यांच्या आधारे पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

स्थळ - ब्राम्हणवाडा थडी.
दि.२९.०७.२०२६

सही/-
(ॲड.आर.एल.तायडे)
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चांदूर बाजार
मो.९१५८१५५०००

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४३८/२०२६
**वृंदा व तीन -वि- निरंक**
पुढील ता.२१.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Vrunda Nandkumar Khode, Age 76 Yrs. Occu.: Household, R/o 302, Nandanwan Colony, Behind Balaji Mangal Karyalay, Amravati
2. Sau.Shubhangi Ranjit Thete (After Marriage) Shubhangi Nandkumar Khode, Age 51 Yrs. Occu.: Household, R/o C/o Ranjit Thete, 126, New Prabhat Colony, Rukhmini Nagar, Amt.
3. Shrikant Nandkumar Khode, Age 49 Yrs. Occu.: Service, R/o Ashirwad Bhavan, Civil Line, Chandrapur, Tq. Dist. Chandrapur
4. Sandeep Nandkumar Khode, Age 47 Yrs. Occu.: Service, R/o 302, Nandanwan Colony, Behind Balaji Mangal Karlaya, Amravati, IInd Address Ashirwad Bhavan Civil Line, Chandrapur, Tq. Dist. Chandrapur

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Nandkumar Rajaramji Khode हे दिनांक 28.11.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Vrunda Nandkumar Khode+3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Vrunda Nandkumar Khode+3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२३.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३२१**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे **संदीप पांडुरंग ताटेवार, रा. अमरावती** यांनी **मीना मधुकर मेश्राम, ३.सुरश्री अभिनव कॉलनी, शेगाव रोड, अमरावती, ता.व जि.अमरावती** यांच्याशी त्यांनी दिनांक २७/१२/२००१ रोजीचे अनु.दस्त क्र.६९५१/२००१ नुसार खरेदी केलेली व त्यांच्या मालकीची व ताब्यातील खालील वर्णित स्थावर मालमत्ता (प्लॉट) विकत घेण्याचा सौदा कायम करीत आहे.

**स्थावर मालमत्ता (प्लॉटचे) वर्णन ः-** नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर वि.कचेरीचे कक्षेतील व अमरावती महानगरपालिकेच्या हददीतील मौजे रहाटगांव, प्र.नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती येथील शेत सनं. १२९/१ व १२९/ड मधील मंजुर नियोजित श्रीराम कृष्ण गृह निर्माण संस्था या नावांनी ओळखल्या जाणारे लेआउट मधील **प्लॉट क्र.१७ (सतरा)** (गाव नमुना सात प्रमाणे भूमापन क्र. व प्लॉट क्र.१२९/१२९/१/१/ड/१७) याची साईज १५.२५ मि.**X** १२.७५ मि.एकूण क्षेत्रफळ १९२.८४ चौ.मी. (चौ.फुट २०७४) असून याची चतुःसिमा ः- **पुर्वेस - लेआउट मधील रोड, पश्चिमेस -खुला प्लॉट, उत्तरेस - प्लॉट नं.१८, दक्षिणेस- प्लॉट नं.१६**

त्याअर्थी वरील वर्णित मालमत्तेबाबत कोणाचाही गहाण, बोझा, तारण, सावकारी व्यवहार, वारसा हक्क व इतर अधिकार जे कायदेशिररित्या अडथळा करतील असे व्यवहार असल्यास त्यांनी नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आंत कागदोपत्री पुराव्यासह कळवावे, अन्यथा कोणालाही कुठल्याही प्रकारची हरकत/तक्रार नाही असे समजून सौदा करण्यात येईल व त्यानंतर वरील सर्व प्रकारचे व्यवहार आमच्यावर बंधनकारक राहणार नाही. तथा आमचे पक्षकार सदर मिळकतीचे खरेदीखत करुन घेतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा कसलाही उजार/अधिकार/हक्क/तक्रार इत्यादी चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

करिता ही नोटीस जाहीर करत आहे.

**ठिकाण ः अमरावती**
**दिनांक ः २७/०७/२०२६**

**सही /-**
**ॲडव्होकेट निलेश ज.पुंड**
१०२, गजानन अपार्टमेंट, मोहन कॉलनी,
अर्जुन नगर, अमरावती
**मो.-८४२१७२२१११**

---

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी माझे पक्षकार नामे **श्री गोपाळ गजानन आडे** यांचे वतीने सदरची जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन ः- मौजे-पेठ अमरावती,प्रगणे-बडनेरा,शेत सर्वे क्र.53/2 ऑनलाईन सातबारा नुसार सर्वे क्र.53/2/T/1 याचे एकुण क्षेत्रफळ 750 चौ.फुट, ता.आणि जिल्हा अमरावती**

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **श्री गोपाळ गजानन आडे** यांच्या मालकीची आहे. तद्नंतर, त्यांनी **JMFHIL JM FINANCIAL HOME LOANS LIMITED येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता सदर मिळकतीचे पूर्वीचे मुळ खरेदी खत ज्याचे १) दि.१४/११/२००३ रोजीचे दस्त क्र.२७१५ आणि २) मुळ खरेदी खत ज्याचे दि.२१/०२/२००४ रोजीचे दस्त क्र.३९४ हे दोन्ही मूळ दस्त गहाळ झालेले आहे.** तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहाण/ राष्ट्रीयकृत / खाजगी /पतसंस्था/ सहकारी /इतर बॅंक बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी अथवा वारसा हक्क, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मो.क्र. वर ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या **७ (सात) दिवसाच्या** आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राहय धरल्या जाणार नाही. आणि सदर मालमत्ता **KISETSU SAISON FINANCE (INDIA) PVT. LTD.** येथे गहाण करण्यात येईल करिता ही जाहीर सूचना.

**ठिकाण -तालुका अमरावती , जिल्हा अमरावती**
**दि.२८/०७/२०२६**

**-आपला-**
**ADVOCATE**
**रविंद्र रु.वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलोनी, अमरावती**
**मो.नं. ९८२३६९८७४५**

STAMP

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३५१/२०२६ ने.ता.०७.०६.२०२६

**अर्जदार ः**
१. सौ.मीना राजकुमार शेळके, वय ६६ धंदा - गृहिणी
२. सुवर्णा अनंतराव कानफाडे, वय ४४ धंदा - घरकाम
३. दर्शना अमित हरणे वय ४२ धंदा - गृहिणी
४. रागिणी राजकुमार शेळके, वय ३७ धंदा - मजुरी
५. अक्षय राजकुमार शेळके, वय ३५ धंदा - मजुरी

अर्जदार नं.१, ४ व ५ रा.शिवाजी नगर, चांदूर बाजार, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.२ रा.शिवशंकर नगर, अकोली रोड, अमरावती
अर्जदार नं.३ रा.सदानंद कॉलनी, साईनगर, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत राजकुमार रामकृष्ण शेळके** यांचा मृत्यू दिनांक **१०.०३.२०२६** रोजी शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता सहविद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३५१/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२३.०७.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

## जाहीर सुचना

सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **श्री.धर्मराज योगीराज परळीकर** रा.मंगरुळ चवाळा, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती यांचे मालकीचे व ताब्यातील खालील वर्णन केलेली शेत जमिनीची ईसारचिठ्ठी (सौदेपत्र) दिनांक ०४.०७.२०२६ रोजी केले आहे. त्या मिळकतीवर श्री.धर्मराज योगीराज परळीकर यांचा एकमेव कायदेशीर मालकी हक्क व ताबा आहे, त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे--

**मिळकतीचे वर्णन -** नोंदणी पोट तुकडी नांदगांव खंडेश्वर कचेरीचे कक्षेतील व जिल्हा परिषद अमरावतीचे हद्दीतील मौजे गावनेर तळेगांव, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती येथील भूमापन क्रमांक व उपविभाग १२८, भोगवटदार वर्ग-१, क्षेत्रफळ १ हे.१९ आर + पोटखराब ० हे.१० आर, असे एकुण १ हे.२९ आर, आकार रु.१.६० पैसे, या मिळकतीची चतुःसिमा खालीलप्रामणे आहे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | अमरावती ते यवतमाळ रोड |
| पश्चिमेस | - | राजू देशमुख यांचे शेत |
| उत्तरेस | - | विट भट्टी असलेले शेत |
| दक्षिणेस | - | गुलवाडे यांचे शेत |

वरील वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचे कोणतेही मालकी हक्क, चार्ज, हितसंबंध, सहकारी/राष्ट्रीयकृत/वित्त संस्थेचे/सावकारी कर्ज, गहाण, बोझा, वारस हक्क, ताबा, कर्ज, इजमेंटरी हक्क, दान, खरेदी, लीज, अटॅचमेंट, रिझर्वेशन, एक्विझिशन, कूळ वहिवाट, चोळी-बांगडी वगैरे कोणत्याही प्रकारचा बोझा अथवा अन्य कोणतेही अधिकार असल्यास किंवा सरकारी बॅंक, सहकारी संस्था, निमसरकारी अथवा खाजगी कर्ज असल्यास त्यांनी ही सुचना प्रेषित झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कागदपत्रे व पुराव्यासह लेखी हरकत घ्यावी. जर वरील मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार/हरकत आली नाही तर आमचे पक्षकार वर नमुद मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार, वाद ऐकला जाणार नाही, त्याचप्रमाणे नंतर कोणाचेही कोणतेही उजर चालणार नाही.

अमरावती
**दिनांक २९.०७.२०२६**

(ॲड.आर.बी.अग्रवाल)
सी-११०, डायमंड बिल्डींग
राज टाऊनशिप, जुनी वस्ती
बडनेरा, अमरावती
मो.९७६६३१९३३४

---

महाराष्ट्र शासन

## तहसिलदार, चांदुर बाजार यांचे कार्यालय

**(जन्म मृत्यू प्रमाणपत्र शाखा)**

**Email-tah.chandurbz@gmail.com**

**क्र./स.म.अ./कावी ४५३/२०२६** **दिनांक २३/०७/२०२६**

**जाहीरनामा**

**अर्जदार ः- वासुदेव सीताराम मोहने, रा.तोडगाव, ता. चांदूर बाजार, जि.अमरावती**

**-विरुध्द -**

**गैरअर्जदार ः- निबंधक जन्म मृत्यू नोदणी तथा ग्रामपंचायत तोंडगाव, ता.चांदूर बाजार, जि. अमरावती**

याव्दारे गावातील सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **वासुदेव सीताराम मोहने,रा. तोंडगाव, ता. चांदूर बाजार, जि.अमरावती यांनी स्वतः मृत्यू तारीख १६.०६.२०१८** चा राहत्या घरी झाला. परंतु त्यांचे मृत्यूची कार्यालय ग्रामपंचायत तोंडगाव, ता.चांदूर बाजार जि.अमरावती येथे नोद करण्यात आली नाही. मृत्यूची नोंद जन्म मृत्यू कार्यालय ग्रामपंचायत तोंडगाव,पंचायत समिती चांदुर बाजार जि.अमरावती हददीमध्ये झालेला असल्यामुळे जन्म नोदणी करण्याबाबतचा अर्ज व ग्रामपंचायत **तोंडगाव** यांचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल केलेला आहे.

वरील जन्माची नोंद करुन देण्यास कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस कोणाला काही आक्षेप अथवा हरकती असतील तर त्यांनी जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आंत आपला आक्षेप अथवा हरकती लेख स्वरुपात या कार्यालयामध्ये दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेला आक्षेप अथवा हरकती ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. सदर जाहीरनामा आज दिनांक २३.०७.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी प्रसिध्दी करण्यात येत आहे.

शिक्का

**सही /-**
**तहसिलदार,**
**तथा तालुका दंडाधिकारी**
**चांदूर बाजार**

---

## जाहीर नोटीस

प्रो.नं.१५५१/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.२९.०६.२०२६

**वि.सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय**

**किरकोळ अर्ज क्र.२६२/२०२६** **दिनांक २७.०७.२०२६**

**अर्जदार -**
१. **धर्मराज भिमराव उर्फ भिमाशंकर टापरे,** वय ५८ वर्षे, धंदा - शेती, रा.थिलोरी, ता.दर्यापूर, जि.अमरावती
२. **मंदा गणेश घोडे,** वय ६३ वर्षे, धंदा - घरकाम, रा.आतापाता, ता.जि.अकोला

--- विरुध्द ---

**गैरअर्जदार-** निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **भिमाशंकर रतिराम टापरे** हे दिनांक ०८.११.२००२ रोजी मरण पावलेले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** ः- **मयत भिमाशंकर रतिराम टापरे** यांचे नावे मौजा थिलोरी, ता.दर्यापूर, जि.अमावती येथील नगर भूमापन क्र.५९४, शिट नं.३,प्लॉट नं.५९४, क्षेत्रफळ १२५.८० चौ.मि.येणेप्रमाणे मिळकत आहे. सदर मिळकतीची बाजारभाव किंमत ५०,०००/- रु.आहे.

आज दि.२९.०६.२०२६रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहा.अधीक्षक (प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र४९६/२०२६ ने.ता.०१.०९.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.धनराज उर्फ भोजराज माणिकराव लुंगे, वय ६६ वर्षे, धंदा - शेती
२. श्री.दिवाकर माणिकराव लुंगे, वय ६१ वर्षे, धंदा - शेती
३. श्री.शरद माणिकराव लुंगे, वय ५८ वर्षे, धंदा - शेती
तिघेही रा.खोपडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. श्रीमती मंदाताई शरदराव नागपुरे, वय ६८ वर्षे, धंदा - घरकाम, रा.खडकी, ता.आष्टी, जि.वर्धा
५. सौ.शारदा दिगंबरराव निंभोरकर, वय ६२ वर्षे, धंदा - घरकाम, रा.जामगांव (खडका) ता.वरुड, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे वडील **नामे माणिकराव भिमराव लुंगे** हे दि.**२५.१२.२०१३** रोजी त्यांचे राहते घरी, **खोपडा,**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदाराची आई **नामे अनुसया माणिकराव लुंगे** ही दिनांक **०३.०९.१९७०** रोजी खोपडा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झाली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २८.०७.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४२६/२०२६
**शितल व तीन -वि- निरंक**
पुढील ता.२१.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Shital Milind Lad, Age 37 Yrs. Occu.: Household
2. Maithili Milind Lad (Minor)
3. Ojaswi Milind Lad (Minor), Age 13 Yrs. Occu.: Education
4. Rabhav Milind Lad (Minor), Age 01 Yrs. Occu.: Nil

All R/o Bari pura, Juni Wasti, Badnera, Tq. Dist. Amravati
Appli.No.2 to 4 through their natural guardian Mother i.e.Appli.No.1

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Milind Murlidharrao Lad हे दिनांक 24.09.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Shital Milind Lad+3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Shital Milind Lad+3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२३.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस

प्रो.नं.४८९/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.२३.०६.२०२६

**वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय**

**किरकोळ अर्ज क्र.२३३/२०२६** **दिनांक २७.०७.२०२६**

**अर्जदार -**
१. **मुक्ता विवेकराव फुके,** वय ४२ वर्षे, धंदा - घरकाम व शेती, रा.जैनपुर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

--- विरुध्द ---

**गैरअर्जदार-**
१. **प्रभा अनंतराव गावंडे,** वय ७५ वर्षे, धंदा - शेती
२. **मुकेश अनंत गावंडे,** वय ४३ वर्षे, धंदा - शेती
३. **निलेश अनंत गावंडे,** वय ३२ वर्षे, धंदा - शेती
गै.अ.क्र.१ ते ३ रा.पिंगळोद, ता.दर्यापूर, जि.अमरावती
४. **मजुताई सुभाषराव गोंडचोर,** वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम व शेती, रा.वडनेर गंगाई, ता.दर्यापूर, जि.अमरावती

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **अनंत माधवराव गावंडे** हे दिनांक ०३.०४.२०२५ रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदार व गैरअर्जदार यांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२३.०६.२०२६रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहा.अधीक्षक (प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर**

---

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर सुचनेद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **शेखर रमेशराव देशपांडे,** रा.रतन भवन, जुना सराफा, अमरावती, ता.जि.अमरावती यांचे मालकीची व ताब्यातील खालील वर्णन केलेली मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केला असून लवकरच खरेदीखत करुन घेणार आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर वि.कचेरीचे कक्षेतील व अमरावती मनपा च्या हद्दीतील मौजे पेठ अमरावती, प्रगणे बडनेरा, ता.जि.अमरावती येथील नझूल शिट नं.९२-सी, नगर भूमापन क्र.२३६ याचे एकुण क्षेत्रफळ १५२.६० चौ.मी. आहे. यापैकी उत्तर-दक्षिण वाटणीचा पश्चिमेकडील भाग याचे क्षेत्रफळ ७६.३२ चौ.मी. (८२१.५० चौ.फुट) यावर आरसीसी कॉलम पध्दतीचे वर छत स्लॅबचे असलेले दोन मजली मकान यात तळ मजल्यावर तीन रुम, संडास-बाथरुम व पहिल्या मजल्यावर तीन रुम, बांधकामाचे एकुण क्षेत्रफळ ७६.२२ चौ.मी. (८२१.५० चौ.फुट) याचा वार्ड क्र.३६ असून मालमत्ता क्र.६६ आहे. नळ कनेक्शन, इलेक्ट्रिक फिटींगसह व इले.मिटरसह याची चतुःसिमा खालीलप्रमाणे--

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | रमेश जैन यांचे मकान |
| पश्चिमेस | - | चव्हाण यांचे घर |
| उत्तरेस | - | धरमकर यांचे मकान |
| दक्षिणेस | - | सरकारी रस्ता |

वरील वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचे कोणतेही हितसंबंध, सहकारी/राष्ट्रीयकृत/वित्त संस्थेचे/सावकारी कर्ज, गहाण, बोझा, वारस हक्क, ताबा, कर्ज, इजमेंटरी हक्क, दान, खरेदी, लीज, अटॅचमेंट, रिझर्वेशन, एक्विझिशन, कूळ वहिवाट, चोळी-बांगडी वगैरे कोणत्याही प्रकारचा बोझा अथवा अन्य कोणतेही अधिकार असल्यास किंवा सरकारी बॅंक, सहकारी संस्था, निमसरकारी अथवा खाजगी कर्ज असल्यास त्यांनी ही सुचना प्रेषित झाल्यापासून ५ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कागदपत्रे व पुराव्यासह लेखी हरकत घ्यावी. जर वरील मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार/हरकत आली नाही तर आमचे पक्षकार वर नमुद मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत/तक्रार, वाद ऐकला जाणार नाही, त्याचप्रमाणे नंतर कोणाचेही कोणतेही उजर चालणार नाही.

अमरावती
**दिनांक २८.०७.२०२६**

(ॲड.आशिष कृ.लांडे)
नोटरी भारत सरकार
२४, प्रमोद कॉलनी, राजापेठ, अमरावती
मो.९४२१७४०२३०

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११०९/२०२६
**श्रीमती अनुसया अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२९.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Smt.Anusaya Ramcharan Pande, Age 56 Yrs. Occu.: Household
2. Anand Ramcharan Pande, Age 34 Yrs. Occu.: Service, Both R/o Lontek, Tq. Dist. Amravati
3. Sau.Ashu Girish Joshi, Age 32 Yrs. Occu.: Household, R/o Rajputpura Walgaon, Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **श्री.रामचरण गयाप्रसाद पांडे** हे दिनांक 17.12.2013 रोजी **लोणटेक, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अनुसया अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अनुसया अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 251/2026 **कलम-२२**

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **मेळघाट फाउंडेशन कुसूम कोट बु., ता.धारणी, जि.अमरावती** एफ-२५९६७
बाबत अर्जदार - **सचिन सुरेश राठोड**
गैरअर्जदार - १) आनंद ज्ञानचंद गंगराडे, २) पंकज विश्वासराव मोरे

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.


ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **१०.०७.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती विभाग, अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### कारगिल विजय दिवसानिमित्त माजी सैनिकांचा सत्कार सोहळा

**अचलपूर-**परतवाडा शहरातील गावंडे ज्वेलर्स तर्फे २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस निमित्त अंबिका लॉन येथे माजी सैनिकांचा सत्कार सोहळा संपन्न झाला.यावेळी माजी सैनिकांचा कुटुंबातील सदस्यांसह मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.यावेळी माजी सैनिक संघटनचे सुभेदार भातकुलेजी, परतवाडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजय आखरे, भाजपा पक्षाचे नेते गजानन कोल्हे,अनिल अग्रवाल,प्रमोद डेरे,श्याम मालू,बबनराव गावंडे सह आयोजक निलेश गावंडे प्रामुख्याने उपस्थितीत होते.



### आषाढी एकादशीला धार्मिक सोहळा

**अंजनगाव बारी-**येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री महारुद्र हनुमान मंदिराच्या प्रांगणात आषाढी एकादशीचा दोन दिवसीय धार्मिक उत्सव मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला.उत्सवाची सुरुवात श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात कदम परिवाराच्या हस्ते घटस्थापनेने झाली. त्यानंतर वारकरी भजनी मंडळाकडून पहाटे काकड आरती करण्यात आली. दुपारच्या सत्रात महिला भजन मंडळाने सुरेल भजनांचा कार्यक्रम सादर करून उपस्थित भाविकांना भक्तिरसात रंगविले. सायंकाळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रचारक मंडळाच्या वतीने सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली. त्यानंतर गावातील शिव राष्ट्रीय भजनी मंडळ, श्री खटेश्वर महाराज भजन मंडळ तसेच श्री गुरुदेव सेवा भजन मंडळ यांच्या भजन संमेलनाने वातावरण विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेले.या दोन दिवसीय धार्मिक सोहळ्यात गावातील महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आर्थिक मदत व सेवाभावाने योगदान दिले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त करत, असा भक्तिमय सोहळा दरवर्षी याच उत्साहात पार पडावा व विठ्ठलाच्या सेवेत सहभागी होण्याची संधी लाभत राहावी, अशी प्रार्थना श्री विठ्ठल चरणी केली.



### पायदळ पालखी दिंडीत महिलांचा सहभाग

**अंजनगाव बारी-**आषाढी एकादशी निमित्त अंजनगाव बारी येथे पारंपरिक पायदळ पालखी दिंडी मोठ्या भक्तिभावाने काढण्यात आली. दिंडीत महिलांनी पारंपरिक वेशभूषेत टाळ-मृदंगाच्या गजरात विठ्ठलनामाचा अखंड जयघोष करत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. गावातील विविध महिला भजन मंडळे, भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाल्याने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. दिंडीमध्ये लहान मुलांनी संत व देवतांची आकर्षक रूपे साकारून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. गावातील विविध चौकांमध्ये पायदळ पालखी दिंडीचे उत्साहात स्वागत करण्यात आले. ग्रामस्थांनी जागोजागी परिसराची स्वच्छता करून दिंडीचे स्वागत केले तसेच भाविकांसाठी प्रसादाचे वाटप करण्यात आले. भजन, नामस्मरण आणि विठ्ठलभक्तीच्या वातावरणात पार पडलेल्या या दिंडीने धार्मिक परंपरा,सामाजिक ऐक्य आणि सेवाभावाचे सुंदर दर्शन घडविले.

### सुधा बाभुळकर यांचे निधन



**कुऱ्हा-**येथील ह.भ.प.दादाराव महाराज ज्ञानोबाजी बाभुळकर यांच्या पत्नी सुधा दादारावजी बाभुळकर यांचे वयाच्या ८० व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुलं, दोन मुली,जावाई, स्नुषा, नातू नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे स्व.सुधा बाभुळकर यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरातील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते, यावेळी सामूहीक श्रध्दांजली वाहण्यात आली.

## १० लाख रोपट्यांची लागवड; बचावली केवळ ३ लाख!

# वनविभागाचे मुख्यालय ओसाड तर वनरक्षक बेपत्ता

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

अंजनगाव बारी परिसरातील विस्तृत वनक्षेत्रात वनसंवर्धन व पर्यावरण संरक्षणाच्या नावाखाली गेल्या पाच वर्षांत तब्बल १० लाख रोपट्यांची लागवड करण्यात आल्याचा दावा वनविभागाकडून करण्यात आला आहे. मात्र लागवडीनंतर रोपट्यांच्या संगोपनाकडे आवश्यक ते लक्ष न दिल्याने सुमारे ७ लाख रोपटे मृत्युमुखी पडली, तर केवळ ३ लाख रोपटेच शिल्लक राहिल्याचा आरोप होत आहे. या प्रकारामुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या निधीचा अपव्यय झाल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.



प्रस्तुत वनपरिक्षेत्रात सुमारे २२ गावांचा समावेश असून वनसंवर्धनासाठी भव्य नर्सरीचीही स्थापना करण्यात आली आहे. याच नर्सरीतून विविध प्रजातींच्या रोपट्यांची लागवड करण्यात आली. मात्र लागवडीनंतर नियमित पाणी, देखभाल व संरक्षणाची व्यवस्था प्रभावीपणे न झाल्याने मोठ्या प्रमाणावर रोपटे नष्ट झाली. टँकरद्वारे पाणीपुरवठा व देखभालीसाठी खर्च झाल्याचे दाखविण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात रोपट्यांना आवश्यक सुविधा मिळाल्या नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. अंजनगाव बारी परिसरातील हजारो हेक्टर वनक्षेत्रात रोजगार हमी योजनेअंतर्गत दरवर्षी वृक्षलागवड मोहीम राबविली जाते. या वनक्षेत्रात विविध वन्यप्राण्यांचे अस्तित्व असल्यामुळे वनविभागाने विशेष दक्षता घेणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात वनाधिकारी व वनरक्षक यांच्या दुर्लक्षामुळे वनसंवर्धनावर विपरीत परिणाम होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. परिसरातील जुन्या बसस्थानकाजवळ वनविभागाचे मुख्यालय असूनही ते गेल्या तीन वर्षांपासून ओसाड पडले असल्याचे सांगितले जाते. येथे नियुक्त असलेला वनरक्षकही अनुपस्थित असल्याने वनक्षेत्राच्या देखरेखीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शासनाच्या नियमानुसार वनरक्षकाने मुख्यालयात राहून वनक्षेत्राचा कारभार पाहणे अपेक्षित असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप आहे. या सर्व बाबींची शासनाने गांभीर्याने दखल घेऊन वनक्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी करावी, नर्सरीतील रोपट्यांची स्थिती तपासावी, ओसाड पडलेल्या मुख्यालयाची चौकशी करावी तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या जबाबदारीची सखोल चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त महाआरती उत्साहात

**अमरावती-**महेंद्र कॉलनी येथील श्री पांढरी हनुमान मंदिरात शिवसेना पक्षप्रमुख श्री उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त महाआरतीचे आयोजन करण्यात आले. यावेळी परिसरातील शिवसैनिक व नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवून उद्धव ठाकरे यांना दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली.या प्रसंगी शिवसेनेचे पदाधिकारी प्रदीप बाजड,धीरज श्रीवास,पंजाबराव तायवाडे,ज्येष्ठ नागरिक विनायकराव शिसोदे, संतोषजी महाराज,



सचिन सगणे,अक्षय चरहाटे,सूरज खवले, अभिषेक नागपूर, कार्तिक रेवस्कर, रोहित जुनेवाल,गाडेकर काका, सजण वानखेडे तसेच प्रभाग क्रमांक ५ मधील अनेक शिवसैनिक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.महाआरतीनंतर उपस्थितांनी उद्धवजी ठाकरे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या दीर्घायुष्याच्या शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रम भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## कमलाबाई टावरी इंग्लिश स्कूलमध्ये आषाढी एकादशी वारी उपक्रम

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

चांदूर रेल्वे तालुक्यातील श्रीमती कमलाबाई टावरी इंग्लिश स्कूल,घुईखेड येथे आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त वारी दिंडी उपक्रम मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या उपक्रमात पूर्व प्राथमिक विभागातील नर्सरी,के.जी.-१आणि के.जी.-२ च्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उपस्थितांची मने जिंकली.

आषाढी एकादशीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व विद्यार्थ्यांना लहान वयातच समजावे, तसेच संत परंपरेचे संस्कार त्यांच्या मनावर रुजावेत या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांचा पारंपरिक वेश परिधान करून टाळ, मृदुंग, भगवे ध्वज, तुळशी वृंदावन आणि विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमांसह दिंडीत सहभाग घेतला.'ज्ञानोबा-तुकाराम','पांडुरंग हरी','विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' अशा गजराने संपूर्ण शाळा परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. चिमुकल्या विद्यार्थ्यांचा निरागस उत्साह, आकर्षक वेशभूषा आणि शिस्तबद्ध दिंडीने पालकांसह उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

या यशस्वी उपक्रमाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश मिरासे, उपमुख्याध्यापक शरद वानखेडे,सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शाळेचे संस्थापक कृष्णकुमार टावरी यांनी अशा सांस्कृतिक व संस्कारक्षम उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे सांगून सर्व विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.




## एडिफाय विद्यालयात मुलींचे आरोग्य, सुरक्षा व जागृती सत्राचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक एडिफाय विद्यालयात इयत्ता ६ वी ते इयत्ता १० वीच्या विद्यार्थिनींसाठी 'मुलींचे आरोग्य व सुरक्षा सक्षम करणे' या विषयावर एक विशेष जागृती सत्र आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थिनींना शारीरिक व मानसिक आरोग्य, स्वच्छता, पोषण तसेच आत्मविश्वासाच्या महत्त्वाबाबत जागरूक करणे हा होता.कार्यक्रमात मासिक पाळी स्वच्छता, संतुलित आहार, मानसिक आरोग्य, आत्मसंरक्षण तसेच शिक्षणाच्या महत्त्वावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे दुर्गा लक्ष्मी यांनी योग्य आहाराची गरज समजावून सांगितली.



तसेच डॉ. संगीता गावंडे यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले की स्वतःची क्षमता ओळखून पुढे गेल्यास अशक्य वाटणारे कार्यही शक्य होते. त्याचप्रमाणे इयत्ता ३री ते इयत्ता ५ वीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रज्ञा जोशी तसेच दीपाली गायकवाड यांनी घेतलेल्या सत्रादरम्यान शिक्षकांनी गुड टच आणि बॅड टच ओळखणे, वैयक्तिक सुरक्षा, अयोग्य वर्तनाच्या परिस्थितीत त्वरित विश्वासू पालक, शिक्षक किंवा संबंधित अधिकाऱ्याला माहिती देणे तसेच स्वतःच्या सुरक्षिततेबाबत सतर्क राहण्याचा सल्ला दिला. तसेच विद्यार्थ्यांसाठी सुरेश तसेच अब्दुल सलीम यांनी रोजगारासंबंधी मार्गदर्शन, जीवनासाठी शिस्त आवश्यक इत्यादी विषयांवर चर्चा करून त्यांच्या शंकांचे निरसन केले.

शेवटी विद्यालयाचे मुख्याध्यापक आदरणीय जी. गोपीनाथ यांनी सांगितले की अशा जागृती कार्यक्रमांमुळे विद्यार्थिनींना आत्मनिर्भर, जागरूक आणि आत्मविश्वासी बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली जाते.

हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारत मोंढे, अंकिता कपड़िया, ईशान कपड़िया, विद्या तिखले, नीलिमा बाफणा, आनंद उइके, भूषण वानखडे, स्नेहल, हर्षाली, कल्याणी देशमुख इत्यादींनी आपले योगदान दिले. या प्रसंगी संस्थेच्या संचालिका आदरणीय पल्लवी चकिलाला, संचालक आदरणीय शिवारामाकृष्णा, संस्थेचे संचालक आदरणीय रवी इंगळे यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

## नीमा अमरावतीच्या सीएमइमध्ये डॉ.आशिष डगवार यांचे मार्गदर्शन

**अमरावती/का.प्र.**

नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (NIMA) अमरावतीच्या वतीने हॉटेल ग्रेस इन, राजापेठ येथे वैद्यकीय क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाच्या विषयावर सतत वैद्यकीय शिक्षण (CME) कार्यक्रम उत्साहात पार पडला.या कार्यक्रमात सुप्रसिद्ध लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ. आशिष डगवार यांनी 'सामान्य व्यवहारात तीव्र पोटात दुखण्याचा दृष्टीकोन-लवकर निदान आणि वेळेवर रेफरल'या विषयावर सखोल व मार्गदर्शक व्याख्यान दिले. आपल्या व्याख्यानात डॉ. डगवार यांनी सामान्य वैद्यकीय व्यवहारात येणाऱ्या तीव्र पोटदुखीच्या रुग्णांचे मूल्यमापन करताना घ्यावयाची काळजी, धोक्याची लक्षणे ओळखणे,योग्य वेळी आवश्यक तपासण्या करणे आणि रुग्णाला तज्ज्ञांकडे वेळेवर रेफर करण्याचे महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली. उपस्थित डॉक्टरांनी या व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध शंकांचे निरसन करून चर्चेत सहभाग घेतला.

यावेळी मंचावर निमा अध्यक्ष डॉ प्रवीण औगड (अध्यक्ष निमा अमरावती) डॉ. विजय अजमिरे (सहसचिव, निमा सेंट्रल कौन्सिल,नवी दिल्ली),डॉ.



अनिल बाजारे (माजी सरचिटणीस, निमा महाराष्ट्र तथा सह-अध्यक्ष, कुटुंब कल्याण समिती, निमा सेंट्रल कौन्सिल, नवी दिल्ली), डॉ. कमल राऊत (समन्वयक, निमा सेंट्रल कौन्सिल), डॉ. आशिष येवतीकर (समन्वयक, निमा महाराष्ट्र), आणि डॉ. उन्मेष डालके (अध्यक्ष, आयुर्वेद फोरम, अमरावती) यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी वैद्यकीय क्षेत्रात अद्ययावत ज्ञान आत्मसात करण्यासाठी अशा CME कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रकल्प संचालक डॉ. राजेंद्र भामकर यांनी उत्कृष्ट नियोजन करून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.कार्यक्रमाचे संचालन डॉक्टर वैष्णवी झोड यांनी केले. तर वक्तांचा परिचय डॉ. सुषमा मेश्राम यांनी वाचून दाखविला.उपस्थित डॉक्टरांनी या शैक्षणिक सत्राचा लाभ घेतल्याबद्दल डॉक्टर नितीन नांदरधने आयोजकांचे आभार मानले. शेवटी NIMA अमरावतीच्या वतीने सर्व मान्यवर, वक्ते, प्रायोजक तसेच उपस्थित सदस्यांचे आभार मानण्यात आले. वैद्यकीय ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी आणि रुग्णसेवा अधिक सक्षम करण्यासाठी भविष्यातही अशाच दर्जेदार शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## अंध विद्यालयात रंगला 'संगीत संध्या' कार्यक्रम; हिरक महोत्सवानिमित्त सुरेल सादरीकरण

**अमरावती-** येथील 'द ब्लाईंड वेलफेअर असोसिएशन' संचलित डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय व आश्रित अंध कर्मशाळा अमरावती यांच्या वतीने आयोजित हिरक महोत्सवानिमित्त आज, दि.२५ जुलै २०२६ रोजी अंध विद्यालयात 'संगीत संध्या' हा सांस्कृतिक कार्यक्रम अत्यंत आल्हाददायक वातावरणात व उत्साहात पार पडला.



सायंकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अमरावती येथील सुप्रसिद्ध 'रघुवीर रिफ्रेशमेंट'चे संचालक मा. चंद्रकांतजी पोपट आणि मा. श्रीमती ज्योत्सनाताई शेटे यांची विशेष उपस्थिती लाभली होती. विद्यार्थ्यांच्या सुरावलींनी जिंकली रसिकांची मने. चंद्रकांत पोपट यांनी यावेळी मार्गदर्शन करित संस्थेबद्दल माहिती दिली. ज्योत्सना शेटे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. संस्थेचे अध्यक्ष प्रवीण मालपाणी, प्र.सचिव, धनंजय नाकील, कोषाध्यक्ष सुनील सरोदे, कार्यकारिणी सदस्य श्रीमती उर्मिलाबेन शाह, प्रभा झंवर, राजेश डागा, आर.टी. देशमुख, रामराव अमृते, प्रणित सोनी, मनोज साबू. शाळेचे मुख्याध्यापक नवनाथ इंगोले, कर्मशाळेचे व्यवस्थापकीय अधीक्षक पंकज मुदगल, शाळेतील शिक्षक, कर्मशाळेतील निदेशक, आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच अमरावती शहरातील नागरिक, देणगीदार या संगीत संध्येचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांच्या टाळ्यांच्या कडकडाटात आणि अत्यंत आल्हाददायक व भावुक वातावरणात या कार्यक्रमाची यशस्वी सांगता व्यवस्थापकी अधीक्षक पंकज मुदगल यांच्या सुरेल गीतावर सर्व शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी थीरकत नाचून झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीत शिक्षक महेश मैंद आणि आभार प्रदर्शन नवनाथ इंगोले यांनी केले.

## आषाढी एकादशीनिमित्त वृक्षारोपण

**तिवसा -** शहराच्या इतिहासात विठ्ठल रुख्मिनी मंदिराचे निर्माण ही अतिशय महत्वाची धार्मिक बाब आहे.लोकसहभागातून उभारल्या जात असलेल्या मंदिराला सर्वानी सहकार्य केल्यास येथे भविष्यात आषाढी एकादशीला भक्तांची मांदियाळी निर्माण होऊन पंढरपूरचे स्वरूप येईल व खऱ्या अर्थाने विठ्ठल-रुख्मिनी चे नामस्मरण व दर्शन झाल्याचे समाधान भाविकभक्तांना होईल,असे विचार शासन पुरस्कार प्राप्त पत्रकार हेमंत निखाडे यांनी केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय ग्राहक संघटनेचे तालुका अध्यक्ष गुणवंत देवतारे,मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष गुणवंत डूबे,सामाजिक कार्यकर्ते अजय गुल्हाने,अंकुश देशमुख, तेजस्विनी वानखडे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी देखील निर्माणाधिन मंदिराबाबत आपले अनमोल विचार मांडले.कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन माधुरी वानखडे यांनी केले तर प्रास्ताविक विठ्ठल राऊत यांनी केले.विठ्ठल-रुख्मिनी च्या आरती ने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.कार्यक्रमाला शिक्षक कॉलनीसह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## डॉ.राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे रोजगारक्षमता कौशल्य प्रशिक्षण

**अमरावती/का.प्र.**

अमरावती येथील डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी व महिंद्रा प्राइड क्लासरूम प्रोजेक्ट, नंदी फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यामानाने रोजगारक्षमता कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केला. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये वैयक्तिक आणि व्यावसायिक वाढीसाठी आवश्यक कौशल्य विकसित करण्यासाठी डिझाइन करण्यात आला होता.

या प्रशिक्षणाचे नेतृत्व महिंद्रा ग्रुपचे प्रशिक्षक अजिंक्य कोहले यांनी केले. त्यांनी व्यावसायिक दृष्टीकोन, बोलण्याची कला, मुलाखतीची तयारी, गट सादरीकरण, टीकात्मक विचारसरणी आणि फाइनेंसियल मैनेजमेंट यावर लक्ष केंद्रित केले. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. पी. व्ही. बुरकले, आणि अजिंक्य कोहले, प्रशिक्षक, नंदी फाउंडेशन व शिक्षक वर्ग यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी सर्व सहभागींना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले, तर प्रशिक्षणादरम्यान विशेष प्रावीण्य दाखवणाऱ्या



पाच विद्यार्थिनीना नंदी फाउंडेशनकडून ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचा समारोप बी. फार्म चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थिनी ओमश्री जोगे यांनी आभार प्रदर्शनाने केला. हा उपक्रम इंदिराबहुउदेशिया शिक्षण संस्थचे अध्यक्ष माननीय योगेंद्रजी गोडे आणि सचिव माननीय तन्वी गोडे यांच्या प्रेरणेने आणि डॉ राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी चे, प्राचार्य डॉ. पी. व्ही. बुरकले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. या संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रमाचे संयोजन महाविद्यालयाच्या आयक्यूएसी समन्वयक डॉ. स्नेहल एस. मानेकर यांनी केले होते.

# चांडक प्रकरणात नवा 'स्फोट'

# खदानच नाही... मग ब्लास्टिंगची बिले कुठून आली?

## -जिलेटीन-डिटोनेटरचा वापर नेमका झाला कुठे? -महसूल प्रशासनाच्या मौनाने संशयाला खतपाणी

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** 'सत्याला कुलूप नसते... ते एक दिवस कागदावरून बोलू लागते!' अकोट तालुक्यातील गाजीपूर-रुदाळी येथील बहुचर्चित




खाण प्रकरणात नेमके हेच घडताना दिसत आहे. दिवसागणिक समोर येणाऱ्या नव्या कागदपत्रांमुळे या अस्वस्थ करण्याची वेळ आणली आहे.

खदानच नाही... मग खडक फोडण्यासाठी लागणाऱ्या जिलेटीन-डिटोनेटरची जीएसटी बिले नेमकी कुठून आली? आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे ती स्फोटके वापरली तरी कुठे? याच प्रश्नाने आता अकोटच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. 'जनमाध्यम'च्या हाती आलेल्या काही बिलांवर 'चांडक कन्स्ट्रक्शन कंपनी' पूर्वा प्लाझा, हिवरखेड रोड असे नाव नमूद असल्याचे दिसून येते. या बिलांची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नसली, तरी संबंधित नाव आणि नमूद पत्त्यामुळे ही बिल संतोष चांडक यांच्याशी संबंधित असू शकते, अशी चर्चा सुरू आहे. जर तसे असेल, तर नावावर खदान नसताना ब्लास्टिंगसाठी लागणाऱ्या स्फोटकांची खरेदी कोणत्या कामासाठी करण्यात आली? हा प्रश्न आता टाळून चालणारा राहिलेला नाही.

या प्रकरणात सर्वाधिक खटकणारी बाब म्हणजे महसूल प्रशासनाचे सातत्याने दिसणारे मौन. एकामागून एक प्रश्न, एकामागून एक कागदपत्रे, एकामागून एक बातम्या, तरीही ठोस कारवाईचा पत्ता नाही. 'चूक नसली तर भीती कसली?' असा प्रश्न आता नागरिक उघडपणे विचारत आहेत.

आता या प्रकरणात खरा मुद्दा ४८ कोटींच्या दंडाचा राहिलेला नाही; तर शासनाच्या नाकावर टिच्चून सुरू असलेल्या कथित व्यवहारांबाबत प्रशासनाची भूमिका नेमकी काय आहे, त्यांच्याकडून होणारी पाठराखण हा आहे. कारण 'सत्याला कितीही पुरून टाकले, तरी ते पुराव्यांच्या रूपाने पुन्हा उभे राहते.'

गाजीपूर-रुदाळी प्रकरणातही आता पुरावे आधी समोर येत आहेत आणि प्रशासनाचे उत्तर मात्र नंतरही येत नाही, अशी चर्चा जिल्हाभर रंगू लागली आहे. त्यामुळे या प्रकरणाची उच्चस्तरीय, स्वतंत्र आणि बहुविभागीय चौकशी करून सर्व प्रश्नांची उत्तरे जनतेसमोर आणण्याची मागणी आता अधिक तीव्र झाली आहे.

### स्फोटकांची बिले... आणि महसूल विभागाचे 'मौनव्रत'!

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे जिलेटीन आणि डिटोनेटरसारख्या स्फोटकांच्या खरेदीची बिले. जर ही बिले खरी असतील तर स्फोटके कोणत्या खदानीत वापरली गेली? त्यासाठी आवश्यक परवानग्या होत्या का? स्फोटक नियंत्रक विभागाकडे त्याची नोंद आहे का? की या प्रश्नांची उत्तरेही कागदांच्या ढिगाऱ्याखाली गाडली जाणार? परिणामी 'मौन हेही कधी कधी संमतीचे लक्षण मानले जाते!' हेच सद्यस्थितीत चांडक प्रकरणात दिसून येत आहे.

### 'धूर उठतो म्हणजे कुठेतरी आग असतेच!'

गाजीपूर येथील गट क्रमांक २७ व ३८ वर अतिरिक्त गौण खनिज उत्खनन केल्याप्रकरणी महसूल विभागाने सुरुवातीला ६४ कोटींचा दंड ठोठावला. पुनर्मोजणीनंतर तो ४८ कोटींवर आला. एवढा प्रचंड दंड झाल्यानंतर प्रशासनाने कठोर भूमिका घेणे अपेक्षित होते; पण प्रत्यक्षात घडले ते उलटेच, अशी चर्चा आहे. अपील स्वीकारले गेले... विलंबमाफी अर्ज मंजूर झाला... नोटिसा निघाल्या... पण दंडाच्या रकमेतील एक रुपयाही भरल्याशिवाय प्रक्रिया पुढे सरकली, असा आरोप सातत्याने होत आहे. म्हणतात, 'कुंपणच शेत खाऊ लागले तर तक्रारकर्त्यांनी न्याय कुणाकडे मागायचा?' आज गाजीपूर प्रकरणात नेमका हाच प्रश्न नागरिक विचारत आहेत.

### उद्याच्या अंकात ....

### जिल्हाधिकाऱ्यांची बोळवण नेमकी झाली कशी ? अनेक प्रश्नांना खुलाश्यातून दिली बगल ?

जिल्हाधिकाऱ्यांनी खुलासा मागितल्यानंतर अकोटच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी सादर केलेला एक पानी अहवाल अनेक प्रश्न अनुत्तरित ठेवून गेला, अशी चर्चा आहे. त्यात ४८ कोटींच्या दंडवसुलीची सद्यस्थिती काय? याबाबत केवळ अपील याचिका दाखल करून घेण्यात आली असून सुनावणी घेणे सुरू असल्याचे उल्लेखित करीत केवळ कमी शब्दांत खुलासा सादर केला आहे. तर दुसरीकडे यामध्ये महसूल संहितेचे पालन झाले की नाही? कारवाईचा आराखडा कोणता? मालमत्ता शोधण्यास विलंब का? आदिवासी जमिनीवरील क्रशरला शासनाची वैध परवानगी आहे का? या कोणत्याही प्रश्नांवर स्पष्ट उत्तर नसल्याचे बोलले जात आहे. 'डोंगर पोखरला आणि उंदीर निघाला' अशीच हास्यास्पद प्रतिक्रिया या खुलाशाबाबत सुज्ञ नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

प्रकरणातील गूढ आणखी गडद होत असताना आता एक असा मुद्दा समोर आला आहे, ज्याने संपूर्ण महसूल यंत्रणेलाच

### 'मालमत्ता सापडत नाही'... आणि वृत्त छापताच सापडते?

या प्रकरणात तहसील प्रशासनाकडून मालमत्ता शोधण्यात अडचणी असल्याचे सांगण्यात आले. मात्र जनमाध्यमने संबंधित मालमत्तांची माहिती प्रसिद्ध केल्यानंतर अचानक मालमत्ता 'सापडल्याचे' चित्र उभे राहिले. मग प्रश्न असा उपस्थित होतो की, महसूल विभागाकडे असलेली माहिती वृत्तपत्राकडे कशी? ज्या मालमत्ता प्रशासनाला दिसल्या नाहीत, त्या 'जनमाध्यम'ला कशा दिसल्या? आणि त्या सापडण्यासाठी वृत्तपत्रात बातमी छापली जाण्याचीच वाट पाहावी लागली का? परिणामी 'जिथे राख दिसते, तिथे निखारा दडलेलाच असतो.' अशी चर्चा जनसामान्य नागरिकांमध्ये रंगली आहे.

### दोन-दोन क्रशर... पण दगड येतो कुठून?

विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गाजीपूर-रुदाळी परिसरात संतोष चांडक किंवा त्यांच्या कुटुंबीयांच्या नावावर कोणतीही वैध खदान नसल्याची चर्चा आहे. मात्र दुसरीकडे दोन मोठे स्टोन क्रशर नियमितपणे सुरू आहेत. मग दररोज प्रक्रिया होणारा हजारो टन दगड येतो कुठून? तो कोणत्या परवानाधारक खदानीतून आणला जातो? रॉयल्टी कोण भरते? जीएसटीची नोंद कुठे आहे? की 'नाव एका व्यक्तीचे... धंदा दुसऱ्याचाच' असा प्रकार सुरू आहे? या प्रश्नांची अधिकृत उत्तरे अद्याप समोर आलेली नाहीत.

---

### भरधाव टिप्परची मोपेडला धडक

# मावशी-भाचीचा जागीच मृत्यू

## हेल्मेट घालूनही वाचला नाही जीव





### -राजापेठ-बडनेरा उड्डाणपुलावरील दुहेरी मृत्यूने शहर हादरले


**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात हेल्मेट सक्तीची मोहीम सुरू असतानाच राजापेठ-बडनेरा उड्डाणपुलावर मंगळवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघाताने नागरिकांना मोठा धक्का बसला. हेल्मेट परिधान करूनही अवजड टिप्परच्या चाकाखाली सापडल्याने दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेमुळे केवळ वाहतूक सुरक्षेचाच नव्हे, तर शहरात भरधाव धावणाऱ्या अवजड वाहनांवर नियंत्रण आहे का, हा प्रश्नही पुन्हा ऐरणीवर आला आहे. या अपघातात गौरी प्रमोदराव (पान २ वर)



### सोशल मिडियावर हेल्मेट सक्तीवर प्रश्नचिन्ह

दरम्यान शहरात पोलिस आयुक्तांनी हेल्मेट वापरा आणि जीव वाचवा ही मोहिम सुरू केली आहे. मात्र आज झालेल्या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या महिलेने हेल्मेट घातले होते मात्र तरीही त्या आपला जीव वाचवू शकल्या नाही. त्यामुळे आता या



अपघाताला पोलिस कोणाला जबाबदार ठरवणार हा प्रश्न समाजमाध्यमांवर विचारला जात आहे. एकीकडे हेल्मेट सक्ती करून चौकाचौकात वाहतुक पोलिसांकडून वसूली सुरू आणि दुसरीकडे अवजड आणि नंबर प्लेट नसणा-या वाहनांना शहरात रस्तावर धावण्याची खुली सुट वाहतुक पोलिसांनीच दिल्याचे चित्र आहे.

---

# आयुक्तालय हद्दीत जुगार अड्ड्यांवर धाड

## २८ आरोपींवर कारवाई, २.४१ लाखांचा मुद्देमाल जप्त



### वलगाव,फ्रेजरपुरा, गाडगेनगर, नागपुरी गेट व बडनेरा येथेही कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहर पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेने दोन दिवसांत विविध ठिकाणी धडक कारवाया करत (पान २ वर)

# सायखेडा मध्यम प्रकल्प १०० टक्के भरला

### -नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा



**पांढरकवडा/प्रतिनिधीः-** सततच्या पावसामुळे सायखेडा मध्यम प्रकल्प शंभर टक्के भरला असून आज (२८ जुलै) दुपारी २.१५ वाजता धरणाचे स्वयंचलित सांडवे उघडण्यात आले आहेत. त्यामुळे सांडव्याद्वारे नदीपात्रात (पान २ वर)

# ७ लाखांच्या चोरीचा गुन्हा ४८ तासांत उघड

### चोरीतील सर्व सोन्याचे दागिने हस्तगत

### हॉटेल कर्मचाऱ्यालाच अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कडबी बाजार परिसरात झालेल्या घरफोडीचा गुन्हा पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत उघडकीस आणला आहे. या प्रकरणात फिर्यादीच्या हॉटेलमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यालाच अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून चोरीतील सुमारे ७.०२ लाखांचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कडबी बाजार पोलीस चौकी परिसरातील रहिवासी हेमराज परसराम साहू (वय ५८) यांनी २६ जुलै रोजी नागपुरी गेट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. ते इतवारा बाजारात स्वीट मार्टचे हॉटेल चालवतात. पत्नी अमरनाथ यात्रेला गेली होती, तर मुले पुण्याला असल्याने घरी ते आणि त्यांची आई असे दोघेच होते. २५ जुलै रोजी सकाळी हेमराज साहू हॉटेलवर गेले. दुपारी त्यांची आईही हॉटेलवर गेल्याने घराला केवळ कडी लावून ठेवण्यात आली होती. सायंकाळी घरी परतल्यावर कपाटाची चावी लावलेली दिसली. कपाटाची पाहणी केली असता १५.९०० ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र, २६.३४ ग्रॅमची सोन्याची चेन आणि ४ हजारांची रोकड असा (पान २ वर)

# ३७७ हरविलेले व चोरीचे मोबाईल मालकांना परत

## अमरावती पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी, ६५.६३ लाखांचे मोबाईल शोधण्यात यश

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाने हरविलेले व चोरीस गेलेले मोबाईल शोधून काढण्याच्या मोहिमेत उल्लेखनीय यश मिळविले आहे. सन २०२६ मध्ये प्राप्त झालेल्या तक्रारींच्या आधारे सायबर पोलीस स्टेशन आणि शहरातील विविध पोलीस ठाण्यांच्या संयुक्त प्रयत्नातून ३७७ मोबाईल हस्तगत करण्यात आले. मंगळवारी (२८ जुलै) पोलीस आयुक्त कार्यालयातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात हे मोबाईल



संबंधित तक्रारदारांना परत करण्यात आले. सी ई आय आर पोर्टलच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या मोहिमेत अमरावती जिल्ह्यासह महाराष्ट्रातील विविध जिल्हे आणि परराज्यांतून हरविलेले अथवा चोरीस गेलेले मोबाईल शोधून काढण्यात



पोलिसांना यश आले. परत करण्यात आलेल्या मोबाईलची एकूण अंदाजित किंमत ६५ लाख ६३ हजार (पान २

# ब्लॅकमेलिंगच्या छळाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

## सुसाइड नोटमुळे खळबळ, - महिलेविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** सततच्या ब्लॅकमेलिंगला, खोट्या गुन्ह्यात अडकविण्याच्या धमक्यांना आणि पैशांच्या मागणीला कंटाळून एका ६० वर्षीय शेतकऱ्याने गळफास घेऊन जीवन संपवल्याची धक्कादायक घटना अंजनगाव सुर्जी तालुक्यातील चिंचोली खुर्द येथे उघडकीस आली आहे. मृताच्या खिशातून सापडलेल्या सुसाइड नोटमुळे या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले असून राहीमापूर पोलिसांनी संबंधित महिलेविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. मृत शेतकऱ्याचे नाव रामराव आनंदराव खोब्रागडे (वय ६०, रा. चिंचोली खुर्द) असे आहे. या प्रकरणी त्यांचे जुळे भाऊ लक्ष्मण आनंदराव खोब्रागडे यांनी राहीमापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार,



आरोपी महिला त्यांच्या शेजारीच राहते. गेल्या काही दिवसांपासून ती रामराव खोब्रागडे यांना खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देत पैशांची मागणी करत होती, असा आरोप करण्यात आला आहे. घटनेच्या दोन-तीन दिवसांपूर्वी रामराव यांनी आपल्या भावाकडे ५० हजारांची मदत मागितली होती. त्यावेळी संबंधित महिलेच्या (पान २ वर)




# अचलपूर विधानसभा मतदारसंघातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना गती

## -अधिवेशनातील आक्रमक पाठपुराव्याचा परिणाम -मंत्री गिरीश महाजन यांचे अधिकाऱ्यांना थेट आदेश

**मुंबई /प्रतिनिधीः-** पावसाळी अधिवेशनात विधान परिषदेचे सदस्य आ. बच्चू कडू यांनी अचलपूर विधानसभा मतदारसंघातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पांचा प्रश्न आक्रमकपणे उपस्थित केल्यानंतर राज्य शासनाने त्याची तातडीने दखल घेतली. त्यानुसार राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक पार पडली. बैठकीस जलसंपदा विभागाचे सचिव एकनाथ डवले यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



बैठकीत अचलपूर व चांदूरबाजार तालुक्यातील सर्व प्रलंबित सिंचन प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आणि प्रत्येक कामासाठी कालबद्ध आदेश देण्यात आले.

बैठकीत राजुरा प्रकल्पाचे पुनर्वसन व भूसंपादन, तसेच बोरगाव पेठ, बोरगाव दोरी आणि बोरगाव तळणी या गावांचे पुनर्वसन एका महिन्याच्या आत पूर्ण करण्याचे आदेश मंत्री गिरीश महाजन यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. पुनर्वसन पूर्ण



होताच प्रकल्पांच्या कामांना तातडीने गती देण्याचेही आदेश देण्यात आले.

गणोजा-बेलोरा ठिबक सिंचन योजनेद्वारे अतिरिक्त १५० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यासाठी आवश्यक सर्व तांत्रिक प्रक्रिया तातडीने पूर्ण करून काम सुरू करण्याचे आदेश देण्यात आले.चंद्रभागा धरणातून बोपपूर, बोर्डी आणि (पान २ वर)